



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, बुधवार ७ जानेवारी २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०





## शनी शिंगणापूर येथून दर्शन घेउन परतताना भाविकांवर काळाचा घाला

## अपघातात 5 ठार

**अहिल्यानगर :** शनी शिंगणापूर येथून दर्शन घेउन माघारी चाललेल्या घोटी इगतपुरी(नाशिक) येथील भाविकांची रिक्षा व शिर्डी येथून भाविकांना शिंगणापूर येथे घेउन जाणा-या टेम्पो ट्रॅव्हलरचा समोरासमोर भीषण अपघात झाला. या भयंकर अपघातात रिक्षामधील ५ जणांचा मृत्यू झाला आहे. तर टेम्पो ट्रॅव्हलरमधील ९ भाविक जखमी झाले आहेत. राहुरी शिंगणापूर रोडवरील उंब्रे परिसरातील तांबे पेट्रोल पंपाजवळ. मंगळवार दि. ६ जानेवारी रोजी सायंकाळच्या वेळेत भीषण अपघाताची ही घटना घडली. घोटी इगतपुरी (नाशिक) येथील भाविकांना घेउन जाणारी रिक्षामधील भाविक शिंगणापूर येथून दर्शन घेउन राहुरी मार्गे नाशिक दिशेला जात होते. उंब्रे तालुका राहुरी हद्दीत शिंगणापूर दिशेला भाविकांना घेउन जाणा-या शिर्डी येथील टेम्पो ट्रॅव्हलर समोरासमोर धडकल्याने रिक्षामधील चारजण जागीच ठार झाले. अपघाताच्या घटनेत रिक्षाचा चक्काचूर झाला तर टेम्पो ट्रॅव्हलर पलटी होउन दूर (पान २ वर)

## समृद्धीवर खासगी बस जळून खाक



**बुलडाणा /प्रतिनिधी-**समृद्धी महामार्गावरून नागपूरहून मुंबईकडे जात असलेल्या खासगी बसला अचानक आग लागल्याने बस जळून खाक झाली. चालकाच्या सतर्कतेमुळे बसमधील सर्व ३५ प्रवासी खाली उतरल्याने ते सुखरूप बचावले. मध्यरात्री शिवणी पिसा (ता. मेहकर) गावाजवळ ही घटना घडली. बसने पेट घेतल्याचे लक्षात येताच चालकाने तात्काळ महामार्गाच्या कडेला बस थांबवली व आरडाओरडा करून सर्व प्रवाशांना खाली उतरवून घेतले. या गोंधळात काही प्रवाशांना खरचटले गेल्याने (पान २ वर)

## पंतप्रधान 18 जानेवारी रोजी आसाममध्ये एलिव्हेटेड कॉरिडारची करणार पायाभरणी

**गुवाहाटी/वृत्तसंस्था :** पंतप्रधान नरेंद्र मोदी १८ जानेवारी रोजी आसामला भेट देणार आहेत. या भेटीदरम्यान ते कालियाबोर येथील मौचंदा मैदानावर



प्रस्तावित एलिव्हेटेड कारिडार प्रकल्पाची पायाभरणी करतील. आसामचे मुख्यमंत्री डा. हिमंता बिस्वा सर्मा यांनी मंगळवारी याची घोषणा केली.मुख्यमंत्री सर्मा यांनी सांगितले की, हा एलिव्हेटेड कारिडार प्रकल्प कालियाबोर प्रदेशातील वाहतूक व्यवस्था मजबूत करेल आणि प्रादेशिक विकासाला एक नवीन चालना देईल. त्यांनी सांगितले की, हा प्रकल्प पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी राज्य सरकारच्या व्यापक प्रयत्नांचा एक महत्त्वाचा भाग आहे.डा. सर्मा यांनी असेही सांगितले की, बिहू आणि झुमैर नृत्यांच्या विक्रमी सादरीकरणानंतर, राज्य सरकार आता बागुरुंबा नृत्याद्वारे आणखी एक सांस्कृतिक टप्पा गाठण्यासाठी पुढे जात आहे. या संदर्भात, पंतप्रधानांच्या उपस्थितीत सुमारे १०,००० कलाकार सरु सजाई स्टेडियममध्ये एकत्रितपणे बागुरुंबा नृत्य सादर करतीलया भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाची तयारी जोरात सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. गुवाहाटीमध्ये ४०० हून अधिक मास्टर ट्रेनर्स कलाकारांना प्रशिक्षण देत आहेत जेणेकरून एक सुव्यवस्थित आणि उच्च दर्जाचा कार्यक्रम होईल.

# 70 हजार कोटींच्या सुनावणीचा निकाल अजून बाकी



## आमची जुनी पाने उलटण्याची इच्छा नाही- बावनकुळेंचा दादांना इशारा

**पुणे/प्रतिनिधी :** राज्यातील महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने राजकीय वर्तुळात घडामोडींना वेग आला आहे, अशातच राज्यात सत्तेत सोबत असलेल्या भाजप आणि राष्ट्रवादीमध्ये सध्या काहीशी तू तू मैं मैं सुरू असल्याचं दिसून येत आहे.

अशातच पिंपरी चिंचवडमध्ये घेतलेल्या एका पत्रकार परिषदेमध्ये बोलताना उपमुख्यमंत्री, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांनी भाजपवर हल्लाबोल केला. त्यावेळी त्यांनी माझ्यावर ७० हजार कोटी रुपयांच्या भ्रष्टाचाराचे आरोप झाले, हे तुम्हाला माहिती असेल. पण ज्यांनी माझ्यावर भ्रष्टाचाराचे आरोप केले त्या सगळ्यांसोबत मी आज सरकारमध्ये बसलो आहे ना, असा युक्तिवाद करत अजित पवार यांनी त्यांच्यावर टीका करणा-या भाजपच्या (BJP) नेत्यांना कोंडीत पकडले आहे. त्यावर त्यांना भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी देखील प्रत्युत्तर दिलं त्यानंतर आता याप्रकरणी भाजपचे नेते आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मोजक्या शब्दातच अजित पवारांना डिवचलं आहे.आम्ही मागची पानं चाळली तर अजित दादांना बोलता येणार नाही, असा थेट इशारा बावनकुळेंनी अजित पवारांना दिला आहे. (पान २ वर)

# तुम्हाला सावरकरांचे विचार मान्य करावेच लागतील

## आशिष शेलारांनी अजित पवारांना ठणकावले

**मुंबई/प्रतिनिधी :** आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत महायुतीमधील मित्रपक्षांमधील कलह आता चव्हाट्यावर आला आहे. भाजप आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सध्या जोरदार वाकयुद्ध सुरू असून, भाजप नेते आशिष शेलार यांनी सावरकरांच्या मुद्द्यावरून अजित पवारांना कडक शब्दांत सुनावले आहे. सावरकरांचे विचार मान्य असतील तर सोबत या, नाहीतर तुमच्याशिवाय पुढे जाउ, अशा शब्दांत शेलारांनी अजित पवारांना ठणकावले आहे. या वादाची सुरुवात अजित पवार यांनी पुण्यात घेतलेल्या एका पत्रकार परिषदेतून झाली. महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर बोलताना



अजित पवारांनी भाजपच्या काही धोरणांवर आणि स्थानिक नेतृत्वावर बोचरी टीका केली होती. पुण्याच्या विकासकामांच्या श्रेयवादावरून त्यांनी भाजपला लक्ष्य केले होते. अजित पवारांच्या या टीकेला आधी रवींद्र चव्हाण आणि त्यानंतर स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चोख प्रत्युत्तर दिले होते. मात्र, आता आशिष शेलार यांनी या वादात थेट सावरकरांचा मुद्दा आणल्याने युतीमधील तणाव वाढला आहे.

**आशिष शेलार यांचा आक्रमक पवित्रा-** अजित पवारांच्या टीकेवर भाष्य करताना आशिष शेलार यांनी आमचा पक्ष स्वातंर्त्यवीर सावरकरांच्या विचारांवर चालणारा आहे, असं म्हटलं. 'रवींद्र चव्हाण म्हणालेच आहेत की आम्ही सावरकरांचे भक्त आहोत. सावरकरी विचारांवर चालणारे लोक आहोत. त्यामुळे (पान २ वर)

## महापुरुषांच्या फोटोसमोर महिलेला नाचवले

**मुंबई -** महापालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत सोशल मीडियात बरेच व्हिडिओ व्हायरल असतात. त्यातच भाजपाच्या व्यासपीठावरून एका महिलेचा डान्स करणारा व्हिडिओ सोशल मीडियात व्हायरल होतोय. त्यावरून उद्धवसेनेचे संघटक अखिल चित्रे यांनी हा व्हिडिओ पोस्ट करून मुंबई भाजपा अध्यक्ष अमित साटम आणि निवडणूक प्रभारी आशिष शेलार यांच्यावर निशाणा साधत आमच्या महापुरूषांपुढे बायका नाचवता, कुठे नेउन ठेवला आहे आमचा महाराष्ट्र? असा प्रश्न उपस्थित केला आहे. अखिल चित्रे यांनी त्यांच्या ट्विटमध्ये म्हटलंय की, हा व्हिडिओ पाहून तुमच्या तळपायाची आग मस्तकात जाईल. कारण भाजपा (पान २ वर)

## भाजपाने केली काँग्रेससोबत युती

**मुंबई/प्रतिनिधी :**भाजप आणि काँग्रेस हे राष्ट्रीय राजकारणातील एकमेकांचे पारंपरिक विरोधी पक्ष मानले जातात. तसेच दोन्ही पक्षांमधील विचारसरणीतील भिन्नतेमुळे सर्वसाधारण दोन्ही पक्ष कधीही एकत्र येउ शकत नाहीत. त्यांच्यात राजकीय आघाडी, युती होउ शकत नाही, असे मानले जाते. मात्र मुंबईजवळच्या अंबरनाथ शहरातील नगर परिषदेमध्ये अजब समीकरण जुळून आलं आहे. येथे भाजपाने मित्र पक्ष असलेल्या शिंदेसेनेला सत्तेबाहेर ठेवून बहुमताचं गणित जुळवण्यासाठी चक्क काँग्रेससोबत आघाडी केल्याने सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला आहे.गेल्या महिन्यात झालेल्या अंबरनाथ नगर परिषदेच्या निवडणुकीत भाजपाच्या तेजश्री करंजुले पाटील ह्या शिंदेसेनेच्या



मनिषा वाळेकर यांचा पराभव करून नगराध्यक्षपदावर निवडून आल्या होत्या. मात्र नगर परिषदेमध्ये भाजपाला बहुमत मिळालं नव्हतं. तर इथे शिंदेसेना मोठा पक्ष ठरला होता. त्यामुळे नगराध्यक्षपदासह इतर निवडींसाठी एकमेकांविरोधात लढलेले भाजपा आणि शिंदेसेना पुन्हा युती करून एकत्र येणार का? याबाबत तर्कवितर्क लढवले जात होते. मात्र भाजपाने सर्वात मोठा पक्ष असलेल्या शिंदेसेनेला अंबरनाथच्या सत्तेतून बाहेर ठेवण्यासाठी आपल्यासोबत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार आणि काँग्रेस या पक्षांच्या नगरसेवकांची मोट बांधत सत्तेचं समीकरणं सोडवलं आहे. दरम्यान, भाजपाने काँग्रेससोबत केलेलेल्या आघाडीवर शिंदेसेनेने सडकून टीका केली आहे. शिंदेसेनेने भाजपा आणि काँग्रेसमधील या युतीची अभद्र युती अशी संभावना केली आहे.

## लग्न केले तर खबरदार!

## अग्निवीरसाठी आता नवे मापदंड

**मुंबई/प्रतिनिधी :** भारतीय सैन्य दलाची अग्निवीर योजना चांगलीच



गाजली. संसदेत त्यावर प्रश्नांचा भडीमार पण झाला होता. पण पंतप्रधान नरेंद्र मोदी व संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी ती योजना रेटून धरत अंमलात आणली आहे. अग्निवीर योजना २०२२ मध्ये सुरू करण्यात आली होती. या योजनेत भरती झालेली पहिली तुकडी आता सेवेस चार वर्ष पूर्ण करीत आहे.

अग्निवीर तरुणांच्या २०२२ मधील तुकडीतील सेवा कालावधी जून व जुलैच्या २०२६ मध्ये संपणार. एका अंदाजानुसार पहिल्या (पान २ वर)

## रवींद्र चव्हाणांकडून दिलगिरी व्यक्त

## प्रकरण अंगलट येण्याच्या भीतीने घेतली माघार

**मुंबई/प्रतिनिधी :** लातूर महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण शहरात प्रचारासाठी आले होते. यावेळी घेतलेल्या सभेत त्यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना संबोधित करताना लातूरच्या राजकारणाचा उल्लेख केला. भाषणाच्या ओघात त्यांनी, लातूरमध्ये कार्यकर्त्यांचा जो उत्साह दिसतोय, तो पाहता विलासराव देशमुख यांच्या आठवणी या शहरातून पुसल्या जातील, यात शंका नाही, असे विधान केले. या वक्तव्याने राजकीय वातावरण तापले



असून, विशेषतः काँग्रेसमध्ये प्रचंड अस्वस्थता निर्माण झाली असताना रविन्द्र चव्हाण यांनी प्रकरण अंगाशी येत असल्याचे दिसताच दिलगिरी व्यक्तकेली. रवींद्र चव्हाण यांच्या या वक्तव्याला काँग्रेस कार्यकर्त्यांनी तीव्र विरोध दर्शवला. लातूरमध्ये विलासराव देशमुख हे केवळ राजकीय नेते नव्हे, तर जनतेच्या मनात खोलवर रुजलेले नेतृत्व मानले जाते. त्यांच्या कार्यकाळात लातूर आणि परिसराच्या विकासासाठी घेतलेल्या निर्णयांची आठवण आजही नागरिक कृतज्ञतेने काढतात. त्यामुळे आठवणी पुसल्या जातील, या विधानाला अनेकांनी लातूरच्या अस्मितेला आव्हान देणारे म्हटले आहे. एकूणच, रवींद्र चव्हाण यांच्या एका वक्तव्यामुळे लातूरच्या राजकारणात आणि (पान २ वर)

## एसटीच्या ताफ्यात 8 हजार नवीन बसेस दाखल होणार

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) ताफयात ८ हजार नवीन बसेस दाखल होतील अशा पद्धतीने सध्या सुरू असलेली निविदा प्रक्रिया तातडीने गतिमान करण्यात यावी. यामध्ये कोणतीही दिरंगाई सहन केली जाणार नाही.




अन्यथा संबंधित अधिका-यांना जबाबदार धरून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल, असा सज्जड दम परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिला. एसटी महामंडळाच्या सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय निधीच्या वापराबाबत बोलावलेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ माधव कुसेकर, आर्थिक सल्लागार गिरीश देशमुख तसेच संबंधित खातेप्रमुख उपस्थित होते. यावेळी मंत्री सरनाईक यांनी एसटीच्या विविध विभागांकडून सुरू असलेल्या संथ व कूर्मगती कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले की, सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात एसटीसाठी शासनाने (पान २ वर)

## गुजरात-कर्नाटकच्या 7 न्यायालयांना बॉम्बने उडवण्याची धमकी

**गांधीनगर/नवी दिल्ली :** गुजरात, उत्तर प्रदेश आणि कर्नाटकात मंगळवारी वेगवेगळ्या ठिकाणी बॉम्बने उडवण्याच्या धमक्या मिळाल्या. गुजरातच्या सहा न्यायालयांना, उत्तर प्रदेशातील मउ रेल्वे स्थानकावरील ट्रेनला आणि कर्नाटकातील म्हैसूर जिल्हा न्यायालयाला धमकी देण्यात आली. सर्व प्रकरणांमध्ये पोलिसांनी आणि बॉम्ब शोधक पथकाने घटनास्थळी तपासणी केली, परंतु कोणत्याही न्यायालय किंवा ट्रेनमधून कोणतीही संशयास्पद वस्तू आढळली नाही. त्याचबरोबर, केरळमधील कन्नूर जिल्ह्यात पोलिसांनी दोन वेगवेगळ्या ठिकाणांहून १२ देशी स्फोटक उपकरणे जप्त केली आहेत. सर्व प्रकरणांची चौकशी सुरू आहे. (पान २ वर)










# गोपी इंडस्ट्रीमध्ये ब्लास्ट, महिला मजुराचा मृत्यू

## -सहा महिला थोडक्यात बचावल्या -बॉटलमध्ये थीनर भरताना लागली भीषण आग





**अमरावती/प्रतिनिधीः** येथील बडनेरा रोडवरील एमआयडीसी परिसरात असलेल्या गोपी इंडस्ट्री या केमिकल थिनर कंपनीत आज मंगळवार ६ जानेवारीच्या सकाळी भीषण ब्लास्ट होऊन मोठी आग लागल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या आगीत कंपनीत काम करणाऱ्या एका महिला कर्मचाऱ्याचा जळून मृत्यू झाला असून, कंपनीमध्ये काम करणाऱ्या आणखीन ६ महिला थोडक्यात बचावल्या. लाखो रुपयांचे नुकसान या घटनेमध्ये झाले आहे.यामुळे परिसरात खळबळ उडाली. मोनाली सुनील कोडापे (वय २९, हरदोली,ता. आर्वी, जि. वर्धा) असे मृतक महिलेचे नाव आहे.

माहितीनुसार एमआयडीसी मार्गावर सुमित खंडेलवाल यांची गोपी इंडस्ट्री आहे. नेहमी प्रमाणे मंगळवारीं सकाळी सुमारे १० वाजताच्या सुमारास कंपनीचे कामकाज सुरू झाले होते. महिला कामगार बॉटलमध्ये थिनर भरत होत्या. त्यावेळी इंडस्ट्रीमध्ये अचानक ब्लास्ट झाला. स्फोटा नंतर काही क्षणांतच आगीने उग्र रूप धारण केले. कंपनीत त्या वेळी सात महिला कर्मचारी काम करत होत्या. आगीचा वेग इतका प्रचंड होता की, कर्मचारी मोनाली कोडापेला बाहेर पडण्याची संधीच मिळाली नाही आणि होरपळून तिचा जागीच मृत्यू झाला. तर इतर महिला थोडक्यात बचावल्या. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती अग्निशमन विभागाला देण्यात आली. अग्निशमन विभागाच्या वाहनाने घटनास्थळावर पोहोचून आगीवर नियंत्रण आणले.टरपेन्टाईन सह मशिनरी जळून लाखोंचे नुकसान झाले आहे. माहिती मिळताच राजापेठ पोलीस आणि फॉरेन्सिक पथक घटनास्थळी दाखल झाले. संचालकावर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

### दोषीवर कार्यवाहीची मागणी

प्राथमिक माहितीनुसार, हलगर्जीपणामुळे ही आग लागल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. केमिकल हाताळणीसाठी आवश्यक असलेले सुरक्षा उपाय अपुरे असल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. पोलीस व औद्योगिक सुरक्षा विभागाकडून चौकशी सुरू असून, दोषींवर कठोर कारवाईची मागणी होत आहे. या प्रकरणी एमआयडीसी प्रशासन, पोलीस व कामगार विभाग संयुक्तपणे तपास करत आहेत.

### आठवड्याभरापूर्वी महिला कामावर

या दुर्घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या मोनाली सुनील कोडापे वर्धा जिल्ह्यातील आर्वी तालुक्यातील हरदोळी गावातील रहिवासी असून, फक्त आठवडाभरापूर्वीच या कंपनीत नोकरीला रुजू झाल्या होत्या. त्यांचे पती कंपनीच्या बाजूला असणाऱ्या कारखान्यामध्ये काम करत होते आणि मोनाली येथे काम करत होती. पाच वर्षांपूर्वीच मोनाली चे सुनील कोडापे सोबत लग्न झाले होते.अचानक घडलेल्या या घटनेने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या ३ गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. दीर्घ प्रयत्नांनंतर आग आटोक्यात आणण्यात यश आले. मात्र, तोपर्यंत मोठे नुकसान झाले होते. केमिकल फॅक्टरी असल्यामुळे थोड्याच वेळात आगीने रौद्ररूप धारण केले होते. पाहता पाहता मोठे नुकसान येथे झाले. अग्निशमन विभागाने शर्तीचे प्रयत्न करून आग आटोक्यात आणली.

# महापालिका धुमशान

## पुर्वाश्रमीच्या बालेकिल्ल्यात दोन्ही शिवसेनेची अग्निपरीक्षा




हिंदूहृदय सम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी स्थापन केलेल्या शिवसेनेचे दोन वेगवेगळे पक्ष झाल्यानंतर महानगरपालिकेची ही पहिलीच निवडणूक आहे. दोन्ही शिवसेना महापालिकेच्या निवडणुकीत आमने सामने आहेतच. अमरावती महापालिकेत शिवसेना ऊबाठा आणि शिवसेना शिंदे गट या दोन्ही पक्षांनी उमेदवार उभे केले आहेत. एकेकाळी शिवसेनेचा बालेकिल्ला म्हणून अमरावती ची ओळख होती. अमरावती, अकोला बुलढाणा, वाशिम आणि यवतमाळ हे पाच जिल्हे शिवसेनेचा गढ मानले जायचे. अनंतराव गुढे, आनंदराव अडसूळ, भावना गवळी, प्रतापराव जाधव या शिवसेनेच्या खासदारांनी पाचही जिल्ह्यात संघटना उभारणी करून पश्चिम विदर्भाला शिवसेनेचा बालेकिल्ला बनविला. अर्थात त्यावेळी शिवसेना आणि भारतीय जनता पार्टी अशी युती अस्तित्वात होती. पण शिवसेनेने आपली आक्रमकता जपत स्वतंत्र छाप निर्माण करण्यात यश मिळविले. उध्दव बाळासाहेब ठाकरे हे शिवसेनेचे कार्यकारी अध्यक्ष झाल्यानंतर त्यांच्या नेतृत्वात शिवसेनेचा पहिला मेळावा अमरावतीत झाला होता. अमरावती जिल्ह्यात शिवसेनेचे पहिले जिल्हा प्रमुख चंद्रकांत वडनेरे, त्यानंतर अनंत गुढे, सोमेश्वर पुसतकर, डॉ अनिल बोंडे, संजय बंड, दिगंबर डहाके, सुधीर सुर्यवंशी,दिनेश बुब या नेत्यांनी संघटना बांधली, तर प्रदीप वडनेरे, प्रकाश पाटील भारसाकळे, संजय बंड, ज्ञानेश्वर धाने पाटील आणि अभिजीत अडसुळ या शिवसेनेच्या आमदारासह शिवसेनेचे संपर्क प्रमुख चंद्रशेखर हुद्दार, रविन्द्र मिर्लेकर, दिवाकरराव रावते, आनंदराव अडसूळ यांनी शिवसेना बळकट करण्यासाठी कठोर परिश्रम घेतले. अमरावती महानगरपालिकेत प्रमोद पांडे, डॉ राजेन्द्र तायडे,दिगंबर डहाके, रामा सोळंके यांनी उपमहापौर पदही भुषविले आहे. शिवसेनेने स्थायी समितीवर ही सत्ता गाजवली आहे. पप्पू उर्फ मंगेश पाटील, प्रा. प्रशांत वानखडे, प्रविण हरमकर यांच्यासह शिवसेनेच्या अनेक नगरसेवकांनी महापालिकेत शिवसेनेचे वेगळे स्थान निर्माण केले. एकेकाळी शिवसेनेची आक्रमक फौज अमरावतीत होती याचा प्रत्यय मागील वर्षी झालेल्या विधानसभा निवडणुकीत आला. भाजप, शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादी (अजीत पवार) या महायुतीच्या लाटेतही शिवसेना ऊबाठाचे गजानन लवटे दर्यापूर मतदारसंघातून विजयी झाले आणि 'उबाठा' चे अमरावती मधील अस्तित्व कायम ठेवले. एकसंघ आणि बळकट असलेल्या शिवसेनेचे आता दोन पक्ष झाले आहेत. शिवसेना (उबाठा) आणि शिवसेना (शिंदे गट). एका पक्षाचे दोन पक्ष झाले आणि शिवसेनेच्या मजबूत संघटनेची विभागणी झाली. अमरावती महानगरपालिकेच्या यंदाच्या निवडणूकित दोन्ही शिवसेना रिंगणात आहेत. तुलनेत शिंदे गटाचे उमेदवार ऊबाठा पेक्षा




अधिक आहेत. त्यातच महायुतीतील सहकारी असलेले शिंदे गटाची भाजपा सोबत मनपात युती नाही. उबाठाने मात्र आघाडी मधील कॉंग्रेस सोबत काही प्रभागात आघाडी केली आहे. पन्नास हुन अधिक उमेदवार शिंदे गटाने निवडणूक रिंगणात उतरविले आहे. महापालिका निवडणुकीत शिंदे गटाला भाजपासह सर्वच पक्षाचे आव्हान आहे. महापालिका निवडणुकीत शिवसेनेच्या दोन्ही गटाने हे शिवधनुष्य उचलले आहे. शिवसेनेने निर्माण केलेले हे स्थान शाबूत राखण्याचे दोन्ही गट प्रयत्न करतील. आक्रमक असलेल्या हिंदुत्ववादी शिवसेनेचे दोन पक्ष झाले असले तरी या दोन्ही पक्षांनी हिंदुत्व जीवंत ठेवले आहे. महापालिका निवडणुकीत मात्र आता हे दोन्ही पक्ष मतांचे वाटेकरी झालेत. दोन्ही पक्षांना मतदार राजा कसा प्रतिसाद देतो हे येणारा काळच सांगेल.

जाता जाता...

या पार्श्वभूमीवर शिवसेना शिंदे गटाचे नेते आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची जाहिर सभा अमरावतीत होत आहे. नेहरू मैदान येथून शिवसेना (शिंदे)पक्ष महानगरपालिका प्रचाराचा शुभारंभ एकनाथ शिंदे करतील. 'लाडक्या बहिणींचा लाडका भाऊ' म्हणून महाराष्ट्रात एकनाथ शिंदे यांनी नवी ओळख निर्माण केली आहे. विधानसभा निवडणुकीत लाडक्या भावाला भरभरून प्रतिसाद मिळाला. मात्र आता महापालिका निवडणुकीत शिंदे गटाला प्रत्येकच प्रभागात भाजपा सोबत लढायचे आहे. त्यामुळे 'लाडक्या भावाचा' असर महापालिकेत कितपत यश मिळवून देईल हे आगामी काळात कळेलच.

# अमरावती - पुणेसह २० गाड्या रद्द

## अनेक रेल्वे गाड्यांच्या वेळात बदल, प्रवाशांना फटका


**अमरावती/प्रतिनिधीः-** विदर्भातून पुणे आणि मुंबईकडे जाणाऱ्या प्रवाशांना डब्लिंगच्या कामामुळे मोठया अडचणीचा सामना करावा लागणार आहे. या निमित्त अमरावती पुणेसह २० ट्रेन आगामी २३ ते २५ जानेवारी पर्यंत रद्द करण्यात येणार असल्याची माहिती समोर आली आहे.

प्रवाशांना याकडे लक्ष देण्याचे आवाहन रेल्वे विभागाने केले आहे. माहितीनुसार पुणे मध्ये दौड- काष्टी स्टेशन दरम्यान डब्लिंग चे काम करण्यात येत आहे. यामुळे येणाऱ्या बारा दिवसात अनेक रेल्वे गाड्यांचे टाइमिंग बदलले आहे. अमरावती-पुणे एक्सप्रेस सह बडनेरा वरून जाणाऱ्या अनेक ट्रेन रद्द करण्यात आल्या आहे.२४ व २५ जानेवारी रोजी ०११०२५ पुणे-अमरावती आणि ११०२६ अमरावती पुणे २३ व २५ जानेवारी रोजी रद्द करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे गाडी नंबर १२११२० अजनी-पुणे एक्सप्रेस २४ आणि २५ जानेवारीला रद्द करण्यात आलेली आहे. तसेच पुणे वरून अजनी येणारी ट्रेन पण कॅन्सल झाली आहे. नागपूर-पुणे एक्सप्रेस २४ जानेवारी रोजी धावणार नाही तसेच २५ जानेवारी रोजी नागपूर-पुणे गरीब रथ रद्द करण्यात आली आहे. प्रवाशांना याकडे लक्ष देण्याचे आवाहन रेल्वे विभागाने केले आहे.

१४ ते २५ जानेवरी पर्यंत रद्द गाड्या

१२१६९-७० पुणे-सोलापुर-पुणे एक्सप्रेस

१२१७७-७८ पुणे-सोलापुर - पुणे एक्सप्रेस



०१४२२-२५ कलबुर्गी-दौंड- कलबुर्गी स्पेशल एक्सप्रेस

११४१३- १४ निजामाबाद-पंढरपुर- निजामाबाद एक्सप्रेस

२४ ते २६ रद्द गाड्या-

११०२५ पुणे- अमरावती एक्सप्रेस- २४ व २५ जानेवारी

११०२६ अमरावती-पुणे एक्सप्रेस - २३ ते २५ जानेवारी

१२११९ अमरावती - पुणे एक्सप्रेस - २४ व २५ जानेवारी

१२१२० अजनी - पुणे एक्सप्रेस २४ व २५ जानेवारी

११४०९ दौंड- निजामाबाद एक्सप्रेस- २४ जानेवारी

११४१० निजामाबाद-पुणे एक्सप्रेस - २४, २५ व २६ जानेवारी

१२११४ नागपुर- पुणे गरीब रथ २५ जानेवारी

१७६२९ पुणे- नांदेड एक्सप्रेस २४ व २५ जानेवारी

२२१३९ पुणे- अजनी हमसफर २४ व २५ जानेवारी

२२१४० अजनी - पुणे हमसफर एक्सप्रेस २४ ,२५ जानेवारी

१२१३६ नागपुर- पुणे एक्सप्रेस २४ जानेवारी

११०४१ दादर- साईनगर शिर्डी एक्सप्रेस २१, २२ आणि २५ जानेवारी

१७६१३ पनवेल - नांदेड एक्सप्रेस २४ व २५जानेवारी

११४१३ निजामाबाद-पंढरपुर एक्सप्रेस २५ जानेवारी

## १ व १० वरिल उर्वरित

### शनी शिंगणापूर येथून दर्शन घेउन

अंतरावर फेकला गेल्याने ट्रॅव्हलर मधील अनेक भाविक जखमी झाले.अपघाताची घटना घडताच परिसरातील नागरीकांनी घटनास्थळी धाव घेउन जखमींना उपचारार्थ हलविण्यास मदतकार्य केले. राहुरी येथील पाच रुग्णवाहिका चालकांनी आपल्या रुग्णवाहिका घेउन तातडीने घटनास्थळी हजर झाले. अपघातातील जखमींना तातडीने राहुरी ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आले. वैद्यकीय अधिका-यांनी तपासणी करून तीन तरुणांना मृत घोषित केले.

### समृद्धीवर खासगी बस

ते किरकोळ जखमी झाले. काही क्षणातच बस पूर्णपणे जळून खाक झाली. या घटनेची माहिती कळताच महामार्ग पोलिसांचे पथक व अग्निशमन दल घटनास्थळी पोहोचले. तत्पूर्वीच ही बस जळून खाक झाली होती. यामुळे काही काळ विस्कळीत झालेली समृद्धी महामार्गावरील वाहतूक पोलिसांनी पर्यायी मार्गाने वळवून सुरळीत केली.बसला आग लागण्याचे कारण अद्याप समोर आले नाही. मात्र, शार्टसर्किटमुळे आग लागली असण्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

### ७० हजार कोटींच्या

तर ७० हजार कोटींच्या सुनावणीचा निकाल अजून लागलेला नाही, असंही ते म्हणालेत. अजित पवारांच्या वक्तव्यावर बावनकुळे म्हणाले, ठीक आहे, हे काही अभिमानास्पद नाही. न्यायालयात सुनावणी सुरु आहे, त्याचा काय निकाल येईल, त्यावर आपण पुढं जाउ. शेवटी केस विचाराधीन आहे, अजून निकाल लागलेला नाही. अजित दादा प्रगल्भ नेते आहेत. एवढ्या छोट्या निवडणुकीसाठी या बाबी बाहेर काढणे आणि एका महापालिकेसाठी महायुतीत मनभेद निर्माण करु नयेत. हे योग्य नाही. अजित दादा याचा विचार करतील. बोलता खूप येईल, मात्र ही ती वेळ नाही, असंही चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटलं आहे.

### तुम्हाला सावरकरांचे विचार

अजित पवारांच्या पक्षाला सुद्धा सावरकरांचे विचार मान्य करावेच लागतील. याल तर तुमच्या बरोबर न याल तर तुमच्याविना आणि विरोधात शिरलात तर तुमच्या विरोधात आम्ही आमचे काम करु,' असा इशारा आशिष शेलार यांनी दिला.

### महापुरुषांच्या फोटोसमोर महिलेला

मुंबईत प्रचारसभांमध्ये महिलांना नाचवून गर्दी जमवत आहे. हे करताना भाजपा मुंबई अध्यक्ष अमित साटम, मंत्री आशिष शेलार या भाजपाच्या महाभागांना व्यासपीठावर युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज व देशाला संविधान देणा?या महामानव ड?. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमा आहे याचेही भान नाही. आमच्या महापुरुषांपुढे बायका नाचवता, कुठे नेउन ठेवला आहे आमचा महाराष्ट्र? हे त्यांनी विचारले आहे.तसेच ह्या कार्यक्रमाच्या आयोजक कोण? तर भाजपाच्या स्थानिक उमेदवार, संयोजक कोण तर सिद्धिविनायक ट्रस्टवर भाजपाने कोषाध्यक्ष नेमलेला पवन त्रिपाठी. ही असली माणसं आमच्या पवित्र मंदिरावर नेमताना लाज कशी वाटली नाही भाजपाला? मुंबईकरांनो, आपल्या महापुरुषांचा असा अपमान सहन करायचा नाही. ह्यांच्या डोक्यात चढलेली सत्तेची मस्ती उतरविण्याची संधी वारंवार येत नसते. ह्यांना एकदाचा शिवटोला देउयाच असं आवाहन अखिल चित्रे यांनी जनतेला केले.

दरम्यान, हा व्हिडिओ उद्धवसेनेने ट्विट केल्यानंतर भाजपानेही यावर प्रतिक्रिया दिली. लोक आनंद व्यक्त करतात, त्यात गर्दीचा काय संबंध? आमच्या प्रचार आणि प्रसारात आमच्या महिलांनी आनंद व्यक्तकेला असेल तर एवढे बोलायची गरज काय, शेवटी हा महिलांचा आनंद आहे त्यांनी तो व्यक्त केला असेल अशी प्रतिक्रिया मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

### लग्न केले तर खबरदार!

तुकडीतील २० हजार अग्निवीर आता निवृत्त होणार आहे. या योजनेत भरती होणा-या असंख्य युवकांचे स्वप्न असते. चार वर्षाच्या सेवेनंतर भारताच्या सैन्य दलात नेहमीसाठी सैनिक बनून देश सेवा करायची.

मात्र आता एक बदल झाला आहे. भारतीय सैन्य दलाने एक महत्वाचा नियम लागू केला आहे. चार वर्षांच्या सेवेअंती सैन्यात कायम होण्याची सर्वांची इच्छा असते. ती इच्छा ठेवून असणा-या अग्निवीर यांना कायम नियुक्ती मिळेपर्यंत लग्न करता येणार नाही. जर एखाद्या अग्निविराने सैनिक म्हणून कायम होण्यापूर्वी लग्न केले तर त्यांना कायमस्वरुपी सेवेसाठी अपात्र ठरविल्या जाणार. असे अग्निवीर हे कायम नियुक्तीसाठी अर्ज करू शकणार नाहीत. तसेच निवड प्रक्रियेत सहभागी होवू शकणार नाही. ही आता महत्वाची अट ठरली आहे.

### रवींद्र चव्हाणांकडून दिलगिरी

राज्याच्या राजकीय वर्तुळात नवा वाद उभा राहिला आहे. रितेश देशमुख यांची भावनिक पण ठाम प्रतिक्रिया, तसेच काँग्रेस नेत्यांचा आक्रमक पवित्रा पाहता, येत्या काळात हा मुद्दा अधिक तापण्याची शक्यता आहे. विलासराव देशमुख यांच्या आठवणी पुसण्याचा दावा करणा-यांना लातूरकर आणि महाराष्ट्रातील जनतेकडून कसा प्रत्युत्तर दिले जाईल, याचे राजकीय पडसाद उमटण्याची शक्यता होती. त्यामुळे अखेर रवींद्र चव्हाण यांनी दिलगिरी व्यक्त केली. विलासराव देशमुख यांच्या नावाने काँग्रेस मते मागत आहेत. त्यामुळे मी तसे वक्तव्य केले होते. मात्र, त्यांच्या मुलांच्या भावना दुखावल्या गेल्या असतील तर मी दिलगिरी व्यक्तकरत असल्याचे चव्हाण यांनी म्हटले आहे.

### एसटीच्या ताफ्यात ८ हजार

२,४६० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. मात्र आर्थिक वर्ष संपण्यास अवघे तीन महिने शिल्लक असताना त्यापैकी सुमारे १६०० कोटी रुपये खर्चाविना परत जाण्याची स्थिती निर्माण झाली आहे, ही अत्यंत गंभीर बाब आहे.हा निधी सर्वसामान्य जनतेच्या करातून आलेला असून तो प्रवाशांच्या मूलभूत सुविधा नवीन बसेस खरेदी, बसस्थानकांची उभारणी, दुरुस्ती व नूतनीकरण यासाठी वापरणे अपेक्षित असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. परंतु बसेस खरेदी व बसस्थानकांच्या कामांच्या निविदा प्रक्रिया गेल्या नउ महिन्यांपासून रेंगाळल्यामुळे निधी खर्च होउ शकलेला नाही, याला संबंधित विभागांचे अकार्यक्षम अधिकारी जबाबदार असल्याचा ठपका त्यांनी ठेवला.उर्वरित तीन महिन्यांत जास्तीत जास्त निधी खर्च करून प्रवाशांसाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधा नवीन बसेस, बसस्थानके, प्रसाधनगृहे आदींच्या निर्मितीसाठी आवश्यक निविदा व प्रशासकीय प्रक्रिया तातडीने पूर्ण करून प्रकल्पांना गती देण्याचे स्पष्ट निर्देश यावेळी मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले.

### गुजरात-कर्नाटकच्या ७ न्यायालयांना बॉम्बने

आणंद, राजकोट, अहमदाबाद आणि भरूच येथील सत्र न्यायालयांना अशाच प्रकारचे ईमेल मिळाले. मात्र, ब?म्ब शोधक पथकाच्या तपासणीत न्यायालयात कोणतीही संशयास्पद वस्तू आढळली नाही. पोलिसांच्या माहितीनुसार, ही धमकी एलटीटीई (लिबरेशन टायगर्स ऑफ तमिळ ईलम) च्या नावाने देण्यात आली आहे.

**आरडीएक्सने उडवण्याची धमकी-** गुजरातमध्ये उच्च न्यायालय आणि ५ स्थानिक न्यायालयांना आरडीएक्सने उडवण्याची धमकी मिळाली. सुरतच्या न्यायालयाच्या अधिकृत ईमेलवर सोमवारी रात्री २ वाजता धमकीचा ईमेल आला होता. सकाळी कर्मचा-यांनी ईमेल तपासला तेव्हा पोलिसांना माहिती दिली.

### काँग्रेस प्रदेश उपाध्यक्ष पटेल

मिळताच राजकीय क्षेत्रात मोठी खळबळ उडाली. हिदायत पटेल यांना तत्काळ ग्रामीण रुग्णालयात हलवून प्राथमिक उपचार करण्यात आले. पुढील उपचारासाठी त्यांना अकोला येथे हलविण्यात आले आहे. माहिती मिळताच पोलिसांनी घटना स्थळावर धाव घेऊन तपास सुरू केला आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते हिदायत पटेल यांच्यावर हल्ला करण्यामागे नेमके कारण काय? याचा शोध पोलीस घेत आहेत. घटनेनंतर अकोला व अकोट परिसरातील काँग्रेस कार्यकर्ता रुग्णालयात दाखल झाले आहे. प्रकरणाची गंभीरता पाहून पोलिसांनी अकोला आणि मोहाळ गावात पोलिसांचा तगडा बंदोबस्त लावलेला आहे. आरोपीचा शोध घेतला जात आहे.

हिदायत पटेल २०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचे उमेदवार होते. हिदायत पटेल सध्या काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष होते. गंभीर जखमी असलेल्या हिदायत पटेल यांना अकोटमधील एका खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. हिदायत पटेलयांची प्रकृती गंभीर असली तरी स्थिर असल्याची माहिती रुग्णालयातील सूत्रांनी दिली आहे.

### कंट्रोल युनिट ८०५ तर बॅलेट

८०५ मतदान केंद्रे स्थापन करण्यात आली असून, सर्व केंद्रांवर आवश्यक त्या ई.व्ही.एम. यंत्रणा पुरेशा प्रमाणात उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. निवडणूक व्यवस्थेसाठी कंट्रोल युनिट (सी.यू.) एकूण ८०५ तर बॅलेट युनिट (बी.यू.) एकूण ३३२० इतक्या संख्येने सज्ज ठेवण्यात आल्या आहेत.

मतदान प्रक्रियेपूर्वी ई.व्ही.एम.ची प्रथम व द्वितीय स्तरीय तपासणी (एफ.एल.सी.) केली जाईल आणि उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत मॉक पोल घेण्यात येणार आहेत. तसेच मतदानाच्या दिवशी सुरळीत कामकाजासाठी मतदान अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यक प्रशिक्षण देण्यात आले आहे.

निवडणूक काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलीस प्रशासनाशी समन्वय साधण्यात आला असून, प्रत्येक मतदान केंद्रावर आवश्यक ते सुरक्षाबळ तैनात राहणार आहे. मतदारांनी निर्भयपणे व उत्साहाने मतदान प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे प्रशासनाने आवाहन केले आहे. अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ ही लोकशाहीचा उत्सव ठरणार असून, ई.व्ही.एम.च्या माध्यमातून पारदर्शक व विश्वासार्ह मतदान प्रक्रिया सुनिश्चित करण्यासाठी निवडणूक अधिकारी तथा आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासन पूर्णतः सज्ज असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

### चंद्रशेखर बावनकुळे यांच्या

सभा घेतील. सांयकाळी ७ वाजता कंवर नगर चौकात त्यांची जाहिर सभा होणार आहे. रात्री ८ वाजता रवि नगरातल्या सोनार भवन येथे चंद्रशेखर बावनकुळे सभा घेतील. त्यांची शेवटची सभा बडनेरा नवीवस्ती आठवडी बाजार येथे रात्री ९ वाजता होणार आहे. या पाचही सभांमधून ते भाजपाच्या उमेदवारांचा प्रचार करणार आहे. त्यांच्या पाचही जाहीर सभांना नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवहन भाजपा अमरावती शहर जिल्ह्याच्यावतीने करण्यात आले आहे.

### महापालिका निवडणुकीसाठी मतदान

वापर करत मतदारांची यादी, मतदान सामग्री आणि सुरक्षेची पूर्ण तयारी केली आहे. आगामी निवडणूक २०२५-२६ पारदर्शक, सुरक्षीत आणि आदर्श पद्धतीने होण्यासाठी प्रशासन सक्रियपणे कार्यरत आहे. या पाहणी दरम्यान पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी सूचना केल्या की, मतदान केंद्रांवर सुरक्षा पथके पर्याप्त प्रमाणात तैनात करावीत. मतदान केंद्र परिसरात मतदारांची गर्दी नियंत्रित करण्यासाठी योग्य रस्ता आणि मार्गदर्शन व्यवस्था असावी. मतदान दिनी कोणत्याही प्रकारच्या अनुचित हालचाली टाळण्यासाठी संपूर्ण पोलिस दल सतर्क राहावे. आवश्यक असल्यास प्राथमिक वैद्यकीय सुविधा आणि आपत्कालीन मदत उपलब्ध ठेवावी. पाहणी दरम्यान उपायुक्त दादाराव डोलारकर, पोलीस अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, विविध खात्यांचे विभागप्रमुख, महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे

जानेवारी रोजी तहसिल कचेरीवर प्रचंड मोर्चा आणण्याचा ईशारा सुद्धा माकपचे प्रतिनिधी मंडळानी निवेदनातुन दिला आहे . यावेळी माकप तालुका सचिव दिलीप शापामोहन, महादेव गारपवार, तिवसा शहर सचीव अजय गारपवार, मोहीनी शापामोहन , अशोक राऊत , पुंडलीक पापणकर, लताताई पापणकर, सुरेश भारती, रामगोपाल निमावत ईत्यादींचा सहभाग होता.

### संयुक्त रिपब्लिकन आघाडीचे

आरोग्याचे प्रश्न दूर करण्याकरिता विविध योजना तयार करून शिक्षणाचे खाजगीकरण बंद करून शासकीय शाळा कॉलेजमध्ये उच्च प्रतीचे शिक्षण गरिबांना मिळावे यासाठी कार्य केले जाणार आहे,असा आघाडीचा जाहीरनामा आहे. आघाडीचे राष्ट्रीय उपाध्यक्ष प्राचार्य गोपीचंद मेश्राम यांच्या निवास्थानी झालेल्या बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयानुसार पार्टीने उमेदवार रिंगणात उतरविले आहे आणि आपला जाहीरनामा सादर केलेला आहे. पत्रकार परिषदेत डॉ.पी एस खडसे, दादासाहेब क्षीरसागर, सतीश शियाले, रमेशचंद्र रामटेके, मनोहर घोडेसवार, ओमप्रकाश बनसोड, प्रभाकर घोडेसवार, महादेवराव खंडारे, अशांत रंगारी आदि उपस्थित होते.

### आज उपमुख्यमंत्री शिंदे यांची

सकाळी १०.४५ वाजता उपमुख्यमंत्री शिंदे मुंबई वरून अमरावती साठी निघणार असून ११.४५ वाजता अमरावती विमानतळावर त्यांचे आगमन होणार आहे. तेथून ते कार ने नेहरू मैदानावर सभास्थळावर पोहोचतील. त्यांच्यासोबत माजी आमदार कॅप्टन अभिजीत अडसूळ, सचिव संजय मोरे राहतील. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे येथून मतदारांना संबोधित करणार असून सभा झाल्यावर उपमुख्यमंत्री अमरावती विमानतळावरून दुपारी दीड वाजता अकोला साठी रवाना होतील. अकोला मध्ये दुपारी दोन वाजता आंबेडकर मैदानावर त्यांची जाहिर सभा आहे. ही सभा झाल्यावर ३.१५ वाजता अकोल्यावरून ते मुंबईला रवाना होतील. अशी माहिती शिवसेना उपनेता व माजी आमदार ज्ञानेश्वर धाने पाटील यांनी दिली.

### रतन इंडिया कंपनीच्या कामगारांनी

दुसऱ्या दिवशी सुद्धा रतन इंडिया व्यवस्थापकाने कोणत्याही प्रकारची सकारात्मक चर्चा न केल्याने आंदोलन चिघळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. उपोषणकर्ते विवेक गुल्हाने यांची प्रकृती खालावली आहे. त्यांना अशक्तपणा ,चक्कर येणे आदि त्रास जाणवू लागला आहे. कामगारांच्या हक्कासाठी आम्ही माघार घेणार नाही असा ठाम इशारा यावेळी देण्यात आला आहे. या दरम्यान मंगळवारी आमदार राजेश वानखडे यांनी उपोषणकर्त्यांची भेट घेऊन त्यांना धीर दिला. रतन इंडिया व्यवस्थापकांचा त्यांनी समाचार घेतला. विवेक गुल्हाने यांच्या उपोषणाला त्यांनी समर्थन दिले. कामगारांच्या मागण्या पूर्ण झाल्या नाही तर तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला. या आंदोलनाला परिसरातील वाघोली, डवरगांव येथील नागरिकांनी पाठिंबा दर्शविला आहे. प्रकल्पामुळे रोजगारांच्या नावाखाली मुलांचे शोषण होत आहे.दुसरीकडे वाघोली गावात रतन इंडिया च्या उडणाऱ्या राखेमुळे नागरिक हैराण झाले आहे. कामगारांच्या हक्कासाठी हे आंदोलन पेटले आहे. यामुळे संतापलेल्या कार्यकर्त्यांनी आज रेल्वे रोखून आक्रोश प्रगट केला. रेल्वे रुळावर बसून कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली आणि प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्न निर्माण केले. रेल्वे रोखणा-यांमध्ये भाजप तिवसा शहराध्यक्ष अजय गुल्हाने, विजय भुयार, ऋषिकेश चांगोले, नितीन काळे, मिलिंद पाटील, आकाश गुल्हाने, अनिकेत बारोटकर, सचिन हटवार, प्रतीक नंदनवार यांचा सहभाग होता. आरपारच्या भूमिकेवर आता कामगार पोहोचले आहे.

### जिल्ह्याच्या विकासासाठी एकत्रितरित्या

प्रश्नासाठी उपाययोजना करण्यात याव्यात. सुरवातीला बफरमधील १५ गावांवर लक्ष केंद्रीत करावे. पीएम मित्रा पार्कमध्ये वीज केंद्र उभारण्यासाठी कार्यवाही करण्यात यावी. उद्योग भवनातील जागा आयटी पार्कलाच देण्यात यावी. सिट्रस इस्टेटचा आढावा घेण्यात यावा. याठिकाणी टिश्यू कल्चरची सुविधा दिल्यास शेतकऱ्यांना याचा लाभ होईल. बाजार समितीमध्ये कोल्ड स्टोरेज उभारण्यात आले आहे. याचा लाभ शेतकऱ्यांना देण्यात यावा. तसेच पोलिसांची मदत घेऊन इतवारा येथील उड्डाणपुलाचे काम करण्यात यावे. रिद्धपूर येथील मराठी भाषा विद्यापिठाने जमिन संपादन करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी येरेकर यांनी दिले.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ बुधवार, ७ जानेवारी २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## एकांबा-शिरपूर रस्त्यासाठी मनसेचे रास्ता रोको आंदोलन

### अधिकाऱ्यांकडून तत्काळ काम सुरू करण्याचे लेखी आश्वासन

**■ प्रतिनिधी | मालेगाव ■**

**तालुक्यातील एकांबा ते शिरपूर या रस्त्याच्या दुरवस्थेविरोधात आज दिनांक ५ जानेवारी रोजी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. हे आंदोलन मनसे जिल्हाध्यक्ष राजू पाटील किडसे यांच्या अध्यक्षतेखाली, मालेगाव तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर गवळी यांच्या नेतृत्वात पार पडले.**



गेल्या एक ते दीड वर्षापासून संबंधित कंत्राटदाराकडून रस्त्याचे काम रखडवण्यात आले होते. त्यामुळे वाहनचालक व नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. या गंभीर बाबीकडे लक्ष वेधण्यासाठी मनसेने आक्रमक भूमिका घेत रास्ता रोको आंदोलन केले. आंदोलनाची दखल घेत सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता जोगदंड यांनी आंदोलनस्थळी भेट देत तत्काळ रस्त्याचे काम सुरू करण्यात येईल, असे लेखी स्वरूपात आश्वासन दिले. तसेच ज्या कंत्राटदारांनी कामात दिरंगाई केली आहे, त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. या लेखी आश्वासनानंतर मनसेच्या वतीने रास्ता रोको आंदोलन मागे घेण्यात आले.

या आंदोलनावेळी मनसे जिल्हा सचिव तथा वाहतूक सेना जिल्हाध्यक्ष गजानन वैरागडे, मालेगाव जिल्हा उपाध्यक्ष आतिश डहाळे, मालेगाव तालुका उपाध्यक्ष रामेश्वर वाघ, अमोल बाविस्कर, राजू हिंगणे, विद्यार्थी सेना जिल्हाध्यक्ष गजानन कडणे, विद्यार्थी सेना जिल्हा उपाध्यक्ष अनिकेत शेटे, शिरपूर शहर सुनील देशमुख, मालेगाव शहर अध्यक्ष सुभाष गाभणे, मालेगाव शहर उपाध्यक्ष योगेश लहुटे, वाशिम जिल्हा उपाध्यक्ष उमेश टोलमारे, वाशिम शहर उपाध्यक्ष आकाश लोलप, सर्कल अध्यक्ष महादेव डाखोरे यांच्यासह शेकडो मनसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मालेगाव एसटी बस स्थानकाचे काम प्रगती पथावर

**■ प्रतिनिधी | मालेगाव ■**



शहरातील एसटी बस स्थानकाचे नूतनीकरण व विस्तारीकरणाचे काम सुरू असताना हे काम सध्या प्रगतीपथावर आहे बस स्थानकाच्या बांधकामामुळे बस स्थानक परिसराचे सौंदर्यकरण होणार असून प्रवाशांसाठी सुविधा उपलब्ध होणार आहे सुरू असलेल्या नवीन बांधकामात आठवडी बाजार रस्त्यावरील मुख्य द्वाराच्या बाजूला व्यापारी गाळे काढल्यास निश्चितच एसटी महामंडळाच्या उत्पन्नात भर पडेल त्यामुळे गाळे काढण्यात यावी अशी मागणी केल्या जात आहे

मालेगाव शहर तालुक्याचे ठिकाण असून या ठिकाणी तहसील कार्यालयासमोर असणारे नवीन बस स्थानक हे असुविधा युक्त होते या ठिकाणी कोणत्याच प्रकार च्या सुविधा प्रवाशांना नव्हत्या त्यामुळे प्रवाशांना अतोनात त्रास सहन करावा लागत होता प्रवाशांना होणारा त्रास व तालुक्यातील महत्त्वाचे असणारे एसटी बस स्थानक लक्षात घेता या बस स्थानकाचे नूतनीकरण व विस्तारीकरण चे काम महाराष्ट्र राज्य एसटी परिवहन महामंडळाच्या तर्फ हाती घेण्यात आले होते तर मागील अनेक महिन्यापासून शहरातील एसटी बस स्थानकाच्या बांधकाम सुरू होते हे बांधकाम सध्या प्रगतीपथावर असून अंतिम टप्प्यात आले आहे बांधकामामुळे एसटी बस स्थानक व परिसराला सौंदर्गीकरण प्राप्त झाले आहे तसेच या कामामुळे प्रवाशांना सुद्धा सुविधा मिळणार आहे बांधकामात प्रवाशांची सुविधा लक्षात घेता अत्याधुनिक मुत्रीघर स्वच्छालय प्रसाधन या सह पिण्याच्या पाण्याची व्यवस्था त्याचबरोबर प्रत्येक प्लॅटफॉर्मवर पंख्याची व्यवस्था प्रवाशांना बसण्याची व इतर सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी ही प्रवाशासह शहरातील नागरिकातर्फ केल्या जात आहे.

**व्यापारी गाळे बांधल्यास एसटी महामंडळाच्या उत्पादनात होणार वाढ :** शहरातील तहसील कार्यालय तसेच मुख्य आठवडी बाजार रस्त्यावर एसटी बस स्थानक असून महत्त्वाच्या ठिकाणी असणाऱ्या या एसटी बस स्थानकाचे मुख्य प्रवेशद्वार हे आठवडी बाजार कृषी उत्पन्न बाजार समितीच्या रस्त्यावरून ठेवण्यात आलेले आहे त्यामुळे या मुख्य प्रवेशद्वाराच्या आजूबाजूच्या परिसरात व्यापारी गाळे बांधल्यास निश्चितच एसटी महामंडळाच्या उत्पन्नात वाढ होईल तसेच या ठिकाणी येणाऱ्या प्रवाशांना सुद्धा सुविधा उपलब्ध होईल तरी हे लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्य एसटी परिवहन महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष द्यावे या ठिकाणी व्यापारी गाळे बांधावे अशी मागणी ही अनेकातर्फ केल्या जात आहे

## अन् प्रचारातच सुटला पाणीप्रश्न

### सागर भारुका यांच्या तत्परतेने अनिकटवासीयांना दिलासा





गेल्या अनेक वर्षांपासून सागर भारुका कुठलेही पद किंवा नगरसेवक नसताना सुद्धा प्रभागातील नागरिकांच्या पाणी प्रश्न असो की, साफसफाई, विद्युत् सुविधा यांसारख्या समस्यांना सोडवत आहे. त्यांच्या कार्याची पावती खुद्द प्रभागातील, परिसरातील अनेक नागरिक स्वतः बोलून दाखवतात. नगरसेवक नसताना सुद्धा एखाद्या नगरसेवकापेक्षा जास्त वलय हे सागर भारुका यांचे असल्याने त्यांची जनसामान्यात एक सच्चा सेवक म्हणून प्रतिमा आहे.

**■ प्रतिनिधी | अकोला ■**

निवडणूक काळ म्हटला की आश्वासनांची रेलचेल सुरू असते. मात्र, प्रभाग क्रमांक १२ (ड) मध्ये शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उमेदवार तथा युवा नेते सागर भारुका यांनी केवळ आश्वासनांपुरते न थांबता प्रत्यक्ष कृतीतून 'गतीमान नेतृत्व' कशाला म्हणतात, याचे दर्शन घडवले आहे.

प्रभागातील सिव्हिल लाईन व खोलेश्वर परिसरात प्रचार सुरू असताना सागर भारुका अनिकट भागात पोहोचले. यावेळी स्थानिक नागरिकांनी भर हिवाळ्यात भेडसावणाऱ्या तीव्र पाणीटंचाईची समस्या मांडली. बोअरवेल नादुरुस्त झाल्याने महिलांना पाण्यासाठी मोठी पायपीट करावी लागत असल्याचे वास्तव समोर आले.

तक्रारी ऐकताच क्षणाचाही विलंब न करता सागर भारुका यांनी प्रशासकीय यंत्रणेशी थेट संपर्क साधला. 'लोकांना पाणी मिळत नसेल तर प्रचार महत्त्वाचा नाही, पंप आजच्या आज दुरुस्त झाला पाहिजे,' अशा ठाम शब्दांत त्यांनी अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. त्यांच्या या तत्परतेनंतर काही तासांतच बोअर दुरुस्तीचे कामगार घटनास्थळी दाखल झाले आणि नादुरुस्त पंप दुरुस्त करण्यात आला. त्यामुळे अनिकट भागातील नागरिकांचा पाणीप्रश्न तातडीने सुटला.

या कामात गोलू शर्मा, कुणाल शर्मा, आकाश ठाकूर, शुभम बुंदेले, दीपेश ठाकूर व निलेश श्रीनाथ यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. प्रचारादरम्यानच मूलभूत समस्या सोडवणारा नेता पाहून स्थानिक नागरिकांनी समाधान व्यक्त केले. 'नेते येतात, आश्वासन देतात आणि निघून जातात; पण सागर भारुका यांनी प्रत्यक्ष काम करून दाखवले,' अशी प्रतिक्रिया एका नागरिकाने दिली.

दरम्यान, 'लोकांच्या अडचणी सोडवण्यासाठी निवडून येण्याची वाट पाहण्याची गरज नाही. सत्ता असो वा नसो, जनसेवाच आमची प्राथमिकता आहे,' असे सागर भारुका यांनी सांगितले. धाडसी निर्णयक्षमता, कामाची गती आणि जनतेशी थेट नाते यामुळे सागर भारुका हे संपूर्ण प्रभागात चर्चेचा विषय ठरत असून प्रभाग १२ च्या विकासासाठीचा 'तडफदार' चेहरा म्हणून ते पुढे येत आहेत.

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा दौरा



**अकोला :** राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे उद्या (७ जानेवारी) अकोला येथे येत आहेत. त्यांचा दौरा पुढीलप्रमाणे :

दु. १.४५ वा. अमरावतीहून अकोला विमानतळ येथे आगमन व मोटारीने सभास्थळी रवाना, दु. २ वा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मैदान, जुने शहर, अकोला येथे जाहीर सभा, दु. ३ वा. मोटारीने अकोला विमानतळाकडे प्रयाण, दु. ३.१५ वा. विमानाने मुंबई विमानतळाकडे प्रयाण.


### जाहीर नोटीस

सर्व जनतेस या जाहीर नोटीस द्वारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार नामे भुजंगराव गणपत भालेराव, रा. लोणी गवळी, ता. मेहकर, जि. बुलडाणा हे ईक्वीटास स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड, शाखा मेहकर यांचे कडून रु. ४,३०,०००/- (चार लाख तीस हजार रुपये फक्त) रकमेचे कर्ज घेत असून सदरहू कर्ज हे खालील मालमत्ता बँकेकडे गहाण ठेऊन घेत आहेत. त्या मालमत्तेचे वर्णन - मौजे लोणी गवळी, ता. मेहकर, जि. बुलडाणा येथील प्लॉट क्र. २०, सर्वे क्र. २१/१ब (जुना) व गट क्र. १५९ (नवीन) सदर प्लॉट हा वि. तहसीलदार साहेब मेहकर यांनी रे.के.नं.३६/१५/८८-८९ या प्रकरणात दि. २७/०९/१९९० रोजी आदेश पारीत करून निवासी प्रयोजनार्थ बिनाशेतीकडे परावर्तीत केला आहे. सदर प्लॉटचे एकुण क्षेत्रफळ ११०७ चौ. फुट म्हणजेच १०२.७९ चौ.मिटर, ज्याच्या चतु:सीमा पूर्वेस – प्लॉट क्र. १९; पश्चिमेस - प्लॉट क्र. २१; उत्तरेस - १८ फुट रुंदीचा रस्ता; दक्षिणेस - प्लॉट क्र. ३१ या प्रकारे आहेत. येणेप्रमाणे सदरहू वरील वर्णनाच्या व चतु:सीमेच्या आतील मिळकती संबंधी इतर कुणासही कसल्याही प्रकारचा अधिकार, हक्क, हित संबंध, बोजा, गहाण किंवा काहीही वाद असल्यास त्यांनी आमच्याकडे सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३ दिवसाचे आत लेखी हरकत संबंधित कागदपत्रांसह दयावी. वरील मुदतीत हरकत प्राप्त न झाल्यास सदर मालमत्ता ही बिन बोजा व बिन भानगडीची असल्याचे समजून आमचे पक्षकार पुढील व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कुणाची काहीही हरकत व उजर आमचे पक्षकारावर लागू व बंधनकारक राहणार नाही. करिता ही जाहीर नोटीस.

अकोला,
दि. ०६/०१/२०२६.

**ॲड. एस. डी. तायडे**
जगदंबा नगर, खामगांव रोड,
शेगांव. मो. ९७३०८२९९२८

### जाहीरनामा

सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, अर्जदार मीना गुणवंत गायकवाड रा. वाशिम ता. जि. वाशिम यांनी संदर्भीय मा. जिल्हाधिकारी वाशिम यांचे मार्फत अर्ज या कार्यालयात सादर केला असून त्यांनी त्यांचे अर्जामध्ये नमुद केले आहे की, माझी मौजे केकतउमरा येथे गट नं ३९९, ४००, ४०४ व ४१३ मध्ये जमिन असून त्यामध्ये माझे नांव चुकीने मीना दिलीप गायकवाड असे झालेले आहे परंतु माझे नांव हे मीना गुणवंत गायकवाड असे आहे. त्याबाबत मुळ कागदपत्रे व राजपत्र सुध्दा सादर केले आहे. तेव्हा सदर राजपत्राप्रमाणे ऑन लाईन ७/१२ मध्ये दुरूस्ती करण्याबाबत अर्ज या कार्यालयात सादर केला आहे.

तेव्हा अर्जदार यांचे अर्जानुसार मौजे केकतउमरा येथील गट नं. ३९९, ४००, ४०४ व ४१३ येथील त्यांचे ताब्यातील व वहीतीमधील ७/१२ वर मीना दिलीप गायकवाड झाले असून त्याऐवजी मीना गुणवंत गायकवाड अशी दुरूस्ती करण्यास हरकत व आक्षेप असल्यास सदर जाहीरनामा प्रसिध्द झाल्याचे दिनांकापासून १५ दिवसाचे आत त्यांनी लेखी या कार्यालयात कळवावे. मुदतीनंतर प्राप्त आक्षेप/हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- १८/१२/२०२५
ठिकाण :- वाशिम.

शिक्का

स्वा
**(निलेश पळसकर)**
तहसिलदार वाशिम


## मांजामुळे मानव, पशुपक्ष्यांना धोके

### खुलेआम विक्री थांबवण्याची गरज



**■ प्रतिनिधी | मालेगाव ■**

मकर संक्रांतीच्या पार्श्वभूमीवर नायलॉन मांजाच्या वापरामुळे मानव, पशुपक्षी व पर्यावरणाला होणाऱ्या गंभीर धोक्यांच्या मुळें मोठा अनर्थ घडण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. मकर संक्रांतीदरम्यान पतंग उडविण्यासाठी नायलॉन मांजाचा सर्रास वापर होतो. यामुळे दुचाकीस्वार, पादचारी जखमी होण्याच्या घटना घडत आहेत. तसेच पक्षी व प्राणी मृत्युमुखी पडण्याचे प्रकार वाढले आहेत. नायलॉन मांज जैवविघटन न होणारी असल्याने पर्यावरणावर दीर्घकालीन दुष्परिणाम होत आहेत. शासनाने नायलॉन मांजाच्या वापरावर बंदी घातलेली असतानाही काही ठिकाणी त्याची खुलेआम विक्री व वापर सुरू असल्याबाबत नागरिकांनी तीव्र चिंता व्यक्त केली आहे. पोलीस प्रशासनाकडे नायलॉन मांजाची विक्री, साठवणूक व वापर करणाऱ्यांवर कठोर कारवाई करणे, शहरातील प्रमुख चौक व संवेदनशील ठिकाणी विशेष पथक तैनात करणे, नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी सूचना व आवाहन जारी करणे, तसेच मकर संक्रांतीच्या कालावधीत नियमित गस्त वाढवण्याची मागणी करण्यात आली आहे.

### पैशाने मतदार विकत घेणाऱ्यांना निवडून देऊ नका! पत्रकार संघाच्या जनहित परिसंवादात ठाम सूर

## 'अविरोध' निवडणुकांपेक्षा पदांचा जाहीर लिलावच करा - ज्येष्ठ संपादक प्रकाश पोहरे यांचा संताप

**■ प्रतिनिधी | अकोला ■**

पैशातून सत्ता आणि सत्तेतून पैसा या दुष्ट चक्रात लोकशाहीची अक्षरशः वाताहत सुरू आहे. निवडणुका म्हणजे सेवा नव्हे तर व्यवहार बनत चालल्या असून वारेमाप पैसा खर्च करून मतदार विकत घेण्याचे प्रकार खुलेआम घडत आहेत. अशा परिस्थितीत पैसा वाटून मते मिळवू पाहणाऱ्यांना मतदारांनी ठामपणे नाकारले पाहिजे, असा कडवा संदेश मंगळवारी येथे पार पडलेल्या जनहित परिसंवादातून देण्यात आला.

जिल्हा पत्रकार संघ, महाराष्ट्र बहुजन पत्रकार संघ, श्रमिक पत्रकार संघ व दखल यांच्या संयुक्त विद्यमाने पत्रकार दिनाचे औचित्य साधून येथील प्रमिलाताई ओक सभागृहात 'नगरसेवक कसा असावा आणि कसा नसावा' या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आयोजित या कार्यक्रमात मान्यवरांनी सध्याच्या राजकीय व प्रशासकीय परिस्थितीवर तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली.



परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी बोलताना ज्येष्ठ संपादक व शेतकरी नेते प्रकाश पोहरे यांनी 'अविरोध' निवडणुकांवर जोरदार प्रहार केला. जर गुंडगिरी, पैसा आणि दबावातून उमेदवार अविरोध निवडून येत असतील, तर अशा निवडणुकांपेक्षा सरकारने या पदांचा जाहीर लिलावच करावा; किमान सरकारी तिजोरी तरी भरेल, असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित केला.

व्यासपीठावरून बोलताना अनेक वक्त्यांनी नगरसेवक हा किमान शिक्षित, जबाबदार व मूलभूत सुविधांची जाण असलेला असावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. एकेकाळी 'बगीच्यांचे शहर' म्हणून ओळख असलेल्या अकोल्याची आज दयनीय अवस्था झाली असून याला निष्क्रिय नगरसेवकांइतकेच जबाबदार मतदारही आहेत, अशी स्पष्ट भूमिका मांडण्यात आली.

शहरातील बंद पडलेली सार्वजनिक वाहतूक, सार्वजनिक शौचालयांचा अभाव, खराब रस्ते, महिलांना भोगावे लागणारे हाल या मुद्द्यांवर वक्त्यांनी सविस्तर प्रकाश टाकला. नगरसेवक चुकीचे काम करू नयेत यासाठी नागरिकांनी कायम सजग राहणे गरजेचे असल्याचेही मत व्यक्त करण्यात आले.

या परिसंवादात डॉ. संजय खडक्कर, रामप्रकाशजी वर्मा, डॉ. अर्चना पोटे-सपकाळ, डॉ. नदीम, सौ. सोनाली मोरे, चंद्रकांत झटाले, प्रा. मुकुंद भारसाकळे, पुरुषोत्तम आवारे पाटील, ठाकूरदास चौधरी आदी मान्यवरांनी विचार मांडले. कार्यक्रमाला जिल्हा माहिती अधिकारी हर्षवर्धन पवार, अखिल भारतीय मराठी पत्रकार संघाचे सिद्धार्थ शर्मा, जिल्हाध्यक्ष शौकतअली मिरसाहेब, संजय खांडेकर, प्रबोध देशपांडे, प्रदीप गुरुखुद्दे यांच्यासह पत्रकार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. संचालन संजय खांडेकर व ॲड. सुधाकर खुमकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन शौकतअली मिरसाहेब यांनी केले.

**'यापेक्षा पदांचा लिलाव कराष्ठ' – प्रकाश पोहरे**

अध्यक्षीय भाषणात ज्येष्ठ संपादक प्रकाश पोहरे यांनी रोखठोक शब्दांत व्यवस्थेवर टीका केली. स्वातंत्र्याला ८० वर्षे उलटूनही लोकप्रतिनिधी नागरिकांना मूलभूत सुविधा देऊ शकत नसतील, तर ही लोकशाहीची शोकांतिका असल्याचे त्यांनी नमूद केले. शासनाच्या अखत्यारीतील जवळपास सर्वच संस्था सरकारने ताब्यात घेतल्याने आता न्यायाची अपेक्षाच उरलेली नाही, अशी खंत व्यक्त करत शेतमालाच्या भाववाढीच्या आश्वासनांचा फोलपणा त्यांनी उघड केला. जनतेसाठी खरोखर काम करणारे, वेळ देणारे आणि निस्वार्थ सेवा करणारे उमेदवारच निवडून द्या, असे आवाहन करत त्यांनी आपले भाषण समाप्त केले.




# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ४३ ■ बुधवार, ७ जानेवारी २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# रिहान अली ठरला 'आमदार श्री'चा मानकरी

## शरीरसौष्ठ स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद, सिनेअभिनेता गोविंदाची उपस्थिती

**वर्धा जनमाध्यम :** युवा एकता क्रीडा मंडळाच्या वतीने बॉडी बिल्डर्स अ‍ॅन्ड फिटनेस असोसिएशन विदर्भ व बॉडी बिल्डर्स अ‍ॅन्ड फिटनेस असोसिएशन वर्धा यांच्या संयुक्त विद्यमाने केसरीमल कन्या शाळेच्या प्रांगणात आयोजित आमदार श्री शरीरसौष्ठ स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडली. या स्पर्धेत रिहान अली याने उत्कृष्ट शरीरयष्टी, पोझिंग आणि सादरीकरणाच्या जोरावर 'आमदार श्री'चा मान पटकावला. अमर ठाकरे याने उपविजेतेपद मिळवले, तर ओम बडवाईक याने बेस्ट पोझरचा किताब पटकावला.

स्पर्धेला वर्धा शहरासह जिल्ह्यातील मोठ्या संख्येने स्पर्धक व प्रेक्षकांनी उपस्थिती लावली. या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले ते प्रसिद्ध सिनेअभिनेता गोविंदाची उपस्थिती. गोविंदाने आपल्या खास शैलीत संवाद साधत तसेच लोकप्रिय गाण्यांवर नृत्य सादर करत प्रेक्षकांची मने जिंकली. त्याच्या उपस्थितीमुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.स्पर्धा पाच वजनगटांत पार पडली. ५० ते ६०



किलो गटात रिहान अली प्रथम, लकी गोधणे द्वितीय, शकुर शेख तृतीय ठरले. ६० ते ६५ किलो गटात प्रज्वल उरकांदे प्रथम, राहुल बन्सोड द्वितीय, सोनका सलाम तृतीय आले. ६५ ते ७० किलो गटात अमर ठाकरे प्रथम, निरंजन संगीतवार द्वितीय, विक्रम कोहचरे तृतीय ठरले. ७० ते ७५ किलो गटात सुरज मसराम प्रथम, निखिल हिवसे द्वितीय, मयूर सुरकार तृतीय आले. ७५ किलोवरील खुल्या गटात ओम बडवाईक प्रथम ठरला.स्पर्धेचे उद्घाटन क्रीडा भारतीचे राष्ट्रीय संघटन मंत्री प्रसादजी महानकर यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख अतिथी म्हणून आमदार समीर मेघे, राजेश बकाणे, नगराध्यक्ष सुधीर पांगुळ, माजी खासदार रामदास तडस यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन इब्राहिम बक्श आजाद यांनी केले, तर आभार डॉ. मदन इंगळे यांनी मानले. शरीरसौष्ठव कलेला प्रोत्साहन देणारा हा उपक्रम युवकांसाठी प्रेरणादायी ठरला.

# डिजीटल, सोशल मीडियाच्या युगातही मुद्रीत माध्यमाचे महत्व अबाधित-मंगेश वरकड

## पत्रकार दिन साजरा, आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन



**वर्धा जनमाध्यम :** स्वातंत्र्यपूर्व काळात आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी वृत्तपत्राच्या माध्यमातून समाज जागृतीसोबतच सामान्य जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम केले. अलीकडच्या काळात ईलेक्ट्रॉनिक माध्यमासोबतच सोशल मीडियाचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. असे असले तरी मुद्रीत माध्यमाचे महत्व अद्यापही अबाधित आहे, असे प्रतिपादन जिल्हा माहिती अधिकारी मंगेश वरकड यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात जिल्हा माहिती कार्यालय, मराठी पत्रकार परिषद, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या संयुक्त विद्यामाने मराठी पत्रकार दिन साजरा करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष दिनेश पाटील, अजिज शेख, वरीष्ठ पत्रकार राजु गोरडे, संजय तिगावकर, निरज त्रिपाठी, आनंद शुक्ला, प्रभाकर घाटे, अनुपकुमार भार्गव आदी उपस्थित होते.

पुढे बोलतांना मंगेश वरकड म्हणाले, स्वातंत्र्यपुर्व काळात बाळशास्त्री जांभेकर यांनी सुरु केलेल्या वृत्तपत्रातून समाज प्रबोधन, समाजजागृतीचे काम केले. काही वर्तमानपत्रांनी स्वातंत्र्यलढ्यासाठी नागरिकांना प्रोत्साहन देण्याची भुमिका बजावली. पत्रकारीता काळानुरुप बदलली आहे. वृत्तपत्र प्रकाशनास येणाऱ्या खर्चामुळे वृत्तपत्राचे क्षेत्र व्यावसायिक झाल्याचे दिसून येत आहे.जिल्हा माहिती कार्यालय प्रशासन आणि माध्यमे यातील दुवा म्हणून काम करतात. जिल्ह्यात प्रशासनाच्यावतीने राबविण्यात येत असलेल्या अनेक कल्याणकारी उपक्रमांना सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी माध्यमांचे चांगले सहकार्य लाभते. पत्रकारांनी कायम बाळशास्त्री जांभेकर यांच्या पत्रकारीतेचा वारसा जोपासत समाजप्रबोधन, समाजसुधारणेची पत्रकारीता करावी, असे श्री.वरकड म्हणाले.

सुरुवातीस मराठी पत्रकारीतेचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे संचलन संघटनेचे अध्यक्ष दिनेश पाटील यांनी केले तर आभार जेष्ठ पत्रकार राजू गोरडे यांनी मानले.

कार्यक्रमाला मोठ्या संख्येने पत्रकार उपस्थित होते, जिल्हा माहिती कार्यालयातील मनोज सोयाम, दिलीप बोंडसे, पंढरीनाथ लुटे, संजय धमाने, संजय चिटटवार आदी उपस्थित होते.

# वर्ध्यात 'चौथा स्तंभ' पुरस्काराने ९ कर्तबगार सन्मानित

## -वर्धा श्रमिक पत्रकार संघ, विविध क्षेत्रांतील व्यक्तींच्या कर्तुत्वाची घेतली दखल

**वर्धा जनमाध्यम-** वर्धा श्रमिक पत्रकार संघाच्या वतीने मंगळवारी, ६ जानेवारीला आयोजित मराठी पत्रकारदिन समारंभात विविध क्षेत्रांतील कर्तबगार व्यक्तींना 'चौथा स्तंभ' पुरस्काराने मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. मंगळवारी, ६ रोजी स्थानिक धुनिवाले देवस्थान सभागृहात या पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी खा. रामदास तडस होते. ज्येष्ठ शेतकरी नेते विजय जावंधिया यांची प्रमुख वक्ते होते. आमदार राजेश बकाने, जिल्हा माहिती अधिकारी मंगेश वरकड, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते सुनील बुरांडे, संघटनेचे पदाधिकारी डॉ. राजेंद्र मुंढे, गजानन गावंडे, रमेश निमजे, इक्राम हुसैन यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते मराठी वत्तपत्रसष्टीचे जनक बाळशास्त्री जांभेकर, संत दादाजी धुनिवाले यांच्या प्रतिमेला मालार्पण आणि दीपप्रज्वलनाने समारंभाचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी स्व. वामनराव दिवे ट्रस्टचा सिंचन व शेती क्षेत्र पुरस्कार सुरेश पाटील (हळदगाव), 'ज्येष्ठ पत्रकार सुरेश धोपटे स्मृती पत्रकारिता पुरस्कार मनोज भोयर (मुंबई), बबीबाई नंदकिशोर जावंधिया स्मृती पत्रकारिता पुरस्कार वैष्णवी नवले (साहूर) या विद्यार्थिनीला, तर पत्रकार प्रा. डॉ. प्रवीण वानखेडे स्मृती पत्रकारिता पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार सूर्यप्रकाश भट्टड (आर्वी) आणि प्रवीण होणाडे यांना, प्रशांत हेलोंडे स्मृती पत्रकारिता पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार रमेश लोंढे (हिंगणघाट), तर मनोज मुते स्मृती पत्रकारिता



पुरस्कार वृत्तवाहिनीचे पत्रकार पराग ढोबळे (नागपूर), आदर्श पालक सन्मान पुरस्कार वर्धा येथील डॉ. राजेंद्र डागा व डॉ. मिना डागा (आयपीएस डॉ. अभय डागा यांचे पालक) यांना, तर ज्येष्ठ वृत्तपत्र विक्रेता सन्मान पुरस्कार मनोहर मुडके (वर्धा) यांना प्रदान करण्यात आला. रोख रकम, शाल-श्रीफळ आणि पुष्पगुच्छ असे पुरस्काराचे स्वरुप होते.ल प्रास्ताविक संघटनेचे अध्यक्ष प्रवीण धोपटे, संचालन सहसचिव प्रफुल्ल व्यास यांनी केले. उपाध्यक्ष गजानन गावंडे यांनी आभार मानले. कार्यक्रमाला माध्यम प्रतिनिधी, विविध क्षेत्रांतील मान्यवर, वाचकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

**कर्मचारी व शेतक-यांतील आर्थिक दरी भयावह - जावंधिया**

शेतकरी, शेतमजूर आणि असंघटित कामगारांच्या प्रश्नांकडे सरकारचे दुर्लक्ष होत आहे. कर्मचारी व शेतकऱ्यांतील आर्थिक दरी भयावह झाल्याचे मत शेतकरी नेते विजय जावंधिया यांनी व्यक्त केले. पूर्वी कापसाला एमएसपी व बोनस मिळत होता; मात्र योजना बंद झाल्याने आज कोणत्याही पिकाला हमीभाव नाही. एमएसपी नसेल तर शेतकऱ्यांनी कर्ज कसे फेडायचे, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. विकासाच्या नावावर मोठे कर्ज घेतले जाते, तर शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी कर्ज का घेतले जात नाही, असेही ते म्हणाले. आठव्या वेतन आयोगानुसार चपराशाला ४५ हजार रुपये मिळत असतील तर शेतकऱ्याला किमान ८०० रुपये रोज मिळायला हवा, अशी मागणी त्यांनी केली.

**पत्रकारांच्या पाल्यांसाठी शिष्यवृत्तीस प्रयत्न करणार – आ. बकाने**

आ. राजेश बकाने यांनी पत्रकार भवनाकरिता शासकीय जागा उपलब्ध झाल्यास आमदार निधीतून ५० लाख रुपये देण्याची ग्वाही दिली. पत्रकारांच्या पाल्यांसाठी शिष्यवृत्ती व मुंबईत पत्रकार भवन उभारण्याबाबत भविष्यात काम करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

**पत्रकारांची जबाबदारी वाढलीय – माजी खा. तडस**

माजी खासदार रामदास तडस यांनी शेतकरी आंदोलक-नेत्यांनी राजकारणापासून दूर रहावे, असे मत व्यक्त केले. शेतकरी आंदोलन टिकण्यासाठी ताकद निर्माण होणे आवश्यक आहे. नेत्यांमुळेच अनेकदा शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याचे त्यांनी स्पष्टपणे सांगितले. या काळात पत्रकारांची जबाबदारी वाढली आहे. जनतेनेही आपली मानसिकता बदलण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

# घरी कोणी नसल्याचा फायदा घेत चोरट्यांचा डाव

## -कपाट फोडत सुमारे १ लाखांचा ऐवज लंपास

**समुद्रपूर जनमाध्यम :** शहरातील वार्ड क्रमांक १३ मध्ये घरी कोणी नसल्याचे पाहून अज्ञात चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून कपाट फोडत सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा सुमारे १ लाख रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली असून परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

अंगणवाडी शिक्षिका संगीता मुरलीधर हिंगाने यांच्या मुलाचे लग्न जुळल्याने त्यांनी काही सोन्याचे दागिने तयार करून ते घरातील कपाटात सुरक्षित ठेवले होते. लग्नसमारंभाच्या अनुषंगाने चर्चा करण्यासाठी त्या रात्री भावाकडे समुद्रपूर येथे गेल्या होत्या व तेथेच मुक्काम केला. याच संधीचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी रात्रीच्या वेळी घराला लावलेले कुलूप तोडून घरात प्रवेश केला.

घरात प्रवेश केल्यानंतर चोरट्यांनी कपाट फोडून त्यातील रोख रक्कम दहा हजार रुपये तसेच सोन्याचे टॉप्स, डोळ, डोरले, तोरड्या, जोडवे आणि चांदीची मूर्ती असा ऐवज चोरून नेला. सकाळी संगीता हिंगाने घरी परतल्या असता घराचे कुलूप तुटलेले दिसून आले. त्यांनी तात्काळ समुद्रपूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

माहिती मिळताच ठाणेदार रवींद्र रेवतकर हे पोलीस कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी दाखल झाले. ठसे तज्ज्ञ व श्वान पथकाला पाचारण



करण्यात आले. श्वान बायपासपर्यंत गेले असून चोरटे तेथून वाहनाने पसार झाले असावेत, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. घटनास्थळी उपविभागीय पोलीस अधिकारी यांनीही भेट दिली. पुढील तपास समुद्रपूर पोलीस ठाण्याच्या पथकाकडून सुरू असून चोरट्यांचा शोध घेण्यासाठी प्रयत्न वेगाने सुरू आहेत.

# पोलीस वर्धापन दिनानिमित्त वर्धा पोलीस मुख्यालयात भव्य पोलीस प्रदर्शनी

**वर्धा जनमाध्यम :** पोलीस वर्धापन दिनाचे औचित्य साधून वर्धा येथील पोलीस मुख्यालयात भव्य पोलीस प्रदर्शनीचे यशस्वी आयोजन करण्यात आले. मा. पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली व अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या हस्ते या प्रदर्शनीचे उद्घाटन करण्यात आले. या प्रदर्शनीस जिल्ह्यातील १७ शाळा व महाविद्यालयांतील सुमारे १५०० विद्यार्थ्यांनी भेट देत पोलिसांच्या विविध विभागांची माहिती सखोलपणे जाणून घेतली.



पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर आयोजित या प्रदर्शनीत न्यायसाहाय्यक विज्ञान विभाग, वायरलेस विभाग, बॉम्ब शोधक व नाशक पथक (ँउअए), श्वान पथक, दामिनी पथक, अग्निशस्त्र व इतर शस्त्रास्त्र, सायबर विभाग, मादक पदार्थ विरोधी पथक, डायल ११२, वाहतूक नियंत्रण शाखा, तसेच पोलीस बँड पथक यांचे स्टॉल उभारण्यात आले होते. संबंधित विभागांनी वापरण्यात येणारे साहित्य, उपकरणे व कामकाजाची पद्धत विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकांसह समजावून सांगितली. श्वान पथकाच्या प्रात्यक्षिकांनी विशेष आकर्षण निर्माण केले. श्वान 'जॉनी'ने अमली पदार्थ व स्फोटक पदार्थ शोध, सॅल्यूट, वेलकम व आदेश पालनाचे प्रात्यक्षिक सादर केले. तसेच डोबरमॅन श्वानाने रनिंग, उंच उडी व लांब उडी मारून अडथळे कसे पार केले जातात, हे दाखवून विद्यार्थ्यांची मने जिंकली.

आर्म्स प्रदर्शनीत पोलिसांकडून वापरण्यात येणारी पिस्तूल, रिव्हॉल्व्हर, ए.के. ४७, ए.के. ५६, एसएलआर, दारुगोळा व ग्रेनेड याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

# पौष अंगारकी चतुर्थीनिमित्त केळझरमध्ये भक्तीचा महापूर

## -हजारो भाविकांनी घेतला श्री सिद्धिविनायक बाप्पाच्या दर्शनाचा लाभ

**सेलू जनमाध्यम :** तालुक्यातील केळझर येथील श्री सिद्धिविनायक गणपती मंदिरात पौष अंगारकी संकष्टी चतुर्थीनिमित्त मंगळवारी भाविकांची प्रचंड गर्दी उसळली. विदर्भातील अष्टविनायकांपैकी एक म्हणून ओळख असलेल्या या मंदिरात पहाटेपासूनच दर्शनासाठी लांबच लांब रांगा लागल्या होत्या. नवीन वर्षाच्या सुरुवातीस आणि पौष महिन्यात मंगळवारी आलेल्या अंगारकी चतुर्थीमुळे या दिवसाला विशेष धार्मिक महत्त्व प्राप्त झाले होते.

पहाटे पुजारी राममुरात मिश्रा यांच्या हस्ते विधिवत पूजा-अर्चा व अभिषेक करण्यात आला. शशिकांत (बंटी) ईरुटकर यांच्या हस्ते अभिषेक संपन्न झाला. सकाळची आरती तसेच मंदिर परिसरात सुरू असलेल्या भजन-कीर्तनामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला. स्थानिक भाविकांसह बाहेरगावी वास्तव्यास असलेले केळझरचे ग्रामस्थही खास दर्शनासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



चतुर्थीनिमित्त केळझर येथे दोन दिवसांची यात्रा (जत्रा) भरविण्यात आली असून यात्रेदरम्यान विविध दुकाने, खेळणी व खाद्यपदार्थांचे स्टॉल उभारण्यात आले आहेत. त्यामुळे भाविकांची संख्या लक्षणीयरीत्या वाढली आहे. भाविकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सेलू पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. वाहतूक नियंत्रण, दर्शन रांगा व गर्दी व्यवस्थापनासाठी विशेष नियोजन करण्यात आले होते.

भाविकांची कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी मंदिर समितीच्या वतीने पिण्याचे पाणी, स्वच्छता, सुलभ दर्शन व अन्य आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. समितीच्या नियोजनामुळे दर्शन प्रक्रिया सुरळीत पार पडली. अंगारकी चतुर्थीच्या पावन पर्वावर केळझरमध्ये भक्ती, उत्साह आणि शिस्त यांचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला.

# लोकनियुक्त नगराध्यक्ष सुधीर पांगुळ यांचा शिवसेनेकडून सत्कार

**वर्धा जनमाध्यम :** नुकत्याच पार पडलेल्या वर्धा नगरपरिषदेच्या निवडणुकीत शहराच्या लोकनियुक्त नगराध्यक्षपदी सुधीर पांगुळ यांची निवड जाहीर झाली. या यशस्वी निवडीनिमित्त शिवसेना जिल्हा व शहर शाखेच्या वतीने नगराध्यक्षांच्या दालनात शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला.

लोकनियुक्त प्रतिनिधी हा कोणत्याही एका पक्षाचा नसून तो संपूर्ण जनतेचा असतो, या भावनेतून शिवसेना जिल्हाप्रमुख राजेश सराफ यांच्या नेतृत्वाखाली मंगळवारी (दि. ६ जानेवारी) हा सत्कार सोहळा पार पडला. यावेळी नगराध्यक्ष सुधीर पांगुळ



यांनी शिवसेनेच्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. राज्याचे नगरविकास मंत्रालय शिवसेनेचे प्रमुख नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कक्षेत असल्याने वर्धा शहराच्या सर्वांगीण विकासासाठी शिवसेनेच्या मदतीची आवश्यकता भासणार असल्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

यावर प्रतिक्रिया देताना जिल्हाप्रमुख राजेश सराफ यांनी शहराच्या विकासासाठी शिवसेना खंबीरपणे नगराध्यक्षांच्या पाठीशी उभी राहील, अशी ठाम ग्वाही दिली. वर्धा शहरातील पायाभूत सुविधा, नागरी सोयी-सुविधा, स्वच्छता, रस्ते, पाणीपुरवठा आणि विकासकामांसाठी पक्ष सहकार्य करेल, असेही त्यांनी नमूद केले.

सत्कार सोहळ्यादरम्यान उपस्थित शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी वैयक्तिक स्वरूपातही नगराध्यक्षांचा सत्कार करून अभिनंदनाचा वर्षाव केला. कार्यक्रमाला काँग्रेस नेते शेखर शेंडे, महिला आघाडी जिल्हाप्रमुख शुभांगी ठमेकर, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख दिलीप भुजाडे, तक्रार निवारण समिती प्रमुख सुरेश पट्टेवार, उपजिल्हा प्रमुख मिलन गांधी, कामगार नेते प्रशांत रामटेके, उपशहर प्रमुख मनोज भूतडा, विनोद जमणारे, शहर समन्वयक वैभव तिजारे, उपशहर प्रमुख संतोष लांगोरे व शरद आडे, शहर समन्वयक कान्हा यादव, बाळा थोरात, बादल श्रीवास, सचिन चांडक, रंजना पट्टेवार, धनश्री थोरात, लिना जमणारे, मयुरी गांधी, नाना झिलपे, बाळकृष्ण वाघमारे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रामनगर पोलिस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

## -बनावट बांधकाम कामगार प्रमाणपत्राद्वारे शासनाची फसवणूक

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यातील बांधकाम कामगारांच्या नोंदणी व नूतनीकरण प्रक्रियेत मोठा गैरप्रकार उघडकीस आला असून, बनावट प्रमाणपत्रांच्या आधारे कामगार नोंदणी केल्याप्रकरणी रामनगर पोलिस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कामगार अधिकारी कार्यालयातील निरीक्षक रीना पोरेटे यांनी यासंदर्भात दिलेल्या तक्रारीवरून ही कारवाई करण्यात आली आहे.

इमारत व इतर बांधकाम कामगारांच्या नोंदणी व नूतनीकरणासाठी प्राप्त झालेल्या अर्जांची तपासणी सुरू असताना अनेक अर्जांमध्ये गंभीर अनियमितता आढळून आली. बांधकाम कामगार म्हणून नोंदणीसाठी किमान ९० दिवस प्रत्यक्ष काम केल्याचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. मात्र, देवळी तालुक्यातील घोडेगाव येथील सुनील महादेव उपासे (३४) याने ठेकेदार विनोद बबन राऊत (४१, रा. खातखेडा) यांच्या नोंदणी क्रमांकाच्या आधारे १ ऑगस्ट २०२० ते १ नोव्हेंबर २०२० या कालावधीतील कामाचे प्रमाणपत्र सादर करून १ सप्टेंबर २०१८ रोजी बांधकाम कामगार म्हणून नोंदणी केल्याचे निदर्शनास आले.

तसेच, घोडेगाव येथील दिवाकर कृष्णा कोल्हे (४५) याचे नूतनीकरण १ मे २०२१ ते २ ऑगस्ट २०२१ या कालावधीसाठी ऑनलाईन पद्धतीने करण्यात आले होते. याशिवाय बोरगाव मेघे येथील रोहिणी मिलिंद ब्राह्मणकर (२८) हिची नोंदणी ठेकेदार मिलिंद ब्राह्मणकर (६१, रा. बोरगाव मेघे) यांच्या नोंदणी क्रमांकाच्या आधारे करण्यात आल्याचे तपासात स्पष्ट झाले.या सर्व प्रकरणांची प्राथमिक चौकशी केली असता, इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवा शर्ती) अधिनियम १९९६ अंतर्गत सादर करण्यात आलेली नोंदणी व नूतनीकरण प्रमाणपत्रे बनावट असल्याचे निष्पन्न झाले. आरोपींनी खोट्या व बनावट कागदपत्रांच्या आधारे कामगार नोंदणी करून शासनाची आर्थिक फसवणूक केल्याचा आरोप आहे.या प्रकरणी निरीक्षक रीना पोरेटे यांच्या तक्रारीवरून रामनगर पोलिसांनी ५ जानेवारी रोजी विनोद राऊत, दिवाकर कोल्हे व मिलिंद ब्राह्मणकर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, या गैरप्रकारामागील इतर सहभागींचा शोध घेण्यासाठी पुढील तपास रामनगर पोलिसांकडून सुरू आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय




# छत्रपती शिवाजी महाराज पाटीदार समाजाचे होते

**मुंबई /प्रतिनिधी :-** राज्यात २९ महापालिका निवडणुका सुरू आहेत. त्यातच भारतीय जनता पार्टीच्या एका बड्या नेत्याने छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबाबत वादग्रस्त विधान केले आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे पाटीदार समाजाचे होते असं विधान करत केंद्रीय मंत्री आणि भाजपाचे नेते सी.आर.पाटील यांनी नव्या वादाला तोंड फोडलं आहे.

सूरतमध्ये आयोजित पाटीदार समाजाच्या कार्यक्रमात बोलताना पाटलांनी हे विधान केले. मात्र सी.आर.पाटील यांच्या विधानावरून महाराष्ट्रातील नेते चांगलेच आक्रमक झाले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांना गुजराती दाखवण्याचा हा जाणीवपूर्वक प्रयत्न असल्याचा आरोप संजय राउतांनी केला आहे. सी.आर पाटील म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज हे पाटीदार समाजाचे होते त्याचा मला आनंद आहे. त्यांनी हिंदवी स्वराज्य स्थापनेचा यशस्वी प्रयत्न केला असं त्यांनी म्हटलं आहे. सी.आर पाटील यांनी हे विधान अशावेळी केले आहे जेव्हा महाराष्ट्रात २९ महापालिका निवडणुका आहेत. त्यात मुंबई महापालिकेत मराठी विरुद्ध अमराठी असा वाद रंगला आहे. महाराष्ट्रातील उद्योग गुजरातला पळवले जात आहेत असा आरोप विरोधक सातत्याने सत्ताधारी महायुतीवर करत आहेत. त्यात छत्रपती शिवाजी महाराज हे पाटीदार समाजाचे होते असं सांगून भाजपा नेत्यांनी शिवप्रेमी जनतेची नाराजी ओढावून घेतली आहे.याबाबत खासदार संजय राउत यांनी कडाडून समाचार घेतला आहे. मी सी.आर पाटील यांचे भाषण ऐकले. त्यात छत्रपती शिवाजी महाराज यांना गुजराती दाखवण्याचा प्रयत्न करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज हिंदवी स्वराज्याचे आणि मराठा साम्राज्याचे राजे आहेत. हा महाराष्ट्राचा आणि मराठी समाजाचा फार मोठा अपमान आहे. अनेक युगपुरुष भारतीय जनता पार्टीने पळवायचा प्रयत्न केला. नेताजी सुभाषचंद्र बोस, सरदार वल्लभभाई पटेल, रवींद्रनाथ टागोर हे पळवण्याचा प्रयत्न केला पण त्याचा उपयोग झाला नाही. शेवटी आता छत्रपती शिवाजी महाराजांना गुजरातला पळवायचा प्रयत्न करत आहेत अशी टीका राउतांनी केली.

**कोण आहेत सी.आर पाटील?-** गुजरातमधील चंद्रकांत पाटील यांना सी.आर पाटील म्हणून ओळखले जाते. ते गुजरातच्या राजकारणातील भाजपाचा प्रमुख चेहरा आहेत. सध्या केंद्रीय कॅबिनेटमध्ये त्यांच्यावर जलशक्ती मंत्रालयाची जबाबदारी आहे. गुजरात भाजपा प्रदेशाध्यक्षपदही त्यांनी सांभाळले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचे अत्यंत विश्वासू अशी सी.आर.पाटील यांची ओळख आहे. त्यांचे मूळ गाव महाराष्ट्रातील जळगाव येथे असले तरी संपूर्ण राजकीय आणि सामाजिक कारकिर्द गुजरातमध्येच घडली आहे.

# तुमची विचारधारा स्वीकारत नसलो, तरी आमची विचारधारा तुम्हाला स्वीकारावीच लागेल

## मिटकरींनी भाजप नेत्यांना ठणकावले



**अकोला :** तुमची विचारधारा आम्ही स्वीकारत, नसलो तरी आमची विचारधारा तुम्हाला स्वीकारावीच लागेल, अशा शब्दात राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरी यांनी भाजप नेते आशिष शेलार यांना ठणकावले आहे. अमोल मिटकरी आणि आशिष शेलार यांच्यात जुंपली असून ऐननिवडणुकीत महायुतीत तणाव निर्माण झाला आहे. राज्यात महापालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. प्रचार रंगात आला असून महायुतीतील मित्रपक्षांमध्ये वाकयुद्ध सुरू झाले. भाजप नेते आशिष शेलार म्हणाले, आम्ही स्वातंत्र्यवीर विनायक सावरकर यांचे भक्त आहोत. आम्ही आणि आमचा पक्ष सावरकरांच्या विचारांवर चालणारे आहोत. त्यामुळे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पक्षाला सुद्धा सावरकरांचे विचार मान्य करावेच लागतील. या वक्तव्यामुळे महापालिका निवडणुकीच्या अगोदरच भाजप आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीमध्ये जुंपली आहे. आशिष शेलार यांच्या वक्तव्याला राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरी यांनी प्रत्युत्तर दिले. त्यांनी भाजपची विचारधाराच काढली.आमदार अमोल मिटकरी म्हणाले, अजित पवार व त्यांचा पक्ष तुमच्या आदर्शांच्या नेतृत्वावरच चालला पाहिजे, हा जो तुमचा अट्टाहास आहे व हे जे तुम्ही ठासून सांगत आहात त्यात किती तथ्य आहे, हे तुम्हालाच माहीत. तुर्तास इतकंच सांगेल आम्ही शिव, शाहु, फुले, आंबेडकरी चळवळीशी बांधिल व प्रामाणिक होतो, आहोत आणि राहू. तुम्हाला अपेक्षित विचारधारा आम्ही जरी स्वीकारत नसलो तरी आमच्या पक्षाची आंबेडकरी विचारधारा तुम्हाला नाईलाजाने का होईना स्वीकारावीच लागते, हे त्रिवार सत्य आहे. आमदार अमोल मिटकरी यांनी दिलेल्या प्रत्युत्तरावर आता भाजप काय भूमिका घेणार? याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार व भाजप प्रदेशाध्यक्ष आ. रवींद्र चव्हाण यांच्यातील आरोप-प्रत्यारोपातही राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरी यांनी उडी घेउन टीका केली होती. व्यवस्थित बोला, काळजी पूर्वक बोला, अन्यथा राष्ट्रवादीचा कार्यकर्ता कदापी सहन करणार नाही, अशा शब्दात आ. मिटकरी यांनी आ. रवींद्र चव्हाणांना प्रत्युत्तर दिले होते. राज्यात महापालिका निवडणूक सुरू आहे. अकोला महापालिकेत भाजव व राष्ट्रवादी अजित पवार गटाची युती आहे. त्या पार्श्वभूमीवर नेत्यांचे सूर जुळत नसल्याचे चित्र असून एकमेकांवरील टीकेनंतर भाजप व राष्ट्रवादीतील वाद आणखी पेटण्याची चिन्हे आहेत.

## काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी खासदार

# सुरेश कलमाडी यांचे निधन

**पुणे/प्रतिनिधी :** काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, पुण्याचे माजी खासदार सुरेश कलमाडी यांचे निधन झाले आहे. ते ८२ वर्षांचे होते. अनेक दिवसांपासून सुरेश कलमाडी हे आजाराने ग्रस्त होते. त्यातूनच कलमाडी यांची प्राणज्योत ६ रोजी मंगळवारी पहाटे साडेतीन वाजता मालवली.

सुरेश कलमाडी यांचा जन्म १ मे १९४४ रोजी झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण सेंट व्हिन्सेंट हायस्कूलमध्ये झाले. त्यानंतर त्यांनी पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयातून उच्च शिक्षण पूर्ण केले. त्यांनी १९६० मध्ये नॅशनल डिफेन्स अकॅडमीमध्ये प्रवेश घेतला. १९६४ ते १९७२ या काळात त्यांनी भारतीय हवाई दलात पायलट म्हणून सेवा बजावली. त्यांनी १९६५ आणि १९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धांमध्ये सक्रिय सहभाग घेतला होता.

१९७७ मध्ये कलमाडी यांनी पुणे युवक काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून राजकीय प्रवासाला सुरुवात केली. ते पुण्यातून तीन वेळा लोकसभेवर निवडून आले. तसेच त्यांनी चार वेळा राज्यसभा सदस्य म्हणूनही काम केले. पी. व्ही. नरसिंह राव यांच्या सरकारमध्ये ते रेल्वे राज्यमंत्री होते. रेल्वे अर्थसंकल्प सादर करणारे ते पहिले राज्यमंत्री ठरले होते.



ते १९९६ ते २०१२ या प्रदीर्घ काळासाठी भारतीय ऑलिम्पिक संघटनेचे अध्यक्ष होते. त्यांनी एशियन अॅथलेटिक्स असोसिएशनचे अध्यक्ष आणि भारतीय अॅथलेटिक्स महासंघाचे अध्यक्ष म्हणूनही काम पाहिले. पुण्यात दरवर्षी होणारी पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथान आणि पुणे फेस्टिव्हलसुरू करण्याचे श्रेय कलमाडी यांना जाते.२०१० मध्ये दिल्लीत झालेल्या राष्ट्रकुल स्पर्धेच्या आयोजनात भ्रष्टाचार झाल्याच्या आरोपावरून कलमाडी यांना २०११ मध्ये अटक करण्यात आली होती आणि काही काळ तुरुंगवासही झाला होता.तब्बल १५ वर्षांनंतर, २०२५ मध्ये अंमलबजावणी संचालनालयाने या प्रकरणी त्यांच्याविरोधात कोणतेही ठोस पुरावे नसल्याचे सांगत न्यायालयात क्लोजर रिपोर्ट सादर केला. न्यायालयाने तो मान्य केल्याने कलमाडी यांना या सर्व आरोपांतून क्लीन चिट मिळाली.

गेल्या काही वर्षांपासून कलमाडी हे सक्रिय राजकारणापासून दूर होते. अलीकडेच प्रकृती बिघडल्याने दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होते.

# इराणमधील तणावपूर्ण स्थिती ;

## भारताने जारी केली ट्रॅव्हल अॅडव्हायजरी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** इराणमध्ये गेल्या काही दिवसांपासून सुरु असलेल्या संघर्षामुळे परिस्थिती अधिकच तणावपूर्ण बनली आहे. या पार्श्वभूमीवर भारत सरकारने सध्या इराणमध्ये असलेल्या आणि तिकडे प्रवासास जाण्याचा विचार करणा-या भारतीय नागरिकांसाठी अधिकृत प्रवास मार्गदर्शक सूचना (ट्रॅव्हल अडव्हायजरी) जारी केल्या आहेत. परराष्ट्र मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, इराणमधील सद्यस्थिती पाहता भारतीय नागरिकांनी पुढील सूचना मिळेपर्यंत इराणचा कोणताही बिगर-जरुरी प्रवास टाळावा. जे भारतीय नागरिक कामानिमित्त किंवा शिक्षणासाठी सध्या इराणमध्ये वास्तव्य करत आहेत, त्यांनी अत्यंत सावधगिरी बाळगण्याचे आवाहन करण्यात आले आहे. विशेषत? ज्या भागात हिंसक आंदोलने किंवा मोठी गर्दी जमली आहे, अशा ठिकाणांपासून भारतीयांनी लांब राहावे, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. भारत सरकारने इराणमधील भारतीयांना स्थानिक बातम्या आणि घडामोडींवर सतत लक्ष ठेवण्यास सांगितले आहे. तसेच, तेहरानमधील भारतीय दूतावासाच्या अधिकृत वेबसाइट आणि सोशल मीडिया खात्यांच्या संपर्कात राहून वेळोवेळी जारी होणा-या सूचनांचे पालन करण्यास सांगण्यात आले आहे. जे भारतीय नागरिक निवासी व्हिसावर तिथे राहत आहेत आणि ज्यांनी अद्याप दूतावासाकडे आपली नोंदणी केलेली नाही, त्यांनी तातडीने आपली माहिती नोंदवावी, जेणेकरून आपत्कालीन परिस्थितीत त्यांच्यापर्यंत मदत पोहोचवणे सोपे होईल. इराणमध्ये गेल्या आठवडाभरात सरकारविरोधी आंदोलन सुरु असून, आंदोलक आणि सुरक्षा दलांमधील चकमकी वाढल्या आहेत. या अनिश्चिततेच्या वातावरणामुळे भारतीय नागरिकांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी केंद्र सरकारने हे महत्त्वपूर्ण पाउल उचलले आहे.

# इयत्ता चौथी आणि सातवीची शिष्यवृत्ती परीक्षा 26 एप्रिल रोजी

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता चौथी) आणि उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता सातवी) २६ एप्रिल २०२६ रोजी राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये एकाच दिवशी घेण्यात येणार आहे. या परीक्षेची अधिसूचना महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या www.mscepune.in +EÊhÉ https://puppssmsce.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली असल्याची माहिती परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी दिली. शासनमान्य शाळांमधून २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात इयत्ता चौथीमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांमधील प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा व सातवीमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांमधील उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेस प्रविष्ट होण्यासाठी अधिसूचनेत नमूद केलेल्या अटी पूर्ण करणा?या इच्छुक विद्यार्थ्यांचे ऑनलाईन आवेदनपत्र परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. शाळा माहिती प्रपत्र, आवेदनपत्र आणि शुल्क ऑनलाईन भरण्यासाठी २ फेब्रुवारी २०२६ पर्यंतचा कालावधी देण्यात आला असून विलंब, अतिविलंब आणि अति विशेष विलंब शुल्कासह २८ फेब्रुवारी २०२६ पर्यंतचा कालावधी देण्यात आला आहे. त्यानंतर कोणत्याही परिस्थितीत ऑनलाईन अथवा ऑफलाईन पद्धतीने आवेदनपत्र भरता येणार नाही, असे परीक्षा परिषदेमार्फत स्पष्ट करण्यात आले आहे.

# भाजप प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांच्या विरोधात मराठा क्रांती मोर्चाचे 'जोडे मारो' आंदोलन



**जालना :**लोकनेते पोस्टरवर नव्हे, लोकांच्या हृदयात असतात आणि त्या हृदयांवर सत्तेची मस्ती कधीच चालत नाही, अशा शब्दांत मराठा क्रांती मोर्चाने संतप्त भावना व्यक्त करत लोकनेते आणि माजी मुख्यमंत्री स्व. विलासराव देशमुख यांचा इतिहास पुसण्याची भाषा करणारे भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र देशमुख यांच्या निषेधार्थ त्यांच्या फोटोला जोडे मारो आंदोलन करण्यात आले. मंगळवार दि. ६ जानेवारी रोजी जुना जालना भागात करण्यात आलेल्या या आंदोलनात अरविंद देशमुख, अशोक पडूळ, तिरु के, मंगेश मोरे, धनंजय पोहेकर, सागर पाटील, किरण देशमुख, योगेश सोळंके, अर्जुन गायकवाड, आनंद जाधव, नितीन सुरुंग, गणेश सोळंके, अर्जुन घारे, शुभम नवघरे, गणेश कापसे, गजानन खराबे, कार्तिक काळे आधी उपस्थित होते. लातूर येथे रवींद्र चव्हाण यांनी केलेल्या वक्तव्याने भाजपचा असभ्य, असंस्कृत आणि विखारी चेहरा उघडा पडल्याची भावना व्यक्त करण्यात आली.ही साधी टीका नसून सत्तेची मस्ती आणि गुर्मी असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. यावेळी अरविंद देशमुख म्हणाले की, लोकनेत्यांचे नाव पुसण्याची भाषा वापरणे म्हणजे इतिहास, लोकभावना आणि महाराष्ट्राच्या संस्कृतीचा थेट अपमान आहे.मराठा क्रांती मोर्चा कोणत्याही राजकीय पक्षाचा नाही. हा मोर्चा सत्तेसाठी नव्हे, तर समाजासाठी उभा असलेला असून समतोल, सामाजिक भान आणि लोकशाही मूल्यांची जपणूक करणारा आहे. लातूर असो वा संपूर्ण महाराष्ट्र लोकांच्या मनातून विलासराव देशमुखांचे नाव कोणीही पुसू शकत नाही. नेतृत्वच जर विखारी असेल, तर कार्यकर्त्यांना कोणते संस्कार दिले जात आहेत, हा गंभीर प्रश्न आज महाराष्ट्रासमोर उभा राहिला आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात विलासराव देशमुख हे सुसंस्कृत, खानदानी आणि लोकनेते म्हणून कायम स्मरणात राहिले आहेत.

# ग्रंथालय चळवळीला नवे बळ देण्यासाठी शासन सर्वतोपरी सहकार्य करणार

## ● उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील

## ● राज्य ग्रंथालय परिषदेची पहिली बैठक



**मुंबई/प्रतिनिधी :** ग्रंथालय चळवळीला नवे बळ देण्यासाठी शासन सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याचे प्रतिपादन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी केले. मंत्रालयात राज्य ग्रंथालय परिषदेची बैठक झाली यावेळी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी.वेणुगोपाल रेड्डी, सहाय्यक धर्मदाय आयुक्त राम लिप्ते, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग उपसचिव तुषार महाजन, उच्च शिक्षण विभागाचे उपसचिव अमोल मुत्याल, ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष गजानन कोटेवार, ग्रंथालय संघ अमरावती विभागाचे अध्यक्ष प्रभाकर घुगे, ग्रंथालय संघ मराठवाडा विभागाचे अध्यक्ष खंडेराव सरनाईक, पुणे विभागाचे अध्यक्ष सोपान पवार, कोकण विभागाचे अध्यक्ष दिलीप कोरे,डा सिद्धी जगदाळे, डासुभाष चव्हाण, सुनील वायाळ व संबंधित अधिकारी उपस्थित होते. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले की, राज्य शासनाच्या निर्णयानुसार १६ वर्षानंतर राज्य ग्रंथालय परिषद पुन्हा गठीत करण्यात आली आहे. राज्य ग्रंथालय परिषद ही ग्रंथालय चळवळ अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने शासनास सल्ला देणारी प्रमुख परिषद आहे. ग्रंथालय चळवळ सक्षम करण्यासाठी आवश्यक आर्थिक पाठबळ देण्यात येणार असल्याचे तसेच ग्रंथालय व्यावस्थापनाच्या सर्वांगीण विकासासाठी ठोस निर्णय घेण्यात येणार असल्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री पाटील यांनी सांगितले.

बैठकीत ग्रामीण भागात वाचनसंस्कृती जोपासण्यासाठी सीएसआर निधी किंवा राजाराम मोहनराय योजना यांच्या माध्यमातून मोबाईल वाचन व्हॅन खरेदी करून ती गावे, शाळा आणि दुर्गम भागांमध्ये नेउन वाचन उपक्रम राबविण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. गाव तिथे ग्रंथालय उपक्रम राबविण्यासाठी ग्रामविकास विभागाशी समन्वय साधण्याचे निश्चित करण्यात आले. राज्य मध्यवर्ती ग्रंथालय व ६ विभागीय ग्रंथालयांमध्ये फिरते ग्रंथालय सेवा देणे योजना प्रायोगिक तत्त्वावर सुरु करणे, तसेच ई-लायब्ररी, इ लायब्ररी युनिक डेटाबेस, फिरते वाचनालय आदी विषयांवर चर्चा करण्यात आली. सार्वजनिक ग्रंथालयाचे नियतकालिक तीन वर्षानंतर तपासणी करण्यास मंजुरी देण्यात आली. बैठकीत ग्रंथालय संचालनालयाच्या २००८-०९ ते २०२४-२५ या वर्षातील अहवालांना मंजुरी देण्यात आली.

# महापालिका निवडणुकांतही काँग्रेसचा झंझावात दिसेल-हर्षवर्धन सपकाळ

**मुंबई/प्रतिनिधी :**राज्यातील २८८ नगरपालिका निवडणुकांमध्ये काँग्रेस पक्षाला चांगला कौल मिळाला असून ४१ नगराध्यक्षांसह १००६ नगरसेवक विजयी झाले आहेत. नगरसेवकांच्या २ हजार जागांवर काँग्रेस दुस-या क्रमांकावर आहे. नगरपालिका निवडणुकीतील हा झंझावात महानगरपालिकांच्या निवडणुकांमध्ये दिसेल असा विश्वास व्यक्त करत लोकशाहीविरोधी भाजपा महायुतीच्या हुकूमशाही व ठोकशाहीला जनतेने धडा शिकवावा, असे आवाहन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले आहे.

नागपूर येथे पत्रकार परिषदेत बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, निवडणूका निष्पक्ष, पारदर्शी, करणे हे निवडणूक आयोगाचे कर्तव्यच आहे पण निवडणूक आयोगाची भूमिका पाहता त्यांनी विश्वासार्हतेला हरताळ फासला आहे. वोटचोरीचा मुद्दा काँग्रेस पक्षाने उचलून धरला, शेवटी मतदार याद्यांमध्ये घोळ आहेत, हे त्यांना मान्य करावे लागले पण पुढे त्यात काही सुधारणा झालेली दिसत नाही. निवडणूक आयोगाचे काम पाहता ते सत्ताधारी पक्षाच्या सांगण्याने काम करत आहेत हे दिसते. मतदार याद्यात घोळ, मतदान प्रक्रियेसाठी तारीख पे तारीख, अर्ज भरून घेताना विरोधकांची अडवणूक व सत्ताधा-यांना मोकळीक दिली. रात्री १० वाजेपर्यंत प्रचार करण्यास मुभा दिली आहे, म्हणजे एकीकडे पैसा वाटा आणि मतदान केंद्राकडे दुर्लक्ष असा हा प्रकार आहे. आम्ही सुधारणार नाही अशीच भूमिका निवडणूक आयोगाची दिसत आहे. निवडणूक आयोग, प्रशासन व सत्ताधा-यांनी लोकशाहीचे सर्व संकेत पायदळी तुटवले असून नंगानाच सुरु आहे.

**बिनविरोधसाठी सत्ताधारी पक्षाचा तमाशा...** नगरपालिका व आता महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपा व मित्रपक्षांनी साम, दाम, दंड, भेद नितीचा वापर केला असून त्यांच्या मदतीला पोलीस, मंत्री, त्यांचे पीए तर आहेतच पण निवडणूक आयोगही त्यांना मदत करत आहे. यात विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांचीही भर पडली आहे. नार्वेकर यांनी त्यांचे भाउ, बहिण व वहिनी यांना बिनविरोध करण्यासाठी अत्यंत असभ्य वर्तन केले आहे, गुंडगिरी केली, विरोधकांना दमदाटी केली, त्याचे सीसीटीव्हीचे फुटेज प्रशासनाने गायब केले. सर्वबाजूने तक्रार झाल्यानंतर चौकशीचे आदेश दिले पण त्यातून नार्वेकर यांच्यावर कसलीच कारवाई केलेली नाही. बिनविरोध निवडणुकीच्या बाबतीत काँग्रेस पक्षाने आपली भुमिका स्पष्ट केलेली असून जेथे बिनविरोध झाले तेथे नोटाचा पर्याय ठेवा अशी मागणी आहे आणि न्यायालयात जाण्याबाबत कायदेतज्ञांशी विचारविमर्श करू असे सपकाळ म्हणाले.

**भाजपाला सर्वांच्याच आठवणी पुसायच्या आहेत..** भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्याबद्दल केलेल्या विधानावर बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, विलासराव देशमुख यांचे व्यक्तीमत्व व योगदान हे मोठे व निर्विवाद आहे. भाजपा, नरेंद्र मोदी, अमित शाह, देवेंद्र फडणवीस व रविंद्र चव्हाण यांना सत्तेचा प्रचंड अहंकार आहे. मोदी स्वत? ईश्वर असल्यासारखे वागतात व त्यांचे चेलेचपाटे हे असभ्य, विकृत विधान करत असतात, काँग्रेस पक्ष या विधानाचा निषेध करतो. पण भाजपाची मानसिकता पाहता फक्त विलासराव देशमुख यांच्याच आठवणी त्यांना पुसायच्या नाहीत तर अटलबिहारी वाजपेयी, प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे यांचे योगदानही त्यांना पुसून टाकायचे आहे. त्यांना फक्त मोदी व शाह ही दोनच नावे ठेवायची असून रेशीमबागेतील हेडगेवार व गोलवलकर यांचे फोटे काढून मोदी शाह यांचेच फोटो त्यांना लावायचे आहेत.



**देवाभाउ नाही तर टक्काभाउ..।** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सातारा जिल्ह्यातील गावात एका शेतात ड्रग्जचा मोठा कारखाना सापडला, मुंबई क्राईम बँचने कारवाई करत ४० कामगारांना ताब्यात घेतले पण एकनाथ शिंदे यांचा खासदार पुत्र श्रीकांत शिंदे यांनी हस्तक्षेप करून त्या कामगारांना सोडण्यास भाग पाडले. या ड्रग्ज प्रकरणावरून रेहमान डकैत कोण हे स्पष्ट झाले आहे. एवढा मोठा ड्रग्ज कारखाना सापडूनही मुख्यमंत्री फडणवीस यांनी एकनाथ शिंदे यांना क्लिन चिट देउन टाकली. सत्ताधारी कंत्राटातून टक्केवारी खातातच आता ड्रग्जमधूनही पैसे कमावू लागले आहेत. फडणवीस हे देवाभाउ नाही तर टक्काभाउ आहेत, अशी टीका हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. ।भाजपाचे आशिष शेलार यांच्या बद्दल। बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, सावरकर जेलमधून बाहेर आल्यानंतर त्यांनी काय केले, भारत छोडो आंदोलनाला सावरकरांचा विरोध होता. गाय ही उपयुक्त पशू आहे असे सावरकर म्हणतात. छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज यांच्याबद्दलचे सावरकरांचे विचार काय आहेत, संविधानाला त्यांचा विरोध होता, माफीनाम्यातील त्यांचा विचार याबद्दल शेलार बोलत आहेत का, त्याचा खुलासा करावा आणि सावरकर ६० रुपये पेन्शन घेत होते, ते मान्य आहे का? हे आशिष शेलारांना स्पष्ट करावे. शेलार यांच्याशी या विषयावर खुली चर्चा करण्यास काँग्रेस तयार आहे, असेही काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## मुस्कटदाबीला प्रत्युत्तर

गेल्या तीन-चार महिन्यांमध्ये भारतातील थेट परकीय गुंतवणूक वाढली असून जगभर भारतीय इंजिनिअरिंग प्रॉडक्टस आणि वाहनांच्या सुट्या भागांची मागणी वाढली आहे. म्हणजेच डोनाल्ड ट्रम्प यांचे भारताला शिक्षा करण्याचे मनसुबे हवेतच विरले आहेत. आता बदललेला भारत कोणाच्याही दबावापुढे झुकत नाही. अतिरिक्त आयात शुल्क लावून ट्रम्प भारताला नामोहरम करू शकत नाही, हे सिध्द झाले आहे. सुरुवातीला अर्थातच याचा काहीसा नकारात्मक परिणाम जाणवला. पण त्यानंतर काही गोष्टी अतिशय चांगल्या घडल्या. वर्षारंभी त्याचीच चर्चा करायला हवी. यातील पहिली बाब म्हणजे टॅरिफ युद्धामुळे आपले अमेरिकेवरील वाढते अवलंबित्व कमी झाले. हे अवलंबित्व वस्तू, सेवा वा भारतीय विद्यार्थ्यांची मानसिकता या एकूणच सामान्य नागरिकांना अमेरिकेप्रती असणारे अप्रूप अशा सगळ्याच अर्थाने होते. पण या एका घटनेने भारताला आत्मपरीक्षण करण्यास भाग पाडले. १९९१ नंतर भारतात मुक्त अर्थव्यवस्थेची सुरुवात झाली होती. परिणामस्वरूप, अनेक क्षेत्रांमध्ये वेगाने बदल दिसला होता. मात्र व्यापार धोरण क्षेत्रामध्ये हव्या त्या प्रमाणात बदल घडवले गेले नव्हते. दुसरीकडे, भारताला अन्य देशांमध्ये माल विकायचा आहे तसेच अन्य देशांनाही भारतात माल विकायचा आहे. प्रचंड लोकसंख्येमुळे भारतातील बाजारक्षेत्र प्रचंड आहे. त्यातच आपल्याकडे ६५ ते ७० कोटी मध्यमवर्ग असल्यामुळे जगाला इथल्या अवाढव्य बाजारात आपला माल विकण्याची इच्छा आणि गरज आहे. मात्र बाजार घटकांमध्ये अपेक्षित बदल झाले नसल्यामुळे भारताचे इतरांवरील परावलंबित्व वाढत होते. त्यामुळेच अमेरिकेच्या जाचक अटींनंतर भारताने आत्मनिरीक्षण करण्यास सुरुवात केली आणि बाजार सुधारणांमध्ये, आयात शुल्क धोरणांमध्ये हळूहळू बदल घडवून आणले गेले. त्याचे परिणाम लवकरच दिसून येणार आहेत. दुसरे म्हणजे डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेला पूर्वीचे उच्च स्थान पुन्हा मिळवून देण्याचा चंग बांधला असून आपला देश जगाच्या केंद्रस्थानी असेल, असे म्हणत आपण म्हणू तसे जग नाचेल, हवे तसे जगाला झुकवू शकतो असा त्यांचा विचार होता. आम्ही विश्व व्यापार संघटन, युनायटेड नेशनला मानत नाही अशीच त्यांची भूमिका राहिली. मात्र आता अनेक देशांनी अमेरिकेला त्यांची जागा, लायकी दाखवली आहे. वाढीव आयात शुल्काचे धोरण राबवून आपण भारताचे काहीही वाकडे करू शकत नसल्याचे त्यांना एव्हाना उमगले आहे. त्यामुळेच आता ट्रम्प यांचीच खरी अडचण झाली आहे. भारताविरोधातील हे धोरण मागे घेतले तरी त्यांच्यापुढे अडचणी आहेत आणि ते सुरू ठेवले तरी त्यांच्याच अडचणी वाढणार आहेत. अमेरिकेकडून दवाव वाढताच भारताने तातडीने आपल्या व्यापार धोरणांमध्ये बदल करण्यास सुरुवात केली. खरे पाहता अमेरिकेच्या या बदलत्या धोरणांमुळे आपला त्यांच्याशी असणारा ३२ अब्ज डॉलरचा व्यापार धोक्यात आला होता. हे संकट मोठे होते. पण त्याची धग कमी करण्यासाठी मागील चार महिन्यांमध्ये भारताने इंग्लडबरोबर एक मुक्त व्यापार करार केला. त्यानंतर ओमानबरोबरही मुक्त व्यापार केला आणि त्यानंतर नुकतेच भारताने गेले नऊ महिने न्यूझिलंडशी सुरू असलेली मुक्त व्यापारचर्चाही पूर्णत्वास नेली. त्यामुळे लवकरच आपण न्यूझिलंडशीही मुक्त व्यापार करणार आहोत. लक्षात घेण्याजोगी बाब म्हणजे वर उल्लेख केलेले हे तीनही देश भारताच्या निर्यातीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांच्या आयात शुल्क धोरणामुळे प्रामुख्याने इंजिनिअरिंग आणि वाहनांचे सुटे भाग प्रभावित झाले. इथे लक्षात घ्यायला हवे, की न्यूझिलंड, इथिओपिया, ओमान या देशांना होणाऱ्या निर्यातीमध्ये प्रामुख्याने वाहनांचे सुटे भाग आणि इंजिनिअरिंगचा समावेश आहे. त्यानंतर प्रभावित होणारे तयार कपडे आणि कातडी वस्तूंचे क्षेत्र आपण ओमान, इथिओपिया आणि इंग्लंडच्या बाजारपेठेमध्ये वळवू शकणार आहोत. मौल्यवान हिरे आणि दागिन्यांसाठी मध्यपूर्वेचा भाग, आफ्रिका आणि युरोपमधील बाजारपेठा आपल्यासाठी उघडल्या गेल्या आहेत. चौथ्या आणि महत्त्वाच्या कृषी आणि मत्स्य व्यवसायासाठीही आपल्याला नवीन बाजारपेठा मिळाल्या आहेत. काही दिवसांपूर्वीच रशियाचे अध्यक्ष भारतभेटीवर आले होते. या माध्यमातूनही ऐतिहासिक घडामोडी घडल्या आणि रशियाची बाजारपेठ भारतीय वस्तूंसाठी खुली झाली. त्याचप्रमाणे दोन्ही देशांमधील व्यापार २०० अब्ज डॉलरपर्यंत नेण्याचे दोन्ही नेत्यांनी ठरवले. खेरीज या चर्चेअंतर्गत पुढील दहा वर्षांमध्ये तीस लाख भारतीयांना रशियात रोजगार प्राप्त होणार आहे. अशाच प्रकारे न्यूझिलंडशीही करार झाला असून त्यायोगे भारतीय मालाला तेथे ९९ टक्के आयात शुल्कविरहित प्रवेश मिळणार आहे. ओमान आणि युएईमध्येही हेच लाभ मिळणार आहेत. या सगळ्या घडामोडींमुळे गेल्या तीन महिन्यांमध्ये आपली निर्यात कमालीची वाढली आहे. ऑक्टोबरमध्ये भारताची व्यापार तूट साधारणतः ४१ अब्ज डॉलर इतकी होती. नोव्हेंबरमध्ये म्हणजे एकाच महिन्यात त्यात जवळपास १६ अब्जची घट झाली आणि तूट २५ अब्ज डॉलरवर आली. भारताने सोने, तेल आणि कोळसा यांची आयात कमी करणे हे यामागचे कारण आहे. त्यामुळे तूट कमालीची घटलेली दिसली. याच नोव्हेंबरमध्ये भारताची एकूण निर्यात ३८ अब्ज डॉलरपर्यंत पोहोचली. लक्षात घेण्याजोगी बाब म्हणजे डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर अन्यायकारक टॅरिफ लावल्यानंतर लगेचच्या महिन्यात दिसलेली ही स्थिती आहे. दुसरीकडे, भारताचा वस्तू आणि सेवांशी संबंधित अमेरिकेशी असणारा व्यापार गेल्या तीन महिन्यांमध्ये चांगलाच वाढला आहे. भारताकडून अमेरिकेत जाणाऱ्या जलवाहतुकीमध्ये २२ टक्क्यांची वाढ झाली आहे. म्हणजेच डोनाल्ड ट्रम्प यांची घोषणा केवळ कागदोपत्री राहिली आहे. आता जगभर भारतीय वस्तूंना वाढलेल्या मागणीमध्ये इंजिनिअरिंग प्रॉडक्ट्स आणि वाहनांचे सुटे भाग यांचा समावेश आहे. म्हणजेच डोनाल्ड ट्रम्प यांच्या भारताला शिक्षा करण्याचे मनसुबे हवेतच विरले आहेत. आता जग बदललेला भारत पहात आहे. तो कोणाच्याही आणि कोणत्याही दबावापुढे झुकणार नाही, बळी पडणार नाही हे आता सगळ्यांनी पाहिले आहे. अमेरिकेला अशा प्रकारचा दबाव टाकण्याची सवयच आहे. अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना १९९८ मध्ये अणुचाचणी केली तेव्हा याच अमेरिकेने भारतावर आर्थिक निर्बंध लादले होते. मात्र २००१ मध्ये ते त्यांना स्वतःहून मागे घ्यावे लागले. आता डोनाल्ड ट्रम्प यांना नव्याने याची प्रचिती येत आहे.

**केंद्र सरकारने आणलेले मसुदा बीज विधेयक, २०२५ बनावट बियाणांवर नियंत्रण ठेवून आणि व्यवसायातील सुलभता वाढवून बीज क्षेत्राला सुधारित करणार असल्याचा दावा करण्यात येत आहे. अनिवार्य नोंदणी, ट्रेसिबिलिटीसाठी क्यूआर कोड आणि चाचणीसाठी खासगी प्रयोगशाळा यांसारखे प्रमुख बदल समाविष्ट आहेत. शेतकरी संरक्षण आणि उद्योगवाढीचा समतोल साधण्याचा उद्देश सांगितला जात असला तरी नुकसानभरपाई यंत्रणा, शेतकऱ्यांच्या पारंपरिक बियाणे पद्धतींचे संभाव्य गुन्हेगारीकरण आणि मोठ्या कंपन्यांकडून बाजारावर वर्चस्व गाजविण्याचा धोका याबद्दल चिंता कायम आहेत.**

# बीज विधेयक कुणाच्या हिताचे?

केंद्र सरकारने अलीकडेच सीड्स अमेंडमेंट, २०२५ म्हणजेच नवीन सुधारित बीज विधेयक, २०२५ आणले असून ते सध्या लागू असलेल्या १९६६ चा बियाणे कायदा आणि १९८३ च्या 'बियाणे नियंत्रण आदेशा'ची जागा घेईल. या विधेयकानुसार बीज, बियाण्यांच्या गुणवत्तेबाबतची नियमावली कडक करण्यात आली आहे. शेतीसाठी विकल्या जाणाऱ्या बियाण्यांची गुणवत्ता सुधारावी आणि खोटे, खराब बियाणे विकले जाऊ नये हा यामागचा उद्देश. मात्र बियाणांची नोंदणी आणि चाचण्या वेळखाऊ आणि खर्चिक असल्याचा शेतकऱ्यांचा दावा आहे. लहान शेतकरी किंवा परंपरागत बियाणे संस्थांना मोठ्या कंपन्यांप्रमाणे संधी मिळणार नसल्याचेही म्हटले जात आहे. त्यामुळे कॉर्पोरेट कंपन्यांना याचा फायदा मिळेल, शेतकऱ्यांना नाही, असे शेतकरी संघटनांचे म्हणणे आहे. यावरून काही ठिकाणी आंदोलन आणि चर्चा सुरू आहे.

एक प्रकारे देशातील अन्न सुरक्षा धोक्यात येण्याबरोबरच स्वदेशी बियाण्यांचे महत्त्व कमी करणारे आणि राज्याचे अधिकार संकुचित करणारे विधेयक म्हणून याकडे पाहिले जात आहे. कृषी मंत्रालयाचे बीज विधेयक एमएनसी आणि कॉर्पोरेट पातळीवरच्या बियाणे पुरवठ्यावर नियंत्रण प्रस्थापित करेल. अर्थात करारान्वये शेतीचा उद्देश पूर्ण करण्याचे काम करेल. मात्र याचा परिणाम म्हणजे देशातील पीक चक्र हे कॉर्पोरेट बाजाराच्या हितानुसार बदलत राहील. तसेच स्वस्त अणि गुणवत्तापूर्ण बियाण्यांची वेळेवर उपलब्धता, अन्न सुरक्षा, शेतकऱ्यांची आर्थिक सुरक्षा आणि लाभदायी कृषी उत्पन्न याबाबत मात्र कोणतीही हमी दिलेली नाही. केंद्रात किंवा राज्यात कोणाचेही सरकार असो, त्यांनी आणलेल्या बियाणे विधेयकाचे मुख्य लक्ष्य अन्न सुरक्षा आणि आर्थिक सुरक्षा असणे गरजेचे आहे, परंतु मोदी सरकारने त्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केल्याचे दिसून येते. हे विधेयक भारतात जीवनावश्यक कृषी उत्पादनाला मारक असल्याचा दावा केला जात आहे. या विधेयकाचा मसुदा हा केंद्रीकृत आणि कॉर्पोरेटला झुकते माप देणारा आहे. या तरतुदी कृषीपेंद्रित व्यवस्था, जैवविविधता संरक्षण तसेच शेतक-यांच्या हक्काच्या कायदेशीर रचनेल



विधेयकामुळे कंपन्यांचे बाजारावर वर्चस्व निर्माण होऊ शकते आणि त्यामुळे कंपन्यांच्याच बिया बाजारात येऊ शकतात आणि अशा वेळी स्वदेशी वाण, पारंपरिक किंवा अनौपचारिक बियाण्यांचा वापर मागे पडण्याची शक्यता राहू शकते. विधेयकातील मसुद्यानुसार एखाद्या कंपनीला मान्यता मिळाल्यानंतर ती सर्व राज्यांत नोंदणीकृत मानली जाईल. तिच्या वैधतेला कोणीही आव्हान देऊ शकणार नाही. मात्र संबंधित पंपनीने एखादी माहिती चुकीची सादर केली तरच राज्य सरकार तिच्या कामकाजावर बंदी घालू शकते. हे विधेयक खासगी कंपन्यांना अवाजवी लाभ देणारे असून स्वयंसेवी, सार्वजनिक उपक्रमातील कंपन्यांना अशा प्रकारचा कोणताही विशेषाधिकार मिळत नाही. एक प्रकारे हे विधेयक राज्यांच्या अधिकारांना कमकुवत करते आणि संघराज्य व्यवस्थेच्या विरोधात काम करणारे आहे.

नोंदणीकृत नसलेल्या वाणांना आयातीच्या दृष्टीने चाचणीला परवानगी देणे, परकीय मूल्यांकन करणे तसेच त्याच्या ट्रायल टेस्टिंग सेंटरला मान्यता देणे या बाबी विदेशी बियाणे कंपन्यांसाठी पोषक ठरणा-या आहेत. या माध्यमातून एमएनसी कंपन्या या नव्या बियाण्यांना भारताबाहेर स्वतःच मूल्यांकन करत भारतात आणू शकतात अणि त्यामुळे भारतीय चाचणीला काहीच अर्थ राहणार नाही. शिवाय राष्ट्रीय जैवविविधता प्राधिकरणाच्या देखरेखीविना त्यांना स्वतःचा नवीन स्रोत सुरू करण्याबाबत कायदेशीर मार्ग खुला करणारा आहे. कारण या विधेयकात आयात बियाण्यांची भारतीय स्तरावर चाचणीची कोणतीही तरतूद नाही. अतिशय मोलाच्या समजल्या जाणा-या बियाणे क्षेत्राला विदेशी पंपन्यांच्या हाती सोपविण्याचा मुद्दा हा सरकारची हतबलता दाखविणारा आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाने युक्त असलेल्या परकीय कंपन्या भारतीय पंपन्यांच्या तुलनेत तातडीने आणि कमी खर्चात नवीन वाण आणू शकतात, तर भारतातील सार्वजनिक उपक्रमातील संस्था, कंपन्यांना स्थानिक प्रक्रियांचे पालन करावे लागेल.

बियाण्यांसाठी आवश्यक ट्रेसिबिलिटी, क्यूआर कोड आणि लेबलिंगसारख्या नव्या निकषांची केवळ मोठ्या डिजिटल व्यवस्था असणा-या पंपन्याच पूर्तता करू शकतील. ही तरतूद शेतकरी बचत गटांसाठी आकाशातील तारे दाखविण्यासारखी आहे आणि त्यांना अडचणीत आणणारी आहे. शेवटी बियाण्यांचे सार्वभौमत्व संकटात सापडेल. साहजिकच सरकार या विधेयकाच्या माध्यमातून शेतकरी आणि जनतेच्या हितांशी तडजोड करत असल्याचे दिसून येते.बियाणे मूल्य विनियमनाशी संबंधित तरतूददेखील खासगी बियाणे पंपन्यांना लाभ देणारी आहे आणि ती अन्यायकारक पद्धतीने मूल्य निश्चिती करणारी आहे. या विधेयकाच्या मसुद्यानुसार, केंद्र सरकार केवळ आपत्कालीन स्थितीतच मूल्य नियंत्रित करू शकते, पण या विधेयकातून अनेक गोष्टी सुटल्यासारख्या वाटतात. आणीबाणीच्या काळात बियाण्यांची टंचाई झाल्यास त्यावर तोडगा कसा काढला जाईल, किमतीतील असामान्य वाढ झाल्यास शेतकऱ्यांनी काय करावे किंवा असा प्रसंग येऊ नये यासाठी केलेली तरतूद, मूल्य निश्चितीमध्ये एकाधिकारशाही येऊ नये किंवा नफेखोरीला आळा यांसारख्या गोष्टी अस्पष्ट रूपाने मांडल्या आहेत. दुसरीकडे बियाण्यांची विक्री केंद्र सरकारने ठरवलेल्या किमतीपेक्षा अधिक भावाने होत असेल तर हा किरकोळ गुन्हा समजला जाईल. यातही स्पष्टतेचा अभाव आहे. उदा. बियाण्यांची टंचाई असण्याचा अर्थ काय काढावा? अवाच्या सवा किंमत? अशा वेळी केंद्र सरकार मूल्यांची निश्चिती करेल का? यासंदर्भात निर्माण होणारा गोंधळ हा खासगी कंपन्यांच्या पथ्यावर पडेल आणि त्या एक प्रकारे कंपन्यांना अन्यायकारक किमती ठेवण्यास आणि कृषी संकट वाढविण्यास मदत करणा-या आहेत. बियाणे विधेयक, २०२५ मध्ये प्रत्ये

भारतातील जैवविविधता 'कन्व्हेन्शन अँड प्लॅण्ट जेनेटिक सोसायटी' करारांतर्गत अबाधित आहे. स्वतःची विविध आनुवंशिक संपदेचा जागतिक वापरासाठी योग्य रीतीने करार करण्यास भारतीय जैवविविधता क्षेत्र पूरक आहे. जगातील सर्वाधिक जैवविविधता असणारे देश एकत्र झाल्याने भारताला शेतकरी आणि स्थानिक समुदायाच्या हितांचे संरक्षण करण्यासाठी सक्षम सार्वभौम प्रणालीची गरज बोलून दाखवत आहे. अशा वेळी एखादा कायदा अशा हक्कांवर गदा आणत असेल किंवा कंपन्यांना अमर्यादित अधिकार देत असेल तर भारताची आंतरराष्ट्रीय पातळीवरची स्थिती बिकट होईल. सार्वजनिक उपक्रमांतील कंपन्या, संस्थांची मजबूत भूमिका, पारदर्शक विनियमन आणि सुव्यवस्थित भागीदारी याबाबत स्पष्टता राहिल्यास भारत आणि भारतीय शेतकरी हे वाणाच्या आनुवंशिक स्रोतांचा योग्य लाभ उचलू शकतील. मात्र नव्या बियाणे विधेयक, २०२५ चा मसुदा या सार्वजनिक हिताच्या अगदी विरोधात आहे.

**नवनाथ वारे**



# स्वच्छ जलाचे अधुरे स्वप्न!

मध्य शहरी विकास गृहनिर्माण धोरण आणि नियोजन मंत्रालय भारत सरकारच्या वतीने, जगातील सर्वात मोठे स्वच्छ सर्वेक्षण अभियान राबविण्यात येते.या सर्वेक्षणात सलग आठ वर्षें मध्य प्रदेशातील इंदूर शहराने सर्वात स्वच्छ शहराचा पुरस्कार प्राप्त केला. त्यामुळे इंदूर शहराचा आदर्श मोठा संख्येने शहरीकरण झालेल्या शहराने घ्यावा असे गौरवाने सांगितले जायचे.स्वच्छ शहराच्या बहुमान मिळालेल्या इंदूर शहर आता प्रदूषित जलपुरवठा झाल्यामुळे चर्चित आहे. इंदूर शहरातील भगीरथपूरा भागात प्रदूषित पाणी पुरवठा झाल्याने अलीकडेच सतरा नागरिकांचा मृत्यू झाला. त्यात पाच महिन्याच्या बालकाचा आणि ज्येष्ठ नागरिकांचा समावेश आहे. आतापर्यंत पाचशेहून अधिक नागरिकांना रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहेत. तर दररोज अनेक नागरिक उलटी जुलाबाचा त्रास होत असल्यामुळे नागरिक रुग्णालयाकडे बहुसंख्येने येत आहे.

मध्यप्रदेशाच्या इंदूर शहरात दूषित पाणीपुरवठा झाल्याची घटना, नागरिकांचे आरोग्य धोक्यात येणे, दुर्दैवाने मृत्यू ओढावल्याच्या घटना देशात अनेक ठिकाणी झाल्या आहेत.मध्यंतरी विदर्भातील खामगाव आणि शेगाव तालुक्यातील काही गावांना दूषित पाण्यामुळे नागरिकांच्या डोक्यावरचे केस गळून टक्कल पडले होते. देशातील वायुप्रदूषणाचा प्रश्न संपूर्ण जगभरात चर्चेत असतानाच, जलप्रदूषणाचे वृत्त आणि त्याचे गंभीर परिणाम वेळोवेळी दृष्टीस पडतात.जगाच्या सत्तर टक्के (१४७ कोटीहून) अधिक लोकसंख्येला आधार देणाऱ्या भारताला, जगातील एकूण पिण्याच्या पाण्यापैकी फक्त चार टक्के पाणी उपलब्ध आहे. जे देशासाठी पुरेसे ठरत नाही. सध्या स्थितीत देशातील ८५ टक्के पिण्याच्या पाण्याचे प्रमाण भूजलावर अवलंबून आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध होणाऱ्या इंटरनॅशनल सेंटर फॉर सस्टेनेबिलीटीने प्रकाशित केलेल्या अहवालानुसार, देशातील सुमारे सत्तर टक्के पिण्याचे पाणी दूषित आहे. पाण्याच्या गुणवत्तेबाबत, भारत १२२ देशांपैकी १२० क्रमांकावर आहे. देशातील साठ कोटी लोकांना तीव्र किंवा गंभीर पाणी टंचाईचा सामना प्रतिवर्षी करावा लागतो. आजही हंडाभर पाण्यासाठी मैलोमैल पायपीट करावी लागते. दिवसेंदिवस पर्यावरणाचा समतोल बिघडत चाललेला आहे. त्याची झळ प्रत्येक जीवांना पोहोचत आहे. पर्जन्यमानात सातत्याने घट होत आहेत. रासायनिक शेतीमुळे भू प्रदूषणा सोबतच जल प्रदूषणही होत आहे. नद्यांच्या प्रदूषणाबाबत मानवांचा हलगर्जीपणा ठळकपणे दिसतो. नद्यांचे अस्तित्व आणि संवर्धन हा कळीचा मुद्दा असला तरी, हवे तसे गांभीर्याने बघितले जात नसणे हीच खरी शोकांतिका आहे.

शासनाच्या अनेक योजना येतात, भरपूर निधी ही येतो. त्या पूर्णपणे राबवल्या जातात. परंतु त्या योजनेचे व्यवस्थापन राखण्यास प्रशासन अपयशी पडते. हलगर्जीपणामुळे गंभीर परिणामांना सामान्य जनतेला जावे लागते. इंदूर शहराच्या भगीरथपुरात दूषित पाणी पिल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले, याला स्थानिक प्रशासन जबाबदार असल्याचे बोलल्या जात आहे. मुदतबाह्य पिण्याच्या पाण्याच्या पाईपलाईन मध्ये दूषित पाणी शिरल्याने ही घटना घडल्याचे सांगितले जाते.एखादी अंडरग्राउंड योजना टाकल्यानंतर त्याचे वेळोवेळी सुरक्षित मापदंडानुसार,व्यवस्थापन होणे गरजेचे ठरते. घटनेपूर्वी अनेक वेळा स्थानिक नागरिकांचे प्रश्न, तक्रारी प्रशासनासमोर मांडल्या होत्या.त्याचवेळी त्याची गंभीर दखल घेतली असती, तर विद्यमान घटना टळली असती. समाज संवेदनशील असतो. त्या संवेदना प्रशासन, शासन, लोकप्रतिनिधींनी जाणून घेतल्या व वेळीच प्रश्न समस्या निकाली काढल्या असत्या, तर अनेक घटनांचे गांभीर्य कमी करता येत असते. हा प्रश्न केवळ एका महानगराचा नसून, देशातील पेयजल पुरवठा करणाऱ्या अनेक संस्थांचा आहे.

सध्या तरी हा प्रश्न इंदूर महानगरापुरता वाटत असला तरी, या घटनेची पुनरावृत्ती अन्य शहरात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रश्न केवळ दूषित पाणी पुरवठ्याचा नसून, त्यानंतर अनेक आव्हाने निर्माण होतात त्यांचा आहे.घटनेची जबाबदारी कुणाकडेच नसते, तर दुसरीकडे जनारोग्य बिघडविणारे मोकळे असतात. आज देशातील ८५ टक्के जनता भूजलावर अवलंबित आहे. भूजल तज्ज्ञाच्या म्हणण्यानुसार, नायट्रेट, क्लोराईड, आर्सेनिक घटकांची मर्यादा वाढल्याचे सांगितले जाते. काही भूजल नमुन्यांमध्ये लोह, क्लोराईड,घटकांनी सुद्धा मर्यादा ओलांडण्याची सांगितले आहे.देशात एकूण भू जलांपैकी चार टक्के पाणी पिण्यायोग्य आहे, ते सुद्धा अपुरे आहे. त्यात जलप्रदूषणा गंभीर संकट निर्माण करीत असल्याचे वृत्त अस्वस्थ करताना दिसते. सुरक्षित पाणीपुरवठा ही काळाची गरज बनली आहे. डब्ल्यूएचओ जन सुरक्षा योजनेनुसार, पाणीपुरवठ्यात जोखीम ओळखणे आणि त्यांना प्रतिबंधित करणे आवश्यक आहे.पाण्याच्या स्तोत्रापासून ते ग्राहकांच्या नळापर्यंत सुरक्षित पिण्याचे पाणी सुरक्षित करण्याचा मार्ग अवलंबणे गरजेचे ठरते. करिता शासन पातळीवर सजगता आणि लोकजागृती होणे ही जरुरीचे ठरते.

**शशिकांत मधुकर तोटे,**
दारव्हा, जि यवतमाळ
मो-९१३०८३५४५८

# एबी फॉर्मचा मिथक, माध्यमीय सनसनाटीपणा आणि निवडणूक वास्तव

महाराष्ट्र राज्यात सध्या सुरू असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, विशेषतः महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मुद्रित व दृकश्राव्य माध्यमांतून सातत्याने एक शब्द मोठ्या आत्मविश्वासाने वापरला जात आहे, 'एबी फॉर्म'. वर्तमानपत्रांचे मथळे असोत की टीव्हीवरील चर्चासत्रे, 'एबी फॉर्मसाठी धावपळ', 'एबी फॉर्मची खेळी', 'एबी फॉर्मवरून राजकीय नाट्य' अशा शब्दरचना वारंवार ऐकू येतात. मात्र हा शब्द जितक्या ठामपणे आणि ठसठशीतपणे वापरला जातो, तितकाच तो वस्तुस्थितीच्या पातळीवर चुकीचा, दिशाभूल करणारा आणि माध्यमीय अज्ञान उघड करणारा ठरतो.

साध्या आणि स्पष्ट शब्दांत सांगायचे झाले तर 'एबी' नावाचा कोणताही एकत्रित किंवा स्वतंत्र फॉर्म अस्तित्वातच नाही. ए आणि बी असे दोन स्वतंत्र फॉर्म असतात, तेही फक्त व फक्त १९५१ च्या लोकप्रतिनिधित्व कायद्यानुसार भारत निवडणूक आयोगाच्या अखत्यारित येणाऱ्या लोकसभा व विधानसभा निवडणुकां पुरतेच मर्यादित आहेत. राज्य निवडणूक आयोगाच्या अधिकारक्षेत्रातील महा पालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद किंवा पंचायत समिती निवडणुकांमध्ये ए आणि बी फॉर्म लागूच होत नाहीत.

याउलट, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये Annexure-1, Annexure-2, Form II-A, Form II-B अशा वेगवेगळ्या नावांचे, पण समान उद्देश असलेले फॉर्म वापरले जातात. तरीही माध्यमे सरसकट 'एबी फॉर्म' असा शब्दप्रयोग करून जणू काही तो एक रहस्यमय, गुप्त आणि सत्ता हस्तगत करणारे शस्त्र असल्याप्रमाणे त्याचे चित्रण करतात. हे चित्रण केवळ चुकीचे नाही, तर लोकशाही प्रक्रियेबाबत गैरसमज निर्माण करणारे आहे.

खरे तर या फॉर्म्सचा उद्देश अत्यंत तांत्रिक, स्पष्ट आणि मर्यादित स्वरूपाचा आहे. एखादा उमेदवार अमूक एका राजकीय पक्षाचा अधिकृत उमेदवार आहे की नाही, याची लेखी व कायदेशीर खात्री करून निवडणूक चिन्हाचे अचूक वाटप करणे, एवढाच त्याचा गाभा आहे. त्यापलीकडे त्यात कोणतेही गूढ, कटकारस्थान किंवा नाट्य नाही.

भारतीय निवडणूक पद्धतीत उमेदवाराची खरी ओळख त्याचे नाव नसून त्याचे निवडणूक चिन्ह असते. मतदार मत देताना नाव वाचून नाही, तर चिन्हासमोरील बटण दाबून मतदान करतो. साक्षरतेचे प्रमाण, ग्रामीण वास्तव आणि सामाजिक परिस्थिती लक्षात घेता, चिन्ह हेच निवडणूक प्रक्रियेचे केंद्रबिंदू आहे. त्यामुळे राखीव निवडणूक चिन्हे कोणाला मिळणार, हा प्रश्न केवळ प्रशासकीय नसून तो थेट राजकीय सत्तेच्या गणिताशी जोडलेला आहे. याच ठिकाणी ए आणि बी किंवा त्यांच्या समतुल्य फॉर्म्सचे महत्त्व वाढते.

ए-प्रकारचा फॉर्म म्हणजे संबंधित राजकीय पक्षाकडून अधिकृत उमेदवारी देण्याचा अधिकार कोणत्या पदाधिकाऱ्यांना आहे, याची माहिती निवडणूक यंत्रणेला देणारा दस्तऐवज आहे. म्हणजे पक्षाचा अध्यक्ष, सचिव, अधिकृत प्रतिनिधी यापैकी कोण उमेदवारी अधिकृत ठरवू शकतो, हे स्पष्ट करणे.

बी-प्रकारचा फॉर्म म्हणजे त्या अधिकारप्राप्त पदाधिकाऱ्यांनी अमूक अमूक मतदारसंघातून अमूक अमूक उमेदवारास अधिकृत उमेदवारी दिली आहे, याचा ठोस, लेखी आणि कायदेशीर पुरावा आहे. हे फॉर्म्स फक्त नोंदणीकृत राजकीय पक्षांनाच लागू होतात, मग ते मान्यताप्राप्त असोत किंवा अमान्यताप्राप्त. अपक्ष उमेदवार, स्थानिक आघाड्या किंवा पक्षीय नोंदणी नसलेल्या संघटनांच्या उमेदवारांशी या फॉर्म्सचा कोणताही संबंध नाही. तरीही माध्यमीय चर्चांमध्ये जणू सर्वच उमेदवार एबी फॉर्मच्या कुबड्यांवर उभे आहेत, असा भ्रामक आभास निर्माण केला जातो.

आजच्या काळात राजकीय पक्षांचे केंद्रीकरण, नेतृत्वाची घट्ट पकड आणि 'अधिकृत उमेदवारी' मिळवण्याची स्पर्धा प्रचंड वाढली आहे. पक्षाची उमेदवारी म्हणजे केवळ निवडणूक चिन्ह मिळणे एवढेच नव्हे, तर ती म्हणजे संसाधने, संघटना, प्रचारयंत्रणा आणि संभाव्य सत्तेची चावी. पक्षाची उमेदवारी मिळाल्यावर उमेदवाराला पारंपरिक मतपेढ्या, स्टार प्रचारक, पक्षाची यंत्रणा आणि आयते कार्यकर्ते मिळतात. त्यामुळे ए आणि बी किंवा त्यासमकक्ष फॉर्म मिळवण्यासाठी पक्षांतर्गत संघर्ष, दबावतंत्र, लॉबिंग आणि धावपळ होत असेल, तर त्यात फारसे आश्चर्य नाही. मात्र या प्रक्रियेचे रोमँटीकरण, नाट्यीकरण आणि सनसनाटीकरण करणे, हा माध्यमांचा लोकशाहीतील कर्तव्यभाग नाही. माहिती देण्याऐवजी अफवा पसरवणे, संज्ञांचा चुकीचा वापर करणे आणि अर्धवट ज्ञानावर आधारित स्फोटक मथळे देणे, हे माध्यमांच्या विश्वासार्हतेला तडा देणारे आहे.

भारतीय निवडणूक प्रक्रिया मुक्त, स्वतंत्र आणि पारदर्शक राहावी यासाठीच भारत निवडणूक आयोगाने १९६८ साली Election Symbols (Reservation and Allotment) Order लागू केला. त्याच धर्तीवर राज्य निवडणूक आयोगांनी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी स्वतंत्र नियमावल्या तयार केल्या. या नियमांमधील फॉर्म्स हे लोकशाही सुरक्षित ठेवण्याचे साधन आहेत; ते सत्ता हस्तगत करण्याचे गुप्त अस्त्र नाहीत.म्हणूनच 'एबी फॉर्म' हा शब्द वापरण्यापूर्वी माध्यमांनी किमान कायदेशीर वास्तव तपासावे, संज्ञांचा अचूक वापर करावा आणि माहिती देताना जबाबदारी व सुजाणपणा दाखववा, ही अपेक्षा लोकशाहीत फार मोठी नाही. अन्यथा माहिती देण्याऐवजी गैरसमज पसरविण्याचे काम माध्यमेच करीत आहेत, असा निष्कर्ष काढावा लागेल. कोणतीही गोष्ट, संज्ञा किंवा प्रक्रिया प्रसारित करताना तिचा अर्थ, तिचे महत्त्व आणि तिची मर्यादा समाजमाध्यमात काम करणाऱ्यांना समजली पाहिजे. अन्यथा त्यांच्या अज्ञानातून किंवा निष्काळजीपणातून सर्वसामान्य वाचक, मतदार आणि नागरिकांना राजकारण व निवडणूक प्रक्रिया चुकीच्या पद्धतीने समजण्याचा धोका निर्माण होतो, हा धोका केवळ एखाद्या निवडणुकीपुरता मर्यादित नसून तो लोकशाहीच्या मुळावर घाव घालणारा ठरू शकतो.लोकशाही ही केवळ मतदानाची प्रक्रिया नाही; ती समजुतीची, माहितीची आणि विवेकाची प्रक्रिया आहे. त्या प्रक्रियेत माध्यमांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. म्हणूनच माध्यमांनी सनसनाटीपणाऐवजी सत्य, अचूकता आणि जबाबदारी यांना प्राधान्य द्यावे, हीच या लेखामागची भूमिका आहे.




**डॉ. प्रशांत विघे,**
अमरावती

# सावित्रीबाई फुले यांचा पुतळा हटविल्याने संताप

## महात्मा फुले यांच्या पाचव्या वंशज नीता होले यांची प्रशासनावर जोरदार टीका, दोन दिवसांत पुतळा न बसवल्यास उपोषणाचा इशारा

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा अर्धाकृती पुतळा स्थानिक स्टेट बँक परिसरातील ई-क्लासच्या जमिनीवर सर्व आवश्यक परवानग्यांची कागदपत्रे सादर करून बसविण्यात आला होता. मात्र सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीच्या अगदी पूर्वसंध्येला, दि. २ जानेवारी रोजी, पोलीस व नगरपरिषद प्रशासनाने संयुक्त कारवाई करत हा पुतळा हटविल्याने यवतमाळसह संपूर्ण राज्यात संतापाची लाट उसळली आहे.



या घटनेच्या निषेधार्थ महात्मा ज्योतिराव फुले यांच्या पाचव्या वंशज नीता होले या खास पुण्याहून यवतमाळ येथे दाखल झाल्या. पुतळा हटविण्याबाबत जाब विचारताना त्यांनी प्रशासनावर आणि शासनावर तीव्र शब्दांत टीका केली. सावित्रीबाई फुले यांच्यासारख्या थोर समाजसुधारकांच्या पुतळ्यासाठी शासनाकडे जागा नसते का? की या सरकारच्या काळात जाणूनबुजून थोर महापुरुषांचे पुतळे हटविण्याचा प्रकार वाढलेला आहे?असा सवाल त्यांनी उपस्थित केला. सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला पुतळा हटविल्याने फुले–शाहू–आंबेडकर विचारधारेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या नागरिकांमध्ये प्रचंड रोष निर्माण झाला. त्याच अनुषंगाने दिनांक ३ जानेवारी रोजी सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीदिनी यवतमाळ शहरात महिला व पुरुषांचा भव्य निषेध मोर्चा काढण्यात आला. या घटनेची दखल प्रसारमाध्यमांनी घेतल्याने संपूर्ण महाराष्ट्रात हा विषय चर्चेचा ठरला आहे. यावेळी बोलताना नीता होले म्हणाल्या की, सावित्रीबाई फुले यांच्या त्यागामुळे, बलिदानामुळे आणि त्यांनी स्त्रियांना मिळवून दिलेल्या शिक्षण व अधिकारांमुळेच आज स्त्रिया प्रत्येक क्षेत्रात सक्षमपणे कार्यरत आहेत. मात्र हे सर्व योगदान आजच्या शासनाला व अधिकाऱ्यांना विसरल्यासारखे वाटते. स्टॅम्प पेपरवर हमीपत्र देण्यास पुतळा समिती तयार असतानाही एक दिवससुद्धा सावित्रीबाई फुले यांचा पुतळा ठेवू दिला गेला नाही, याबद्दल त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. पुतळा हटविण्यामागील नेमके कारण काय, याची लेखी माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी द्यावी, अशी ठाम मागणीही त्यांनी केली.हे लेखी कारण घेऊन आम्ही थेट मुख्यमंत्र्यांची भेट घेणार आहोत. असे त्यांनी स्पष्ट केले.ज्या ठिकाणी परवानगी नाही, तिथेही मंदिरांसाठी जागा दिली जाते, अनेक ठिकाणी परवानगी शिवाय मंदिरे व पुतळे उभारले जातात. मात्र सर्व शासकीय परवाने असतानाही सावित्रीबाई फुले यांचा पुतळा हटविला जातो, हे कशाचे द्योतक आहे? असा सवालही त्यांनी उपस्थित केला. पुतळा बसविण्यास कोणतीही अडचण नसताना प्रशासनाकडून नाहक त्रास दिला जात असल्याचा आरोप करत, "जर सामान्य प्रशासनाची परवानगी हवी असेल तर ती मी मंत्रालयातून आणून देईन. मात्र दोन दिवसांत पुतळा येथे बसवावा, अन्यथा मी याच ठिकाणी उपोषणाला बसेन, असा ठाम इशारा नीता होले यांनी दिला. राजकारण्यांवर टीका करताना त्या म्हणाल्या, "महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे नाव घेण्याचीही आजच्या राजकीय लोकांची लायकी राहिलेली नाही. प्रत्येक वेळी या थोर महापुरुषांचा अवमान केला जातो. इतर महापुरुषांचे वंशज रस्त्यावर उतरतात, मग आम्ही फुले वंशज नाही का? आता आम्हीही थेट रस्त्यावर उतरून लढा देणार आहोत. खूप सहन केले, आता सहनशक्ती संपली आहे. यावेळी पुतळा समितीच्या पदाधिकारी सविता हजारे, प्रमोदिनी रामटेके, अंकुश वाकडे, सूरज खोब्रागडे यांच्यासह मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या. प्रशासनाने तातडीने निर्णय न घेतल्यास आंदोलन आणखी तीव्र होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.



## पुसदचा जय उचाडे याचा हैद्राबाद येथे फिटनेस स्पर्धेत ५०० पैकी ३१ व्या रॅंक मध्ये निवड!

पुसद : येथील संभाजीनगर मध्ये राहत असणारा जय सुनील उचाडे शिक्षण १२ वी वय २० वर्ष राहणार संभाजीनगर याने द योद्धा रेस इंडिया का आल्टीमेटे फिटनेसं च्यालेंज या कंपनीतर्फे रनिंग, बॉडी बिल्डिंग, वेट लिफ्टिंग स्पर्धेत झालेल्या हैदराबाद येथे स्पर्धेमध्ये सहभाग घेऊन १ तास ६ मिनिट कॉम्प्लिट केलं. ५०० पैंकी ३१ वी रंक मध्ये त्याची निवड झाली आहे. कठोर मेहनत व जिद्द, चिकाटी मुळे त्याला हे यश प्राप्त झाले, त्याने यश प्राप्त केल्यामुळे पुसद शहराचे नावलौकिक केले आहे. यामुळे जय चे शहरात, समाजात, आणि मित्र परिवारात त्याचे सर्व स्तरावरून कौतुक होऊन अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# अनेक आव्हानांना सामोरे जाऊन सुखरूप सेवानिवृत्ती घेणे ही खूप मोठी कसोटी : पीएसआय

**जनमाध्यम प्रतिनिधी**



आर्णी : आर्णी पोलीस स्टेशनला २ जानेवारी रोजी सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक अरुण सिताराम पवार सेवानिवृत्त झाले.त्यांचा सेवानिवृत्त सोहळा पोलिस ठाण्यात सहपरिवार साजरा करण्यात आला. यावेळी बोलतांना अरुण पवार म्हणाले,की पोलीस विभागामध्ये सेवानिवृत्त होईपर्यंत नोकरी करणे आणि अनेक आव्हानांना सामोरे जाऊन सुखरूप सेवानिवृत्ती घेणे ही खूप मोठी कसोटी आहे. त्याचीच फलपुर्ती म्हणजे वयाच्या 58 व्या वर्षापर्यंत निरंतर सेवेत राहुन कोणताही डाग न लागता सेवानिवृत्ती मला लाभली आहे,असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले.

सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक अरुण सिताराम पवार यांनी, 31वर्ष पोलीस विभागात सेवा पूर्ण केली. त्यांच्या नोकरीचा शेवटचा बराच कालखंड आर्णी पोलिस ठाण्यात पूर्ण झाला. सेवानिवृत्त झाल्याने त्यांचा सेवानिवृत्ती सत्कार समारंभ पोलीस स्टेशन आर्णी येथे घेण्यात आला. सदर समारंभाकरिता सत्कारमूर्ती अरुण सिताराम पवार हे यांच्या परिवारासह उपस्थित होते. तसेच समारंभामध्ये अध्यक्षस्थानी पोलीस निरीक्षक निलेश सुरडकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक मिलिंद पारडकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रशांत देशमुख, पोलीस उपनिरीक्षक पल्लवी निरगुडकर मॅडम व सर्व पोलीस कर्मचारी उपस्थित होते. सदर सत्कार समारंभ कार्यक्रमांमध्ये अरुण सिताराम पवार यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, पोलीस विभागांमध्ये प्रामाणिकपणे व कोणताही भेदभाव न करता सेवा दिली त्याचीच फलपुर्ती म्हणजे वयाच्या 58 व्या वर्षापर्यंत निरंतर सेवेत राहुन कोणताही डाग न लागता सेवानिवृत्ती लाभणे. पोलीस विभागामध्ये सेवानिवृत्त होईपर्यंत नोकरी करणे आणि अनेक आव्हानांना सामोरे जाऊन सुखरूप सेवानिवृत्ती घेणे ही खूप मोठी कसोटी आहे. पुढे ते म्हणाले,मला मी पोलीस विभागात करत असलेल्या कामामधून निरंतर आनंद मिळत राहायचा, त्यामुळे मी सतत कामाला प्रथम प्राधान्य व नंतर परिवाराला प्राधान्य दिले या प्रवासामध्ये माझ्या पत्नीने मला खूप मोठ्या आत्मीयतेने सहकार्य केले. यावेळी त्यांनी परिवाराचे सुद्धा आभार मानले. आपण सर्व पोलीस स्टेशन अधिकारी व कर्मचारी यांनी मला पावलोपावली सहकार्य केले तसेच माझ्या सुखदुःखात खंबीरपणे माझ्या पाठीशी उभे राहिले त्याचप्रमाणे आर्णीतील सर्व जनतेने मला खूप प्रेम दिले, यासाठी त्यांनी सर्वांचे आभार व्यक्त करत धन्यवाद दिले.

## • वेचक

### 'देववाणी संस्कृत श्लोक ऑलिम्पियाड 'मध्ये वणीच्या ५ वर्षीय रियांशचा डंका!




वणी - लहान वयातच आपली बुद्धिमत्ता आणि पाठांतराची चुणूक दाखवत, वणीचा सुपुत्र रियांश अक्षय बोथरा (वय ५ वर्षे) याने मुंबईत आयोजित राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत उत्तुंग यश संपादन केले आहे. 'देववाणी' संस्थेतर्फे आयोजित 'संस्कृत श्लोक ऑलिम्पियाड'च्या वार्षिक सोहळ्यात रियांशला मानाच्या "श्लोकाचार्य" या उपाधीने सन्मानित करण्यात आले. आज मुंबईतील 'गोवन इन्स्टिट्यूट' येथे पार पडलेल्या या भव्य सोहळ्यात हजारो स्पर्धक सहभागी झाले होते.या सर्वांमध्ये रियांशने आपल्या वयापेक्षा कितीतरी पटीने मोठी कामगिरी करून दाखवली.त्याने या स्पर्धेची अत्यंत कठीण अशी १० वी पातळी यशस्वीरित्या पार केली. विशेष म्हणजे, अवघ्या ५ वर्षांच्या रियांशने तब्बल १५० हून अधिक संस्कृत श्लोक न अडखळता आणि स्पष्ट उच्चारांत सादर करून परीक्षकांना आणि उपस्थित जनसमुदायाला थक्क केले. रियांश हा सध्या वरोरा येथील सेंट ॲन्स हायस्कूल मध्ये शिक्षण घेत आहे.संस्कृत भाषेची आवड जोपासण्यासाठी त्याने खाजगी शिकवणी द्वारे हे शिक्षण घेतले. इतक्या लहान वयात कठीण संस्कृत शब्दांचे उच्चार आणि अर्थ समजून घेण्याच्या त्याच्या जिद्दीचे आणि मेहनतीचे त्याच्या शिक्षकांनीही विशेष कौतुक केले आहे.

### राळेगाव तालुका पत्रकार संघटनेकडून बाळशास्त्री जांभेकरांची जयंती



राळेगाव - पहिले मराठी दर्पण या वृत्तपत्राचे पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंती दिनी मराठी पत्रकार दिनाचे औचित्य साधून दिं ६ जानेवारी 2026 रोज मंगळवार ला दैनिक आत्मबल च्या कार्यलया येथे बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन पुष्पहार अर्पण करून जयंती साजरी करण्यात आली. यावेळी बाळशास्त्री जांभेकर यांच्या विषयी पत्रकारांनी मनोगत व्यक्त केले सोबतच मंगेश राऊत यांनी सर्व पत्रकाराचा शाल व पुष्प गुच्छाने सत्कार केला पत्रकार दीना निमित्य ग्रामीण रुग्णालय येथे राळेगाव पत्रकार संघटने कडून रुग्णांना फळ वाटप करण्यात आले. यावेळी संघटनेचे अध्यक्ष प्रकाश मेहता राष्ट्रपाल भोंगाडे, मनोहर बोभाटे, ,प्रा. अशोक पिंपरे, फिरोज लाखाणी, राजू भाऊ रोहणकर , अरविंद तेलंगे,मनीष काळे , किरण हांडे ,प्रकाश खुडसंगे, मंगेश राऊत, महेश भोयर, शालीक पाल , गुड्डू मेहता, राजेश काळे ,दादू भोयर संजय दुरबुडे आदी पत्रकार बांधव उपस्थित होते.



### नाना पाटेकर यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत आरोग्य तपासणी शिबिर व वृक्ष लागवड कार्यक्रम


पुसद - दिनांक २ जानेवारी २०२६ रोजी नाम फाउंडेशन पुसदच्या वतीने नाम फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष समाजभान असलेले लोकप्रिय ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या ७५ व्या वाढदिवसाच्या निमित्ताने मोफत आरोग्य तपासणी शिबिर श्री स्वामी समर्थ केंद्र, सप्तगिरी नगर पुसद येथे आयोजित करण्यात आले. या शिबिरामध्ये सीबीसी, थायरॉईड,कोलेस्ट्रॉल, ट्रायग्लिसराइड, एस बी ए वन सी, लिपिड प्रोफाइल, हिमोग्लोबिन,प्लेटलेट,सिकलसेल यांची तपासणी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात केक कापून आणि त्यानंतर वृक्षारोपण करण्यात आले. आरोग्य तपासणी शिबिर मध्ये २३५ जणांनी आपली तपासणी करून या उपक्रमाचा लाभ घेतला. या शिबिरामध्ये वाढदिवसानिमित्य नाम फाउंडेशन पुसद तर्फे १५ खुर्च्या श्री स्वामी समर्थ केंद्राला भेट देण्यात आल्या.या उत्कृष्ट कार्याबद्दल परिसरातील नागरिकांनी आनंद व्यक्त करून नाम फाउंडेशन यांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी नाम फाऊंडेशन पुसद व सप्तगिरी नगर मधील नागरिकांनी परिश्रम घेतले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुकुंद रायपूरकर यांनी तर आभार स्वप्नील देशमुख यांनी मानले.

# नगराध्यक्ष पदाचा पदभार सांभाळताच २४ तासाच्या आत मोहीनी नाईक यांना पाण्याचा अपव्यय करीत नगर प्रशासनाची सलामी

## ओव्हरफ्लो पाण्याची टाकी, तहानलेले नागरिक अन् बेजबाबदार नगर प्रशासन

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - शहरातील काही भागांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना रांगा लावाव्या लागत असताना, दुसरीकडे शहराच्या मध्यवर्ती भागात शुद्ध पेयजल अक्षरशः रस्त्यावर वाहत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले असून स्वच्छ शहर सुंदर शहराचे स्वप्न पहात नगराध्यक्ष पदावर आरुढ झालेल्या मोहिनी नाईक यांना पाण्याचा अपव्यय करीत न.प. प्रशासनाने २४ तासाच्या आतच सलामी दिली आहे.



पुसद नगरपालिकेच्या निष्काळजी आणि बेजबाबदार कारभाराचे हे जिवंत उदाहरण सध्या टिळकनगर परिसरात पाहायला मिळत आहे. दिनांक ५ जानेवारीच्या सकाळी ४.१९ ते ४.४५ वाजता पर्यंत नगर परिसरातील पाण्याची टाकी ओव्हर फ्लो होऊन धो धो वाहत होती. नवीन वर्ष लागतात मागील पाच दिवसातील ही तिसरी घटना असून या पाण्याच्या अपव्ययाने तेथील नागरिक प्रचंडच त्रासले असून याचा येणाऱ्या जाणाऱ्यांना सुद्धा प्रचंड प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. टिळकनगर येथे असलेली तब्बल २० लाख लिटर क्षमतेची पाण्याची टाकी गेल्या पाच दिवसांपासून रात्रीच्या वेळेस सातत्याने ओव्हरफ्लो होत आहे. टाकी भरल्यानंतर पंपिंग तत्काळ बंद करणे अपेक्षित असताना, संबंधित कर्मचारी आणि अधिकारी मात्र नेहमीप्रमाणे गाफील असल्याचे स्पष्ट झाले आहे. परिणामी, शुद्धीकरण प्रक्रिया पूर्ण झालेले मौल्यवान पेयजल रस्त्यावरून खळाळत वाहत असून, मोतीनगर बगिच्याच्या समोरील संपूर्ण रस्ता जलमय झाला आहे. पंपिंग पूर्ण झाल्यानंतर टाकीवर नियुक्त कर्मचाऱ्यांनी वेळीच सूचना देणे व पंप बंद करणे, ही त्यांची मूलभूत जबाबदारी आहे.

मात्र, गेल्या पाच दिवसांपासून सुरू असलेला हा प्रकार पाहता, नगर प्रशासनाला पाण्याची किंमत आणि नागरिकांच्या गरजांशी काहीही देणेघेणे नसल्याचे स्पष्ट होते. शुद्ध पेयजलाचा असा उघड अपव्यय सुरू असताना प्रशासन मात्र गाढ झोपेत असल्याचे चित्र आहे. यातच दिनांक ५ जानेवारी सोमवार रोजी नवनियुक्त नगराध्यक्ष मोहिनी नाईक यांनी आपल्या पदाचा पदभार स्वीकारताना स्वच्छ पाणी सुंदर पुसद स्वच्छ पुसद अशा घोषणा दिल्याने ही घटना घडल्याने नागरिकांमध्ये चर्चेला उधाण येत आहे.

# वार्ड क्र. 3 मधील रस्ता, नालीचे बांधकाम करा राणी अमरावती येथील नागरिकांची मागणी

**जनमाध्यम प्रतिनिधी**



बाभूळगाव - तालुक्यातील राणी अमरावती येथील वार्ड क्र. 3 मधील रहिवासी नादुरूस्त रस्ता व तुंबलेल्या नालीच्या समस्येमुळे त्रस्त झाले आहेत. येथील मस्जीद ते हनुमान मंदिर पर्यंतच्या रस्त्याची अवस्था दयनिय झाली असून या रस्त्याने पायदळ चालणे सुद्धा कठीण झाले आहे. लगतच्या नालीची साफसफाई न झाल्याने ती तुंबली असून सांडपाणी रस्त्यावर साचत आहे. या रस्ता व नालीचे बांधकाम करण्यासाठी येथील रहिवासी गेल्या दोन वर्षांपासून ग्राम पंचायतला विनंती करीत आहोत. मात्र त्यावर काहीच उपाययोजना झाली नाही. शेवटी येथील रहिवाश्यांनी दि. 5 जानेवारी रोजी तहसिलदार, गटविकास अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, ग्राम पंचायत सरपंच, सचिव यांना लेखी तक्रार दिली आहे.

राणी अमरावती येथील मस्जीद ते हनुमान मंदिर पर्यंत असलेल्या रस्त्याची दुरावस्था झाली आहे. रस्त्यालगतची नाली बुजली असून त्यात सांडपाणी साचत आहे. ते सांडपाणी रस्त्यावर पसरून डेंग्यु, मलेरिया आजारांच्या डासांचा त्रास वाढला आहे. पाण्यातून येणाऱ्या दुर्गंधीमुळे येथील रहिवाशांचे आरोग्य धोक्यात आले आहे. ग्राम पंचायत प्रशासनाला वारंवार सांगुन सुद्धा नालीची साफसफाई करण्यात आली नाही. या ठिकाणी काही दिव्यांग बांधव राहत असून त्यांना या रस्त्यावरून जाण्यास अत्यंत अडचणी निर्माण होत आहेत.

तसेच येथील मस्जिदमध्ये नमाज करण्यासाठी जाणार्यांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. ग्राम पंचायतच्या हलगर्जीपणाच्या विरोधात येथील रहिवाश्यांनी वारीष्टांकडे तक्रार केली.

**उपाययोजना न केल्यास आंदोलनाचा इशारा**

मस्जिद ते हनुमान मंदिर पर्यंतच्या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करून दोनही बाजुंना बंदिस्त सिमेंट नाल्या बांधुन देण्यात याव्यात. अशी मागणी केली आहे. या उपरही काहीच उपाययोजना न झाल्यास लोकशाहीच्या मार्गाने न्याय मिळण्यासाठी आंदोलन छेडण्याचा ईशारा देण्यात आला आहे. या तक्रारीवर शेख छन्नु शेख शरीफ, रफिकउद्दीन इमामुद्दीन काझी, मो. मिसबाह शेख छन्नु, मो. आकीब मो. मुस्ताक, मो. अल्तमश मो. अंसार, शीजान फारूख देषमुख, मो. साकीब शेख छन्नु, मो. आतीक मो. हनिफ, मो. शाकीर मो. अफसर, शेख साबीर शेख शरीफ, शेख अंसार शेख जलील, शोएब अहेमद, शेख अरशान शेख अंसार, अहेफाजुद्दीन काझी यांच्या सह्या आहेत.

# पुसद न.प. अध्यक्षपदी ॲड. मोहिनी इंद्रनील नाईक ; स्वच्छ–सुंदर पुसदचा निर्धार!

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पुसद - नगरपालिकेच्या अध्यक्षपदी ॲड. मोहिनी इंद्रनील नाईक यांनी सोमवार दिनांक ५ जानेवारी रोजी पदभार स्वीकारताच शहर स्वच्छ, सुंदर व सुसंस्कृत करण्याचा ठाम निर्धार व्यक्त केला. पदभार स्वीकारताना त्यांनी निवडणुकीत दिलेले शब्द पूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणार असल्याचे स्पष्ट केले. पदभार स्वीकारताना भारताचे संविधान व भगवद्गीता सोबत ठेवत त्यांनी जबाबदारी स्वीकारली. यावेळी महाराष्ट्र राज्याचे राज्यमंत्री तथा त्यांचे पती नामदार इंद्रनील नाईक, माजी नगराध्यक्ष अनिताताई मनोहरराव नाईक यांच्यासह नगरसेवक व विविध पक्षांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शहर स्वच्छतेला प्राधान्य देत प्रत्येक प्रभागातील घंटागाडीवर संबंधित ड्रायव्हर, हेल्पर व नगरसेवकांचे संपर्क क्रमांक दर्शविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. यामुळे नागरिकांना थेट तक्रारी नोंदविता येणार आहेत. तसेच शहरातील वाढते अतिक्रमण हटविण्यासाठी कोणालाही नाराज न करता लवकरच ठोस उपाययोजना राबविण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. पुसद शहरातील वाढती वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी अभियंत्यांकडून तांत्रिक सल्ला घेऊन योग्य नियोजन करण्यात येणार असल्याचे यावेळी नामदार इंद्रनील नाईक यांनी सांगितले. नगरपालिकेला 'अ' दर्जा मिळवून देण्यासाठी लगतच्या ग्रामपंचायतींकडून ना-हरकत प्रमाणपत्र मिळताच आवश्यक प्रक्रिया पूर्ण करण्याचा निर्धारही आमदार इंद्रनील नाईक यांनी व्यक्त केला. नगरपालिकेत सध्या त्रिवेणी संगम सरकार स्थापन झाले असून राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) १४, भाजप ५ व अपक्ष ३ असे एकूण २२ सदस्य सत्तेत सहभागी आहेत. तीन अपक्ष सदस्यांनी बिनशर्त पाठिंबा दिला असून भाजपला उपाध्यक्षपद व एक समिती सदस्य देण्याचे ठरले आहे. सर्व विरोधी गटांना सोबत घेऊन पुसद शहराचा सर्वांगीण विकास करण्याचा विश्वास नगराध्यक्षा ॲड. मोहिनी इंद्रनील नाईक यांनी व्यक्त केला. यासाठी नागरिकांनीही सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. आता पुसद खरोखरच स्वच्छ, सुंदर व सुसंस्कृत होणार का, याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

# लाडकी बहीण योजनेतील KYC अडचणींमुळे हजारो महिला वंचित

## मुदतवाढ न दिल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा

**जनमाध्यम प्रतिनिधी**




महागाव - राज्य शासनाच्या गाजलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत प्रशासनाच्या निष्काळजीपणा व अपुऱ्या नियोजनामुळे जिल्ह्यातील हजारो महिला लाभार्थी थेट लाभापासून वंचित राहिल्या आहेत. आवश्यक असलेली ग्राहक ओळख व पडताळणी (KYC) कागदपत्रांची प्रक्रिया वेळेत पूर्ण न झाल्याने पात्र महिलांना आर्थिक मदतीपासून दूर ठेवण्यात आले आहे. या गंभीर अन्यायाविरोधात जन आंदोलन आधार संघर्ष समितीचे संस्थापक अध्यक्ष श्री. जगदीश नरवाडे यांनी तहसीलदार श्री. अभय मस्के यांना निवेदन देत प्रशासनाला धारेवर धरले. "योजना महिलांसाठी आहे की कागदपत्रांसाठी?" असा थेट सवाल करत, प्रशासनाच्या ढिसाळ कारभारामुळे गरीब, कष्टकरी, ग्रामीण व विधवा महिलांवर अन्याय होत असल्याचा आरोप त्यांनी केला.

ग्रामीण भागातील महिलांना इंटरनेट सुविधा, सेवा केंद्रांची कमतरता, आधार-पॅन जोडणीतील तांत्रिक अडचणी, अपुरी माहिती व प्रचंड गर्दी यामुळे KYC प्रक्रिया वेळेत पूर्ण करता आलेली नाही. हे वास्तव माहिती असूनही शासनाने कोणतीही मुदतवाढ न दिल्याने महिलांचे हक्क हिरावले जात असल्याचा संताप व्यक्त करण्यात आला. "लाडकी बहीण योजना ही कागदांच्या अडचणीत अडकवून निष्प्रभ केली जात असून, तात्काळ KYC प्रक्रियेस मुदतवाढ देण्यात यावी व वंचित महिलांना पुन्हा संधी देण्यात यावी, अन्यथा जन आंदोलन आधार संघर्ष समितीच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल," असा स्पष्ट इशारा श्री. नरवाडे यांनी दिला. तहसीलदार श्री. अभय मस्के यांनी निवेदन स्वीकारले असले तरी, जोपर्यंत महिलांना प्रत्यक्ष लाभ मिळत नाही, तोपर्यंत आंदोलन थांबणार नाही, अशी भूमिका समितीने जाहीर केली.

# उमरखेड तालुका दैनिक वृत्तपत्र वार्ताहर संघाची कार्यकारिणी गठीत

**जनमाध्यम प्रतिनिधी**



उमरखेड - मराठी वृत्तपत्र सृष्टीचे जनक दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंती दिनाचे औचित्य साधून पत्रकार दिनी उमरखेड तालुका दैनिक वृत्तपत्र वार्ताहर संघाची 5 वी कार्यकारिणी अविरोध गठीत करण्यात आली असून या संघाचे अध्यक्ष म्हणून साहेबराव धात्रक तर लक्ष्मीकांत नंदनवार यांची सचिव पदी सर्वानुमते निवड करण्यात आली.

6 जानेवारी रोजी स्थानिक शासकिय विश्रामगृह येथे मावळते अध्यक्ष डॉ . विशाल माने यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उमरखेड तालुका दैनिक वृत्तपत्र वार्ताहर संघाच्या बैठकीत या कार्यकारणी मध्ये कार्याध्यक्षपदी प्रशांत भागवत ,उपाध्यक्ष म्हणून अरुण बेले ,कोषाध्यक्षपदी अजय कानडे ,तर प्रसिद्धीप्रमुख पदी निळकंठ धोबे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे .यावेळी मावळते अध्यक्ष डॉक्टर विशाल माने व सचिव शैलेश ताजवे यांचा संघाच्या वतीने शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला .या कार्यकारिणी मध्ये सदस्य म्हणून सर्वश्री अरविंद ओझलवार ,संजय देशमुख ,वसंतराव देशमुख, शैलेश ताजवे, अझरुल्ला खान,व्यंकटेश पेन्शनवार, भीमराव नगारे ,अविनाश मुन्नरवार ,अंकुश पानपट्टे , गजानन भारती ,ताहेर मिर्झा ,रवी भोयर,सलमान अशहरखान ,संतोष कलाने, डॉ . शिवचरण हिंगमिरे यांची कार्यकारिणी गठित झाली आहे. उमरखेड तालुक्यात सर्व स्तरातून सामाजिक कार्यात अग्रेसर असलेली पत्रकार संघटना म्हणून ओळखल्या जाणाऱ्या उमरखेड तालुका दैनिक वृत्तपत्र वार्ताहर संघाची कार्यकारणी गठीत झाल्याबद्दल या संघटनेचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# दिग्रस नगरपालिकेच्या नगराध्यक्षपदी पंचशीला इंगोले आरूढ

**जनमाध्यम प्रतिनिधी**



दिग्रस : नगरपालिका निवडणुकीचा निकाल नुकताच जाहीर झाला. आज सोमवार, दि. ५ जानेवारी रोजी नवनिर्वाचित नगराध्यक्ष पदाचा कार्यभार पंचशीला वाल्मिक इंगोले यांनी स्वीकारला. सदर पदग्रहण समारंभ स्थानिक नगर परिषदेच्या सभागृहात आयोजित करण्यात आला होता.

व्यासपीठावर यवतमाळ- वाशीम लोकसभा मतदारसंघाचे खासदार संजय देशमुख, उबाठा गटाचे नवनिर्वाचित नगरसेवक केटी जाधव, अरुणा रत्नपारखी, अब्दुल गफ्फार, रुस्तम पप्पूवाले, रहमत रमजू पटेल, अपक्ष नगरसेवक शगुफ्ता अक्रम सय्यद, एमआयएमचे बिलाल मिरावाले आदी उपस्थित होते. दिग्रस नगरपालिकेच्या निवडणूकीमध्ये शिंदे सेना आणि उबाठा सेना यांच्यामध्ये सरळ लढत झाली. त्यामध्ये उबाठा सेनेच्या पंचशीला वाल्मिक इंगोले यांनी अवघ्या ६२ मतांनी बाजी मारत नगराध्यक्ष पद हस्तगत केले. दि. २१ डिसेंबर रोजी संपूर्ण महाराष्ट्रात नगरपालिका निवडणुकीचा निकाल लागला. त्या तारखेपासून स्थानिक कार्यकर्ते आणि नागरिक पदग्रहण सोहळ्याची आतुरतेने वाट पाहत होते. दि. ५ जानेवारी रोजी मात्र नवनियुक्त नगराध्यक्ष इंगोले यांनी पदभार स्वीकारल्यामुळे दिग्रस नगरपालिकेला हक्काचा नगराध्यक्ष मिळाला आहे. इंगोले यांनी नगरपालिका अंतर्गत येणारे काम अगदी चांगल्या प्रकारे करणार असल्याचे सांगितले.

# सलग तिस-यांदा चातारी कन्याची क्रीडाक्षेत्रात जिल्हापर्यंत भरारी

**जनमाध्यम प्रतिनिधी**



उमरखेड - नुकत्याच पार पडलेल्या खेळ व क्रीडा स्पर्धेमध्ये जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळा चातारीच्या विद्यार्थिनींनी सलग तिसऱ्यांदा जिल्हापर्यंत यश मिळवले आहे. त्यामुळे सर्व स्तरावर विद्यार्थिनींचे कौतुक होत आहे. खेळ व क्रीडा स्पर्धेमध्ये शाळेतील स्वरा बालाजी धात्रक ह्या विद्यार्थिनीची बुद्धिबळामध्ये तालुक्यातून लहान गटामध्ये प्रथम क्रमांक आल्यामुळे जिल्ह्यासाठी निवड झाली आहे.

गौरी शिवाजी माने या विद्यार्थिनीचा सुद्धा योगासनामध्ये लहान गटांमध्ये तालुक्यातून द्वितीय क्रमांक आलेला आहे. तसेच जान्हवी दिगंबर माने या विद्यार्थिनींचा 200 मीटर धावणे या क्रीडा प्रकारामध्ये तृतीय क्रमांक आलेला आहे. उमरखेड तालुक्याचे गटशिक्षण अधिकारी विजय बेतेवाड यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र तसेच सन्मानचिन्ह देऊन विद्यार्थिनींचा सन्मान करण्यात आला. यशस्वी विद्यार्थ्यांना शाळेचे मुख्याध्यापक हरिश्चंद्र गुट्टे, सहशिक्षिका योग्यश्री घोडके, अनुप्रिया शिंदे, संगीता पवार, जितेंद्र वाठोरे यांचे मार्गदर्शन मिळाले आहे. शाळा फक्त चौथीपर्यंत असून फक्त मुलींचीच आहे तरीसुद्धा सतत तिसऱ्यांदा क्रीडा क्षेत्रामध्ये उत्तुंग यश संपादन केल्याबद्दल शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष आशिष हामंद, उपाध्यक्ष दिगंबर माने तसेच संपूर्ण शाळा व्यवस्थापन समिती व पालक वर्ग पोषण आहार कर्मचारी मारोती हामंद यांच्याकडून विद्यार्थिनींचा व त्यांच्या पालकांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# ‘डिफेन्स कॉरिडॉर’ला दिली मंत्रिमंडळाने मंजुरी

## विदर्भात ३० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक

**अमरावती/का.प्र.**

विदर्भाच्या विकासाला खऱ्या अर्थाने गती देणारा एक ऐतिहासिक निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. राज्याच्या नवीन औद्योगिक धोरणानुसार, अमरावती, वर्धा आणि नागपूर मा जिल्ह्यांना जोडणा-या २५० किलोमीटर लांबीच्या ‘संरक्षण पट्ट्याला’ (संरक्षण कॉरिडॉर) मंत्रिमंडळाने अधिकृत मंजुरी दिली आहे. या महाकाय प्रकल्पाच्या माध्यमातून पुढील पाच वर्षात विदर्भात तब्बल ३० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित असून, यामुळे हा संपूर्ण प्रदेश देशातील संरक्षण उत्पादनाचे सर्वात मोठे केंद्र म्हणून नावारूपास येणार आहे.

जागतिक कंपन्यांचा विदर्भाकडे ओढा या निर्णयामुळे केवळ देशातीलच नव्हे, तर परदेशी संरक्षण कंपन्यांसाठीही गुंतवणुकीची दारे उघडली आहेत. या पट्ट्यामध्ये उद्दिष्ट आहे. आधुनिक शस्त्रे, दारूगोळा, क्षेपणास्त्रे, मानवरहित विमाने (ड्रोन) आणि अवकाश तंत्रज्ञानाशी संबंधित उत्पादनांची निर्मिती केली जाणार आहे. नागपूरमध्ये आधीपा सूनच मिहान आणि इतर संरक्षण प्रकल्प कार्यरत असल्याने, आता या नवीन विस्तारामुळे अमरावती आणि वर्धालाही जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा प्राप्त होणार आहेत. उच्च तंत्रज्ञान क्षेत्रातील उद्योगांना विशेष प्रोत्साहन देण्याचे सरकारचे लघु व मध्यम उद्योगांचे भाग्य उजळणार या प्रकल्पाचा सर्वात मोठा लाभ विदर्भातील लघु आणि मध्यम उद्योगांना होणार आहे. मोठ्या संरक्षण उत्पादन कंपन्यांना लागणारे प्रगत संवेदक (सेन्सर्स), तांत्रिक सुटे भाग आणि प्रगत अभियांत्रिकी सेवांची मोठी मागणी असते. ही मागणी स्थानिक उद्योगांकडून पूर्ण केली जाणार असल्याने, विदर्भातील लहान कारखान्यांना घट मोती कामे मिळतील, यामुळे या क्षेत्रात आधीच कार्यरत असलेल्या लहान कंपन्यांना आपला विस्तार करण्याची संधी मिळेल आणि संपूर्ण प्रदेशात रोजगाराची मोठी लाट येईल.



अमरावतीत होणार पिस्तूल निर्मितीचा धडाका वा संरक्षण पट्टधाचे पहिले दृश्य फळ अमरावती जिल्ह्याला मिळणार आहे. ‘टेम्बो ग्लोबल’ ही नामांकित कंपनी दोन टप्प्यांत अंदाजे १,००० कोटी रुपयांची गुंतवणूक करत आहे. अत्यंत महत्त्वाचे म्हणजे, अमराव तीतील नांदगाव पेठ औद्योगिक वसाहतीमध्ये येत्या सप्टेंबर महिन्या-पासून प्रत्यक्ष पिस्तूल निर्मितीच्या कामाला सुरुवात होणार आहे. हा प्रकल्प जिल्ह्याच्या औद्योगिक प्रतिमेला नवी ओळख देणारा ठरेल. तज्ज्ञांचे मतः विकासाचे नवे पर्व विदर्भ इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष प्रशांत मोहता यांनी या निर्णयाचे ऐतिहासिक स्वागत केले आहे.

ते म्हणाले की, असोसिएशनची अनेक वर्षांची मागणी पूर्ण झाली असून गुंतवणूक पात्रता मर्यादा ५० कोटींवरून घेट १२५ कोटी रुपये केल्यामुळे मोठ्या उद्योगांना अधिक सवलती मिळतील.

तसेच, आर्थिक सल्लागार सोए झुल्फेश शाह यांच्या मते, या धोरणामुळे नागपूरची ओळख आता केवळ वाहतूक केंद्र (लॉजिस्टिक्स हब) न राहता जागतिक उत्पादन केंद्र म्हणून निर्माण होईल.

### शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा देण्यासाठी

# महावितरण कंपनीचे अधिकारी उदासीन

**अमरावती/का.प्र.**

मोर्शी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या विजेच्या समस्या सोडविण्याच्या अनुषंगाने राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष रुपेश वाळके यांनी उपविभागीय अधिकारी यांना दिलेल्या निवेदनानुसार स्थानिक स्तरावर चर्चा करून शेतकऱ्यांच्या समस्यो सोडविण्याकरीता उप विभागीय अधिकारी रवींद्र पवार यांच्या अध्यक्षतेखाली महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांसोबत तहसील कार्यालय मोर्शी येथे सभेचे आयोजन करण्यात आले होते.

महावितरण कंपनीतर्फे ग्रामीण भागात शेती पंपांना वीजपुरवठा केला जातो. यात सातत्याने वीजपुरवठ्याच्या वेळा बदलल्या जातात. बारा महिन्यात बारा नवीन वेळांचे वेळापत्रक प्रसिध्द केले जाते. दिवसातून केवळ आठच तास शेतीपंपांना वीज दिली जाते. त्यातही विजेचा लपंडाव सुरु असतो. कधी दिवसा, तर कधी रात्री वीजपुरवठा केला जात असून, महावितरण कंपनीने शेतकऱ्यांच्या भावनांशी खेळू नये. शेतीसाठी रात्रीचा केला जाणारा वीज पुरवठा बंद करून शेतकऱ्यांना दिवसा एकच वेळ निश्?चित करुन पुरेशा दाबाने वीजपुरवठा करावा, अशी मागणी राष्ट्रवादी युवक कॉँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष रुपेश वाळके यांनी उपविभागीय अधिकारी कार्यालयामध्ये झालेल्या बैठकीमध्ये कार्यकारी अभियंता यांना केली. नियमित व पुरेसा वीजपुरवठा होत नसल्यामुळे हजारो हेक्टर क्षेत्रावरील संत्रा उत्पन्नावरही त्याचा मोठा परिणाम होत असल्याचे रुपेश वाळके यांनी महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांच्या लक्षात आणून दिल्यानंतर सुद्धा कार्यकारी अभियंता यांनी वेळापत्रकामध्ये बदल करून दिवसा वीज पुरवठा करणे शक्य नसल्याचे सांगितल्यामुळे हजारो शेतकऱ्यांनी महावितरण कंपनी विरोधात रोष व्यक्त करून ८ दिवसामध्ये दिवसा वीज पुरवठा न मिळण्यास महावितरण कंपनीच्या कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्याचा इशारा महावितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता यांना देण्यात आला. यावेळी बैठकीला उप विभागीय अधिकारी रवींद्र पवार, कार्यकारी अभियंता कासट साहेब, उप कार्यकारी अभियंता उमाळे साहेब, तहसीलदार सागर ढवळे, वन परिक्षेत्र अधिकारी चौधरी साहेब राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष रुपेश वाळके, शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रफुल भोजने, निलेश कडू, मनीष गुडधे, सोमेश्वर काळे, सतीश गतफणे, यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.



### राष्ट्रवादीचा महावितरण कंपनीला ८ दिवसांचा अल्टिमेट

### संत्रा उत्पादक शेतकरी आंदोलनाच्या तयारीत

## संक्षिप्त

### स्व. प्रतिभाताई पंजाबराव देशमुख यांचे मरणोत्तर नेत्रदान

**अमरावती-** माजी पालकमंत्री व आमदार डॉ. सुनिल देशमुख, प्रतापराव देशमुख व अनिल देशमुख यांच्या मातोश्री स्व. श्रीमती प्रतिभाताई पंजाबराव देशमुख यांचे नुकतेच निधन झाले. देशमुख परिवाराने या दुःखद प्रसंगात देखील सामाजिक जाणीव लक्षात घेऊन गरजूंना या जगातील रंग पाहता येतील या उद्दात भावनेने त्यांच्या मातोश्री स्व. श्रीमती प्रतिभाताई पंजाबराव देशमुख यांचे नेत्रदान करण्याचा निर्णय घेतला. अमरावती मधील दिशा ग्रुप व दिशा एज्युकेशन फाऊंडेशन द्वारा संचालित दिशा इंटरनॅशनल आय बँक या धर्मदाय नेत्रपेढीला नेत्रदान करण्यात आले. दिशा ग्रुपचे संस्थापक सचिवं स्वप्निल अरुण गावंडे, दिशा इंटरनॅशनल आय बँकेचे हिमांशू प्रमोद बंड, अनिल देशमुख यांनी मरनोतर नेत्रकमळ दान करून घेण्याची प्रक्रिया पूर्ण केली.



### आंतरभारतीचे राष्ट्रीय अध्यक्षांची तपोवनला भेट



**अमरावती-** साने गुरुजींनी स्थापित केलेल्या आंतरभारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष पांडुरंग नाडकर्णी यांनी पद्मश्री डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांच्या विदर्भ महारोगी सेवा मंडळ तपोवनला नुकतीच सदिच्छा भेट देत तपोवन मध्ये चालणाऱ्या मानवतावादी कार्याची माहिती जाणून घेतली. तपोवन चे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुभाष गवई यांचे मार्गदर्शन व त्यांच्या नेतृत्वाखाली नव्याने सुरू असलेल्या गतिशील रोजगार, उदयोगाचे कार्याचे कौतुक केले. त्या अनुषंगाने त्यांच्या पत्नी पार्वतीताई नाडकर्णी यांनी तपोवनला सदिच्छा भेट दिली. पांडुरंग नाडकर्णी यांचा सपत्नीक शाल पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला. नाडकर्णी यांचा परिचय डॉ. शांताराम चव्हाण यांनी करून दिला. याप्रसंगी संस्थेचे सचिव सहदेव गोळे उपसचिव ऋषिकेश देशपांडे उपअधीक्षक योगेश करडे विश्वस्त भीमराव ठवरे अंतर्गत व्यवस्थापक भास्कर शेटये निवृत्ती वेलकर यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

### पुनम बंगाळेला राज्यस्तरीय महोत्सवात रजत पदक



**अमरावती-** नांदेड येथे नुकत्याच पार पडलेल्या २७ व्या महाराष्ट्र राज्य अंतरविद्यापीठ अश्वमेध क्रीडा महोत्सवामध्ये बुलडाणा येथील मॉडेल डिग्री कॉलेजची बी.एस्सी. प्रथम वर्षाची विद्यार्थीनी कु. पुनम बंगाळे हिने रजत पदक पटकावून दैदिप्यमान यश संपादित केले आहे. या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रभरातील सर्व विद्यापीठाचे हजारो खेळाडू ॲथलेटिक्स व इतर खेळांमध्ये सहभागी झाले होते. पुनम हिने यापूर्वी विद्यापीठस्तरीय २०० मीटर धाव स्पर्धा आणि ४०० मीटर रिले रेस या दोन्ही स्पर्धा प्रकारात उत्कृष्ट कामगिरी करीत प्रथम क्रमांक पटकावला आहे. तिच्या या दैदिप्यमान यशाबद्दल कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, मॉडेल डिग्री कॉलेजचे मानद संचालक डॉ. अण्णासाहेब म्हळसणे यांनी अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्यात. पुनम हिचा महाविद्यालयीन स्तरावर सर्व प्राध्यापकवृंद, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी सत्कार करून भरभरुन शुभेच्छा दिल्या. या यशामागे महाविद्यालयातील प्राध्यापकांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# दिव्यांगाच्या कलेचे अप्रतिम दर्शन

## बालरंगभूमी परिषदेचा दिव्यांग महोत्सव जल्लोषात

**अमरावती/का.प्र.**

बालरंगभूमी परिषद मुंबईच्या स्थानिक शाखेद्वारा अमरावती येथे दिव्यांग बालकांसाठी ‘यहाँ के हम सिकंदर’ हा सांस्कृतिक महोत्सव आयोजित केला गेला. यामध्ये अमरावती जिल्ह्यातील एकूण १२ शाळांतील सुमारे १७० विद्यार्थ्यांनी आपल्या कलेचे सादरीकरण केले. कार्यक्रमाचे अध्यक्षपद सेवानिवृत प्राध्यापक ज्योत्स्ना साठे यांनी भूषविले तर प्रमुख अतिथी म्हणून अंध विद्यालयाचे सेवानिवृत्त शिक्षक अजय भोजने लाभले होते. याचबरोबर बालरंगभूमी परिषदेचे अमरावती शाखेचे अध्यक्ष मंगेश बक्षी, प्रमुख सल्लागार प्राध्यापक माणिक देशमुख, संजीवनी पुरोहित आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन रसिका वानखडे यांनी केले.



महोत्सवात दिव्यांग बालकांनी नृत्य, गायन, प्रहसन, चित्रकला, हस्तकला अशा विविध कलाप्रकारांचे प्रदर्शन करुन आपल्या प्रतिभेची चुणूक दाखवली. शारीरिक उणिवांवर मात करून स्वतःचा विकास साधता येतो हा महत्वाचा संदेश त्यांनी साधारण क्षमता असलेल्या बालकांना दिला. दिव्यांग बालकांचा प्रत्येक कलाविष्कार हा भारावून टाकणारा होता. विविध सणाचे अप्रतिम दर्शन, झाडे जगवा झाडें लावा हा संदेश देणारे नाट्य, देखणे कठपुतळी नृत्य, अंध विद्यार्थ्यांनी सादर केलेले लुईस ब्रेल यांचे सुरेल स्तवन अशी विविधरंगी प्रस्तुती होती. मुलांनी तयार केलेले शिल्प, चित्रकला, हस्तकला, राख्या, पणत्या यांचे प्रदर्शन आकर्षक होते. अतिशय उत्सहात सर्व विद्यार्थी आणि शिक्षकांच्या मेहनतीच अनुपम दर्शन झाले. रमेश तराळ, डॉ श्याम देशमुख, स्वाती तराळ, मनोज सामदेकर, उदय चाकोते, सुरेश बारसे, विवेक राऊत, विराग जाखड यांनी शाळा, शिक्षक आणि कलावतांना स्मृतिचिन्हं आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानीत केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अजित वडवेकर, विशाल रमेश तराळ, भूषण उंबरकर, मनिष प्रजापती, विष्णू आवंडे, स्नेहा तराळ, यांनी परिश्रम घेतले.

# आदिवासी विकास विभागाच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेचे उद्‌घाटन

**अमरावती/का.प्र.**

आदिवासी विकास विभागामार्फत आयोजित राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा सन २०२५-२६ चा उद्‌घाटन सोहळा संपन्न झाला. या स्पर्धेचे उद्‌घाटन राज्य माहिती आयोग आयुक्त रवींद्र ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी क्रीडाध्वजाचे ध्वजारोहण करुन क्रीडाज्योत प्रज्ज्वलित करण्यात आली.

आदिवासी विकास अपर आयुक्त आयुषी सिंह, नाशिकचे अपर आयुक्त दिनकर पावरा, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, सहायक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी अमित रंजन, झेनिच चंद्र दोनथुला, सिद्धार्थ शुकना तसेच विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, खेळाडू व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेच्या निमित्ताने आदिवासी कला व संस्कृतीचे दर्शन घडविणारी भव्य हस्तकला प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या दालनांमध्ये अमरावती विभागातील धारणी, अकोला, पुसद, कळमनुरी, किनवट तसेच शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ, धारणी यांनी सहभाग नोंदविला. याशिवाय नागपूर विभागातील देवरी प्रकल्पातील चिमुकल्यांनी तयार केलेल्या विविध कलात्मक वस्तूंचे प्रदर्शन विशेष आकर्षण ठरले. या हस्तकला दालनांचे मान्यवरांच्या हस्ते उद्‌घाटन करण्यात आले.



उद्‌घाटन समारोपाच्या कार्यक्रमात अमरावती विभाग विरुद्ध नाशिक विभाग यांच्यातील हॉलीबॉल सामना अत्यंत चुरशीचा झाला. पहिल्या सेटमध्ये अमरावती संघाने २५ गुण, तर प्रतिस्पर्धी संघाने २० गुण मिळविले. दुसऱ्या सेटमध्ये अमरावती संघाने २५ गुण, तर प्रतिस्पर्धी संघाने १८ गुण प्राप्त केले. उत्कृष्ट सांघिक खेळ व दमदार कामगिरीच्या जोरावर अमरावती विभागाचा संघ विजयी ठरला. कार्यक्रमातून आदिवासी विद्यार्थ्यांमधील क्रीडा कौशल्य, सांघिक भावना, शिस्त तसेच आदिवासी हस्तकलेचा समृद्ध वारसा अधोरेखित झाला.

# समृद्धी शेत पांदन रस्ते व जल पुनर्भरण योजनेची अंमलबजावणी सुरू

**अमरावती/का.प्र.**

जिल्हा प्रशासनाने शेतक ऱ्यांच्या दळणवळणाची समस्या सोडविण्यासाठी आणि पाणी साठा वाढविण्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. संपूर्ण जिल्ह्यात ‘पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर समृद्धी शेत पांदन रस्ते व जल पुनर्भरण योजना’ राबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या योजनेअंतर्गत जिल्ह्यातील १४ तालुक्यांमध्ये बारामाही शेत रस्ते तयार करण्यात येणार असून, यासाठी स्थानिक नदी व नाल्यांमधील गाळ व साहित्याचा वापर केला जाणार आहे, यामुळे जलस्त्रोतांचे खोलीकरण होऊन पाणी पातळी वाढण्यास मदत होणार आहे.

योजना लोकसहभाग आणि शासकीय निधीच्या संयुक्त विद्यमाने राबविली जाणार आहे. योजनेसाठी प्रति किलोमीटर ९ लाख रुपयांचा खर्च निश्चित करण्यात आला असून, त्यापैकी ७.५ लाख रुपये शासन देणार आहे, तर उर्वरित १.५ लाख रुपये संबंधित अशासकीय संस्थेला लोकसहभा गातून उभे करावे लागणार आहेत. या कामासाठी रस्ते बांधणीचा अनुभव असलेल्या सेवाभावी संस्थांकडून अर्ज मागवण्यात येत आहेत. निवड झालेल्या संस्थांसोबत जिल्हाधिकारी कार्यालय सामंजस्य करार करणार आहे. या योजनेमुळे शेत रस्त्या वरील अतिक्रमणे दूर होऊन शेतकऱ्यांचा माल बाजारपेठेपर्यंत नेणे अधिक सुलभ होईल, असे उपजिल्हाधिकारी रोहयो यांनी कळविले आहे.

# हॉटेल, रेस्टॉरंट व शहरातील सर्व दवाखान्यांना कचरा व्यवस्थापनाचे सक्त निर्देश

## नियमभंग करणाऱ्यांवर दंडात्मक व प्रशासकीय कारवाई

**अमरावती/का.प्र.**

शहरातील हॉटेल, रेस्टॉरंट, मंगल कार्यालये, लॉन्स, केटरिंग व्यवसाय तसेच हॉस्पिटल, नर्सिंग होम व खाजगी दवाखान्यांमधून निर्माण होणाऱ्या कचऱ्याची शास्त्रशुद्ध व नियमबद्ध विल्हेवाट लावणे बंधनकारक असल्याचे स्पष्ट निर्देश अमरावती महानगरपालिकेच्या मा. आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी दिले आहेत. घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६, बायोमेडिकल वेस्ट व्यवस्थापन नियम तसेच स्वच्छ भारत अभियान (SBM) २.० अंतर्गत नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांवर कठोर दंडात्मक व प्रशासकीय कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला.



शहरातील हॉटेल, रेस्टॉरंट, मंगल कार्यालये, लॉन्स, बीअर बार, कॅन्टीन, होस्टेल तसेच खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्या हॉकर्सकडून मोठ्या प्रमाणात ओला व सुका कचरा तसेच शिजवलेले उरलेले अन्न निर्माण होत आहे. त्याचप्रमाणे हॉस्पिटल, नर्सिंग होम, मॅटरनिटी होम, पॅथॉलॉजी लॅब व खाजगी ओपीडी दवाखान्यांमधून मोठ्या प्रमाणात बायोमेडिकल वेस्ट निर्माण होत असून, काही ठिकाणी हा कचरा नियमानुसार विल्हेवाट न लावता इतरत्र टाकला जात असल्याच्या तक्रारी महानगरपालिकेस प्राप्त होत आहेत. यामुळे सार्वजनिक स्वच्छता व नागरिकांच्या आरोग्यास गंभीर धोका निर्माण होत आहे.

आढावा बैठकीस अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, स्वच्छता विभागाचे वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ.अजय जाधव, सहाय्यक नगर रचनाकार कांचन भावे, स्वास्थ अधिक्षक विजय बुरे, जेष्ठ स्वास्थ निरीक्षक राजु डिक्याव, श्रीकांत डवरे, कुंदन हडाले, शारदा गुल्हाणे, स्वास्थ निरीक्षक, कंत्राटदार प्रतिनिधी तसेच संबंधित कर्मचारी उपस्थित होते.

# नवनिर्वाचित अध्यक्षा डॉ. प्रियंका विश्वकर्मा यांनी पदभार स्वीकारला

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**


नवनिर्वाचित अध्यक्षा डॉ. प्रियंका विश्वकर्मा यांचा भव्य शपथविधी सोहळा नगरपरिषद परिसरात पार पडला. या कार्यक्रमासाठी नगरपालिका कार्यालय फुलांनी सुंदरपणे सजवण्यात आले होते.

परंपरा, संस्कृती आणि लोकशाही मूल्यांचे अद्भुत मिश्रण दिसून आले, ज्यामुळे हा समारंभ ऐतिहासिक बनला. व्यासपीठावर उपस्थित असलेल्या पाहुण्यांचे पारंपारिक रीतिरिवाजांनुसार भव्य स्वागत करण्यात आले.

नवनिर्वाचित नगराध्यक्षा प्रा. प्रियंका विश्वकर्मा यांनी शहरातील हजारो समर्थकांसह बॅन्जो, ढोल-ताशांच्या गजरात शहरातून रैली काढत नगरपालिका कार्यालयात पोहचत लोकशाही आणि जनतेच्या सेवेसाठी निष्ठा राखण्याची प्रतिज्ञा घेऊन पदभार स्वीकारला. यावेळी व्यासपीठावर विजयाचे शिल्पकार डॉ. नीलेश विश्वकर्मा, शिवसेना शिंदे गटाचे माजी आमदार अभिजीत अडसूड, जिल्हाप्रमुख आशिष धर्माळे, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे संतोष महात्मे, राष्ट्रवादी महिला जिल्हाध्यक्ष संगीता ठाकरे, माजी नगराध्यक्ष गणेश राय, प्रभाकर वाघ, माजी स्वातंत्र्यसैनिक मुलायमचंद जैन, कॉ. प्रसेनजीत तेलंग, विनोद जोशी, नंदू खेरडे ,डॉ.प्रकाश विश्वकर्मा उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विवेक राऊत यांनी केले तर प्रास्ताविक नगरसेवक हर्षल वाघ यांनी केले. आभार नगरसेवक सुमेद सरदार यांनी मानले. यावेळी नगरसेवक अरिहंत गेडाम, निलोफर मोहम्मद आसिफ शेख, जयहिंद क्रीडा मंडळाचे सदस्य पंकज वानखेडे, केशव केणे, राजेश मुंदडा, पिंटू बोबडे, राजिक शेख, राजिक पठाण, रोशन जालान, प्रशांत मस्के, श्रीकांत भोयर, विनोद वानखडे, योगेश आसावले, रवी दीक्षित, चेतन भूत, बुरहान बोहरा, प्रवीण खेरकर, मिथलेश विश्वकर्मा, सुनील भूत, बंडू मुंदडा, दीपक डहाणे, मनीष मुंदडा, अनंता कडूकर, अनूप पुरोहीत आणि असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.




# सावित्रीबाई फुलेंना अभिवादन



**चांदुर रेल्वे/वार्ताहर**

राजर्षी शाहू सायन्स महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना समिती व राजर्षी शाहू विज्ञान व अतुल जगताप कला कनिष्ठ महाविद्यालयातील सांस्कृतिक समिती यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन पर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील उपस्थित प्राध्यापक वर्ग शिक्षकेतर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक तथा विद्यार्थी यांनी पुष्प अर्पण करून अभिवादन केले. ३ जानेवारी ते २६ जानेवारी या कालावधीत आयोजित उपक्रम ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले ‘लेक वाचवा लेक शिकवा’ या अभियाना अंतर्गत प्रतिज्ञा वाचन करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय कार्यक्रम अधिकारी डॉ. जी बी संतापे, महिला कार्यक्रमाधिकारी डॉ. भगत, सांस्कृतिक समितीचे समन्वयक चव्हाण, सहसमन्वयिका देशमुख, सहसमन्वयक देशमुख यांच्या माध्यमातून करण्यात आले.

# अविरोध? ‘नोटा’ नाकारणारे तुम्ही कोण?

सध्या महाराष्ट्रात नगर पालिका आणि महापालिका निवडणुकांचा ज्वर उतरता उतरेना.डिसेंबरमध्ये नगर पालिका निवडणुकांचा गुंगारा (एनेस्थेशिया) उतरत नाही तोच महानगर पालिका निवडणुकांच्या गुंगीत मतदार गेलेत. गुंगारा यासाठी शब्द वापरला की या निवडणुकांत ‘ऐकावे ते नवल’ किंवा घडू नये ते घडले किंवा ‘अशक्य ते शक्य करतील स्वामा’ही वाक्य किंवा वचने आठवू लागली. घडलेल्या घटनाकडे जनता तटस्थ,चौकोनी चेहऱ्याने आणि निष्क्रिय भावाने पाहताना दिसते. पक्षांतर, कोलांटउड्या, तत्वहीनता ,मते विकत घेणे ह्या बाबी नैसर्गिक झाल्या. मतदारांच्या भावना बोथट झाल्या. हे चालतच असते म्हणून माणसांकडून प्रतिक्रिया देखिल येईनाशी झाली. रोजचेच झाले म्हणून संवेदना शून्य झालोत आपण. या सर्वात अधिक भर पडली तो बिनविरोध निवडून येण्याची.

गत डिसेंबरमध्ये झालेल्या निवडणुकीत पेन, शिर्डी, परळी, बारामती, दोंडाई, जामनेर, चिखलदरा, राजगुरूनगर अशा जवळ जवळ एक डझन ठिकाणच्या ४ डझनच्या वर नगरसेवक आणि जवळ जवळ अर्धा डझन नगराध्यक्ष बिनविरोध निवडून आलेत. आता जानेवारी २०२६ मध्ये होऊ घातलेल्या महानगरपालिकेत कल्याण डोंबिवली, ठाणे, पनवेल, भिवंडी, धुळे, अहिल्यानगर, जळगाव, पुणे, मालेगाव अशा काही महापालिकेत जवळ जवळ सहा डझन उमेदवार अविरोध निवडून आलेत. अविरोध निवडून येणे हा काही गुन्हा नाही किंवा अशी निवड घटनाबाह्य देखिल नाही. पण तरीही मला एक प्रश्न वारंवार सतावतो तो म्हणजे मतदान यंत्रावर उमेदवारांची नावे असतात आणि सर्वात शेवटी एक नोटाचे बटण असते. मतदारांना दिलेला हा नकाराधिकार आहे. ज्या अर्थी निवडणूक आयोगाने हे बटण मतदान यंत्रावर दिले त्याअर्थी ते संविधान संमत आहे. दिलेल्या उमेदवारांपैकी एकही पसंत नसेल,लायकीचा वाटत नसेल तर मतदार आपला नकाराधिकार




वापरू शकतो. जर नोटाला अधिक मते पडली तर नोटा जिंकला असा त्याचा अर्थ होतो. नोटा जिंकला तर तिथे पुन्हा निवड करण्याची प्रक्रिया राबवणे क्रमप्राप्त ठरते. असा प्रसंग आजपर्यंत कुठे आला असे ऐकिवात नसले तरी कायद्याने ही ठरवून दिलेली बाब आहे. थोडक्यात म्हणजे उभे असलेल्या उमेदवारात नोटा देखिल एक उमेदवारच समजल्या जातो. अजून सोप्या भाषेत सांगायचे तर नोटा विरुद्ध उमेदवार असा तो सामना असतो. त्यात नोटा जिंकूही शकतो. आता जिथे बाकी सर्व उमेदवारांनी आपल्या उमेदवाऱ्या मागे घेतल्या आणि केवळ एकच उमेदवार बाकी आहे त्याठिकाणी निवडणूक आयोगाने त्यांना निवडणूक होण्याआधी निकाल लावून अविरोध घोषित केले. मग आमच्या नोटा म्हणजे नकाराधिकाराचे काय?असा प्रश्न शिल्लक उरतोच. नोटा नावाचा आमचा उमेदवार प्रत्येक निवडणुकीत ताकदीने उभा असतो. तो ना प्रलोभनाने,ना धाकाने माघार घेतो.तो कायम उभा असतो. मग एखाद्या उमेदवाराला अविरोध घोषित करून आमच्या संविधानाने दिलेल्या आमच्या नकाराधिकारावर गदा आणण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला दिला कोणी?नाहीतर नोटा ला वांझोटा घोषित करा.

उमेदवार एक असो की अनेक ? आमचा नकाराधिकार कायम आहे. तो हक्क आम्हाला संविधानाने दिला आहे. तो आमचा हक्क आम्हाला बजावू दिला पाहिजे. त्यामुळे बिनविरोध ही संकल्पना सर्वच पक्षांचे उमेदवार बिनविरोध निवडून आल्याने त्यांना गोड वाटत असेलही कदाचित पण लोकशाहीला अविरोध ही घोषणा घातक आहे. असे माझे स्पष्ट मत आहे. जो उमेदवार अविरोध आला त्याने जबरदस्ती, धाक दाखवून, प्रलोभने देवून, वाममार्गाचा वापर करून तो अविरोध आला असे माझे अजिबात मत नाही. हा संशोधनाचा विषय असला तरी सकारात्मक विचार आपण करू की तो विधायक मार्गानेच अविरोध झाला. तो अविरोध झाला कारण ज्या पाच दहा लोकांनी उमेदवारी अर्ज भरले त्यांनी भरलेले अर्ज मागे घेतले म्हणून. त्या पाच दहाच्या मतांवर लोकप्रतिनिधी ठरविणे जनतेवर अन्याय होईल.अविरोध आलेला जनतेला नको असेल तर तो जनमताचा अनादर होईल. त्यामुळे आपला योग्य प्रतिनिधी निवडण्याची जनतेला पुन्हा संधी देणे हे सुदृढ लोकशाहीसाठी गरजेचे आहे. ‘नोटा’ पर्याय जोपर्यंत उपलब्ध आहे तोपर्यंत आमच्या नकाराधिकारावर कोणीही हातोडा फिरवू नये. ही माफक अपेक्षा मतदारांनी करणे अजिबात चुकीचे नाही. तस्मात नोटा असेपर्यंत अविरोध संकल्पना हास्यास्पद ठरेल.

**विद्यावाचस्पती**
**प्रा.दिलीप जोशी,**वाशिम.
मो.९८२२२६२७३५

# अमरावतीत ६ लाख ७७ हजार १८० मतदार

## प्रत्येक मतदाराला प्रभागात द्यावी लागणार चार मते

**अमरावती/का.प्र.**

अमरावती महापालिकेत ८७सदस्य निवडीसाठी १५ जानेवारी रोजी मतदान होणार आहे. चार सदस्य संख्येनुसार प्रभाग रचना मंजूर असल्याने प्रत्येक मतदाराला चार मते द्यावेच लागणार आहे. मग ते उमेदवार असो की ‘नोटा’. ईव्हीएमचे बटण चार वेळा दाबून लोकशाहीचा हक्क बजावणे अनिवार्य आहे त्याशिवाय मतदान केंद्रातून मतदारांना बाहेर पडता येणार नाही, अशी राज्य निवडणूक आयोगाची गाईडलाईन आहे.

महापालिका निवडणुकीत आरक्षणानुसार ‘अ’, ‘ब’,‘क’, ‘ड’ यानुसार प्रभागात चार उमेदवारांना निवडून द्यायचे आहे. मात्र, प्रभागात बरेचदा काही मतदारांना त्यांच्या पसंतीनुसार उमेदवार नसतात, अशावेळी काहीजण दोन किंवा तीन उमेदवारांना मते देण्याचे कर्तव्य बजावतात. मात्र निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार प्रत्येक मतदाराला चार मते द्यावे लागणार आहे. महापालिकेत ६ लाख ७७ हजार १८० मतदार आपल्या मतदानाचा हक्क बजावतील.

अमरावती महापालिकेची निवडणूक चार सदस्य प्रभाग रचनेनुसार होत आहे. त्यामुळे प्रत्येक मतदाराला चार मते देण्याचा अधिकार मिळाला आहे.प्रभागात चार उमेदवार असताना एखाद्या मतदाराला तीनच उमेदवारांना मते द्यायचे असल्यास चौथे ‘नोटा’चे बटण दाबावे लागेल, त्याशिवाय मतदान पूर्ण होणार नाही, असे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी सांगितले.

एखाद्या मतदाराने पसंतीच्या उमेदवाराला मत देण्यास किंवा वरीलपैकी एकही नाही,‘नोटा’या पर्यायासमोरील बटन दाबण्यास नकार दिला तर मतदान केंद्राध्यक्षांनी बॅलेट युनिटवरील उमेदवारांचे नावासमोरील दिवे एखादा पुठ्ठा अथवा पुस्तक ठेवून झाकावेत. त्यानंतर मतदान केंद्रात



उपस्थित सर्व मतदान प्रतिनिधींना बरोबर घेऊन त्यांच्या साक्षीने ज्या मतपत्रिकेवरील मतदान अपूर्ण राहिले, आहे, त्या मतपत्रिकेवरील ‘वरीलपैकी एकही नाही’ (नोटा) या पर्यायासमोरील बटण स्वतः दाबून मतदान प्रक्रिया पूर्ण करावी.

ईव्हीएम मशीनद्वारे मतदान करताना मतदाराने तीनच उमेदवारांना मतदान केले आणि चौथे बटण हे ‘नोटा’ दाबले तर ते मत कोणत्याही उमेदवारांना झाले नसून ते गणले जात नाही. त्या मताची गणना ‘वरीलपैकी एकही नाही’ अशी केली जाते. मतदान यंत्राच्या बॅलेट युनिटवर शेवटचे १६ वे ‘नोटा’ बटण ठेवले आहे. वार्ड रचनेत मतदाराला एकच मत देण्याचे अधिकार होते. मात्र अमरावतीला महानगराचा दर्जा प्राप्त झाल्यामुळे मतदारांना सुद्धा एका पेक्षा जास्त नगरसेवक निवडण्याचे अधिकार देण्यात आले आहे.

# शहर झोपेत आहे की जागे?

भारतातील लोकशाही व्यवस्थेचा कणा म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्था. यामध्ये महानगरपालिका ही शहरी प्रशासनाची सर्वात महत्त्वाची यंत्रणा आहे. नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी थेट संबंधित असलेले निर्णय महानगरपालिकेमार्फत घेतले जातात. अशा पार्श्वभूमीवर येऊ घातलेली महानगरपालिका निवडणूक ही केवळ राजकीय प्रक्रिया नसून, आपल्या शहराच्या भवितव्याचा निर्णय घेणारा महत्त्वाचा टप्पा आहे.

**महानगरपालिका निवडणूक का महत्त्वाची?**

रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, सार्वजनिक आरोग्य, शिक्षण, महिला व बालकल्याण, ज्येष्ठ नागरिक सुविधा, या सर्व गोष्टी थेट महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात येतात. आपण दररोज ज्या समस्या अनुभवतो, त्यांची उत्तरे या निवडणुकीतून निवडल्या जाणाऱ्या प्रतिनिधींवर अवलंबून असतात.

**लोकसहभागातूनच खरे परिवर्तन**

सामाजिक कार्यकर्ता म्हणून विविध वस्ती, झोपडपट्ट्या, कॉलन्या, व्यापारी परिसर व उपनगरांमध्ये काम करताना नागरिकांच्या अपेक्षा स्पष्टपणे जाणवतात - स्वच्छ शहर, सुरक्षित परिसर आणि सर्वसमावेशक विकास.मात्र केवळ अपेक्षा पुरेशा नाहीत. मतदान हाच खऱ्या परिवर्तनाचा पहिला टप्पा आहे. प्रत्येक मतदाराने मतदान करून आपली भूमिका स्पष्ट करणे अत्यंत आवश्यक आहे.

**उमेदवार निवडताना काय पाहावे ?**

मतदान करताना घोषणांपेक्षा कामगिरी व दृष्टिकोन महत्त्वाचा आहे. नागरिकांनी उमेदवारांना खालील प्रश्न विचारले पाहिजेत.आपल्या प्रभागातील मूलभूत सुविधा कशा सुधारणार?नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी कोणती ठोस योजना आहे?युवक, महिला व ज्येष्ठ नागरिकांसाठी काय विशेष उपक्रम राबवणार?पारदर्शक आणि भ्रष्टाचारमुक्त प्रशासनासाठी काय भूमिका असेल ?

**युवक आणि महिलांचा सक्रिय सहभाग आवश्यक**

युवक आणि महिला हे समाजाचे भविष्य आहेत. त्यांचा सहभाग वाढल्याशिवाय कोणतेही परिवर्तन शाश्वत होऊ शकत नाही. त्यामुळे युवकांनी केवळ मतदार म्हणून नव्हे तर ‘जागरूक नागरिक’ म्हणून पुढे यावे. महिलांनीही स्थानिक नेतृत्वात सक्रिय सहभाग घ्यावा, ही काळाची गरज आहे.

**पक्षापेक्षा शहर प्रथम**

महानगरपालिका ही राजकारणासाठी नव्हे, तर नागरिकांच्या सेवा-सुविधांसाठी आहे. पक्षीय मतभेद बाजूला



ठेवून ‘प्रामाणिक, कार्यक्षम व दूरदृष्टी असलेले नेतृत्व’ निवडणे हेच आपल्या शहराच्या हिताचे आहे.

**नागरिकांची सामूहिक जबाबदारी**

निवडणूक झाल्यानंतरही आपली जबाबदारी संपत नाही. नागरिकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींशी संवाद साधणे, प्रश्न विचारणे व सकारात्मक सहकार्य करणे आवश्यक आहे. प्रशासन आणि नागरिक यांचा समन्वय साधला तरच खऱ्या अर्थाने विकास घडेल.आगामी महानगरपालिका निवडणूक ही आपल्या शहराच्या उज्ज्वल भविष्यासाठी एक सुवर्णसंधी आहे. स्वच्छ, सुरक्षित, सक्षम आणि समावेशक शहर घडवायचे असेल तर ‘जागरूक मतदान हाच मार्ग आहे.’



**सुराज साधना सुरेश कुटे**
संस्थापक अध्यक्ष,सुराज्य निर्माण प्रतिष्ठान

# ई.व्ही.एम. गोदामाची निवडणूक अधिका-यांकडून पाहणी

**अमरावती/का.प्र.**

निवडणूक अधिकारी तथा अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी येथील सांस्कृतिक भवन परिसरात असलेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र गोदामाची सविस्तर पाहणी केली. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ई.व्ही.एम. यंत्रांच्या साठवणूक, सुरक्षा व व्यवस्थापनाबाबत सुरू असलेल्या कामकाजाचा आढावा घेण्याच्या उद्देशाने ही पाहणी करण्यात आली.

यावेळी आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी ई.व्ही.एम. साठवणूक व व्यवस्थापन केंद्रातील प्रत्यक्ष कार्यपद्धती पाहून संबंधित अधिकाऱ्यांकडून सविस्तर माहिती जाणून घेतली. ई.व्ही.एम. मशीनची सुरक्षित साठवणूक, नोंदणी, देखभाल, तांत्रिक तपासणी तसेच गोदामातील सुरक्षा व्यवस्थेचा त्यांनी आढावा घेतला. गोदामातील सीसीटीव्ही व्यवस्था, प्रवेश नियंत्रण, रजिस्टर व कागदपत्रांची पडताळणी याबाबतही त्यांनी सूचना केल्या.

ई.व्ही.एम. संदर्भातील सर्व कामकाज हे मा. राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार काटेकोरपणे व पारदर्शक पद्धतीने राबविण्यात यावे, असे निर्देश आयुक्तांनी दिले. सदर कामासाठी योग्य नियोजन करून वेळेत व गुणवत्तापूर्ण पद्धतीने काम पूर्ण करण्यावर भर देण्यास त्यांनी सांगितले. तसेच कोणत्याही प्रकारची त्रुटी राहू नये यासाठी दक्षता घेऊन कामाची गती



वाढविण्याच्या स्पष्ट सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

निवडणूक प्रक्रिया ही लोकशाहीचा कणा असून त्यामध्ये ई.व्ही.एम. यंत्रांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे यंत्रांची सुरक्षितता व व्यवस्थापन याबाबत कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही, असेही आयुक्तांनी यावेळी नमूद केले.पाहणीदरम्यान संबंधित विभागाचे अधिकारी, कर्मचारी तसेच ई.व्ही.एम. व्यवस्थापनाशी निगडीत कर्मचारी उपस्थित होते.

# आता महापौर आरक्षणाचे वेध

**अमरावती/का.प्र.**

येत्या १५ जानेवारी रोजी मतदान आणि १६ जानेवारीला मतमोजणी होणार आहे. १३ जानेवारी रोजी सायंकाळी ५ वाजता प्रचार संपणार आहे. त्यामुळे मतदारांच्या भेटीगाठी, प्रचार सभा, नेत्यांचे रोड-शो, कार्नर सभा, रॅली यांसह दारोदारी आशीर्वाद घेण्यासाठी उमेदवारांना अवघे ८ दिवस मिळणार आहेत. तर दुसरीकडे भाजप, राष्ट्रवादी (अजित पवार), शिंदेसेना, काँग्रेस, युवा स्वाभिमान पक्ष महापालिकेवर सत्ता स्थापनेसाठी दावे-प्रतिदावे करू लागले आहेत. मात्र, महापौरपदाचे आरक्षण जाहीर झाले नसल्याने अमरावतीचा पहिला नागरिक कोण, हे अद्याप गुलदस्त्यात आहे. तर दुसरीकडे इच्छुकांचे ‘हार्ट बीट’ आरक्षणअभावी दरदिवशी वाढत असल्याचे वास्तव आहे.

निवडणूक निकालाच्या एक दिवसापूर्वीसुद्धा महापौरपदाचे आरक्षण काढता येते, अशी राज्य निवडणूक आयोगाची नियमावली आहे. त्यामुळे अमरावती महापालिकेचा नवा महापौर कोण, हे मतदानाच्या दिवशीसुद्धा जाहीर होऊ शकते, असे संकेत आहेत. राज्य शासनाकडून महापौरपदाच्या आरक्षणासाठी तूर्त कोणत्याही हालचाली नाहीत, अशी नगर विकास विभागाची माहिती आहे.बृहन्मुंबईसह राज्यभरात २९ महापालिकेत महापौरपदासाठी आरक्षण काढण्यात आले नाही. त्यामुळे वेळेवर महापौरपदाचे आरक्षण काढून ते जाहीर करणे ही सत्तापक्ष भाजपची ही नवी ‘स्टॅटेजी’ असू शकते, असे राजकीय जाणकारांचे मत आहे. कारण अगोदर महापौरपदाचे आरक्षण जाहीर केले की, अंतर्गत स्पर्धा वाढते आणि त्यातून महापौरपदासाठी असलेल्या स्पर्धकांची ‘विकेट’ घेण्याची रणनीती सुरू होते.

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या मुख्य निवडणूक कार्यालयाचे उद्‌घाटन

**अमरावती/का.प्र.**

अमरावती महानगर पालिकेच्या निवडणुकीत प्रभाग क्रमांक- ३ नवसारी मधून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अधिकृत उमेदवारांच्या मुख्य प्रचार कार्यालयाचे उदघाटन सोहळा कठोरा नाका स्थित थीम पार्क येथे मोठ्या राष्ट्रवादीमय वातावरणात संपन्न झाला. अपघातात दुखापतीनंतर तब्बल १५ दिवसांनी मोठ्या मंचावर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे संघटन महासचिव आ.संजय खोडके यांचे प्रथमच उपस्थिती ही लक्षवेधी व सर्वांमध्ये नवा जोश व उत्साह निर्माण करणारी ठरली.

यावेळी यश खोडके तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अधिकृत उमेदवार - प्रशांत डवरे , संकेत महल्ले, प्रिया धनाडे, परवीन बानो मोहम्मद फारुख (मंडपवाले), त्याचबरोबर माजी



-नगरसेविका स्वाती जावरे, चित्रा महल्ले, जेष्ठ नागरीक मंडळाचे अध्यक्ष - पुरुषोत्तमजी गावंडे, सहकार क्षेत्रातील नरेश पाटील, मातोश्री वृद्धाश्रमचे सुखदेवराव राऊत, गणेशराव गाले, वासुदेवराव तायवाडे, सुरेश शिरभाते, प्रताप देशमुख, सुनिलजी जावरे, हाजी मसूद साहब, खालिद मास्टर, विश्वनाथजी सदांशिवे, विलास चर्जन, सुभाषराव गावंडे, दयाराम तायडे, आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. सर्वप्रथम सुलभा संजय खोडके यांच्या हस्ते नवसारी प्रभागाच्या मुख्य निवडणूक कार्यालयाचे फीत कापून उदघाटन करण्यात आले.

राष्ट्रवादीला बळ म्हणजेच विकासाला साथ असल्याने नवसारी प्रभागात सुद्धा विकासाचा भगीरथ आणण्यासाठी सर्वानी याचे शिलेदार होण्याचे आवाहन प्रशांत डवरे यांनी केले. यावेळी उपस्थित सर्व सहकारी व स्थानिक नागरिकांनी वारे घड्याळ... आली रे. घड्याळ अशा घोषणा करताच संपूर्ण परिसर दणाणून गेला. कार्यक्रमाचे संचालन संदीप जुनघरे व आभार प्रदर्शन शोभना देशमुख यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेले राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे संघटन महासचिव आ. संजय खोडके यांनी आपल्या निवडणुकीपुरते राजकारण असते, निवडणुकीनंतर सर्वसमावेशक जनतेची कामे करणे हे लोकप्रतिनिधींचे कर्तव्य असते. २० टक्के राजकारण व ८० टक्के समाजकारण करून सर्वसमाज घटकांना सोबत घेऊन प्रत्येकाला विकासाच्या प्रवाहात आणणे, हीच राष्ट्रवादीची विचारधारा आहे. अमरावतीकर जनतेच्या अपेक्षेनुरूप विकास कामांची पूर्तता करत असतांना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने अमरावती महानगर पालिकेच्या निवडणुकीसाठी गतिमान अमरावतीचे व्हिजन मांडणारा जाहीरनामा प्रकशित केला आहे. प्रभागा -प्रभागात हाच कृती कार्यक्रम प्रत्यक्षात उतरविण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या उमेदवारांना निवडून देण्याचे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे संघटन महासचिव आ. संजय खोडके यांनी केले आहे.

# सावित्री ज्योती उत्सवात विद्यार्थ्यांनी दिला लोकशाहीचा जागर

**अमरावती/का.प्र.**

मनपा हिंदी प्राथमिक शाळा क्रमांक १२ व मनपा हिंदी कन्या माध्यमिक विद्यालय, नागपुरी गेट, अमरावती येथे आद्यशिक्षिका क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्ताने शाळेमध्ये सावित्री ज्योती उत्सव आयोजित करण्यात आला.उत्सवाअंतर्गत शालेय विद्यार्थ्यांच्या क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. चित्रकला स्पर्धा, सुंदर हस्ताक्षर स्पर्धा व निबंध स्पर्धा घेण्यात आली, तर ३ जानेवारी रोजी भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



या सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी नाटक व नृत्याच्या माध्यमातून येत्या १५ जानेवारी रोजी मतदान करण्याचे महत्त्व अधोरेखित करत आपल्या पालकांना मतदानाचा प्रभावी संदेश दिला. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणातून लोकशाही मूल्यांची जाणीव करून देण्यात आली. मतदान जनजागृती नंतर बालविवाह विरोधी शपथ घेतली गेली. कार्यक्रमाचे उद्‌घाटन महानगरपालिका शिक्षण अधिकारी डॉ. प्रकाश मेश्राम यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शाळा निरीक्षक योगेश पखाले, अभियंता शहाळे, सहायक कार्यक्रम अधिकारी पंकज सपकाळ, सुषमा दूधे, शुभांगी सुने, संजय बेलसरे, कैलास कुलट व चेतन आर्विकर यांच्यासह स्वीप विभागाची संपूर्ण टीम उपस्थित होती. तसेच पोलीस उपनिरीक्षक भार्गव व पारधी यांनीही उपस्थिती लावली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुलकर्णी मॅडम यांनी केले. कार्यक्रमास शाळेच्या मुख्याध्यापिका मंगला व्यास व वंदना फुंदे यांच्यासह सर्व शिक्षकवृंद उपस्थित होता. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संतोष साहू, गणेश सावंत, स्वप्नील रंगारी, रविकुमार मोरदेवे, मेघा घाटोळ, योगिता भालेकर, पल्लवी, भांगे, भावना बढे, निखत, रिजवान, मुजम्मिल, किर्ती, गायत्री, अर्पिता, निलिमा, थोटांगे , पोर्णिमा तसेच शिक्षकेतर कर्मचारी शुभम देशमुख व नंदा वानखडे आणि विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. स्पर्धेत विजेता विद्यार्थ्यांना मा.शिक्षणाधिकारी डॉ. प्रकाश मेश्राम सर यांनी पारितोषिक देऊन गुण गौरव केला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन निखत यांनी केले.

# ना. एकनाथ शिंदे आज अकोल्यात!

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मैदानावर प्रचार सभा

**■ प्रतिनिधी | अकोला ■**

**शिवसेनेचे राष्ट्रीय प्रमुख आणि राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची उद्या बुधवारी ७ जानेवारी रोजी दुपारी १ वाजता अकोल्यात जाहीरसभा होणार असून या सभेलानंतर अकोल्यातील राजकीय स्तिती बदलण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.**





अकोला महापालिका निवडणुकीत महायुतीचा घटकपक्ष शिवसेना स्वबळावर लढत असून यावेळी सेनेने प्रथमच ७२ उमेदवार रिंगणात उतरवून भाजपच्या डोकेदुखीत वाढ केली आहे. शिवसेनेचे विदर्भ समन्वयक ना. संजय राठोड यांच्या नेतृत्त्वातपक्षाने माजी आमदार श्रीकांत देशडपांडे आणि माजी आमदार डॉ. शशिकांत खेडेकर यांची निवडणूक निरीक्षक म्हणून नियुक्ती केल्यावर उपनेते गोपीकिशन बाजोरिया, जिल्हाप्रमुख श्रीरंग पिंजरकर, अश्विन नवले, नारायणराव गव्हाणकर, पांडे गुरुजी, युवासेना प्रदेश सचिव विठ्ठल सरप पाटील शहरप्रमुख राजेश मिश्रा, रमेश गायकवाड, वैभव चौधरी, जिल्हाउपप्रमुख योगेश अग्रवाल, महिला आघाडी जिल्हाप्रमुख उषाताई वीरक, रेखाताई राऊत यांनी मोठी निडणूक तयारी सुरु केली असून उद्या पक्षाचे प्रमुख एकनाथ शिंदे यांच्या जाहीरसभेने पॅक्सच्या प्रचाराचा धुराळा सुरु होणार आहे. शिवसेनेला यावेळी ४० पेक्षा जास्त वार्डात प्रभावी उमेदवार मिळाले असून त्यांना प्रचाराची मोठी रसद पुरविण्याचा पक्षाने विचार केलं असल्याने अकोला शहरात शिवसेनेचा मोठा झंझावात येत्या दोन दिवसात तयार होणार असल्याची माहिती आहे. उद्या होणाऱ्या एकनाथ शिंदे यांच्याजाहीरसभेत अकोला शहरातील विविध पक्षातील अनेक पदाधिकारी शिवसेनेत प्रवेश करणार असल्याची माहिती स्थानिक नेत्यांनी दिली असून पक्षच्या विविध यंत्रणा जाहीरसभेसाठी सक्रिय झाल्या आहेत.

**उद्या वचननामा प्रकाशन**

उद्या बुधवारी दुपारी डॉ. आंबेडकर मैदानावर होणाऱ्या एकनाथ शिंदे यांच्या सभेत उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते शिवसेनेच्या अकोला मनपाच्या वचननाम्याचे प्रकाशन होणार आहे. युवासेना सचिव विठ्ठल सरप पाटील आणि उपजिल्हाप्रमुख योगेश अग्रवाल यांच्या सहभागाने हा वचननामा तयार करण्यात आला आहे.

# लोकशाही व्यवस्थेत पत्रकारांची भूमिका महत्त्वपूर्ण - आयुक्त डॉ. सुनील लहाने



## मतदार जनजागृती व निवडणुकीतील माध्यमांच्या भूमिकेवर सखोल मंथन

**■ प्रतिनिधी | अकोला ■**

लोकशाही व्यवस्थेत निवडणुका म्हणजे लोकशाहीचा उत्सव असून, चौथा स्तंभ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या माध्यम क्षेत्रातील पत्रकारांची भूमिका या काळात अत्यंत महत्वपूर्ण आणि समाजाला दिशादर्शक ठरणारी असते, असे प्रतिपादन अकोला महानगरपालिका आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सुनील लहाने यांनी केले.

मराठी पत्रकार दिनानिमित्त अकोला महानगरपालिका, श्री शिवाजी महाविद्यालय आणि अकोला श्रमिक पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने वसंत सभागृहात आयोजित मतदार जनजागृती व पत्रकार कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री शिवाजी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. आशिष राऊत होते. प्रमुख वक्ते म्हणून जिल्हा माहिती अधिकारी डॉ. हर्षवर्धन पवार उपस्थित होते. यावेळी शिक्षणाधिकारी हरिश्चंद्र इटकर, अकोला श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रबोध देशपांडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. लहाने पुढे म्हणाले, लोकशाहीमध्ये अधिकारांसोबत कर्तव्यांचीही जाणीव असणे गरजेचे आहे. मतदान करणे ही प्रत्येक मतदाराची मुख्य जबाबदारी असून, प्रत्येक नागरिकाने मतदान केले पाहिजे. यामुळे लोकशाही व्यवस्था अधिक बळकट होईल.

डॉ. हर्षवर्धन पवार यांनी लोकशाहीतील पत्रकारांच्या भूमिकेवर सविस्तर मांडणी करताना, निवडणुकांमध्ये निष्पक्ष, अचूक व विश्वासार्ह पत्रकारिता करण्याचे आवाहन केले. पत्रकारांच्या लेखणीमुळेच शासन व प्रशासनाचे लक्ष वेधले जाते आणि शाश्वत विकासाला चालना मिळते, असे त्यांनी नमूद केले. पत्रकारांनी विश्वासार्हता आणि अचूकता जपणे अत्यंत आवश्यक असल्याचे मत प्रबोध देशपांडे यांनी व्यक्त केले. महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभावी मतदार जनजागृती सुरू असून मतदानाची टक्केवारी निश्चित वाढेल, असा विश्वास हरिश्चंद्र इटकर यांनी व्यक्त केला. शहराचे भवितव्य घडविण्यासाठी निवडणूक महत्त्वाची असून प्रत्येकाने मतदान केलेच पाहिजे, असे आवाहन डॉ. आशिष राऊत यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. श्रीकांत उखळकर यांनी केले, तर आभार प्रा. शिल्पा शिंदे यांनी मानले. कार्यक्रमाला महापालिकेचे जनसंपर्क अधिकारी भरत शर्मा, संजय खराटे, सामर्थ्य फाउंडेशनचे वरिष्ठ उपाध्यक्ष विनोद देव, सामाजिक कार्यकर्ते जावेद जकारिया, ज्येष्ठ पत्रकार राजकुमार उखळकर, रवींद्र बुलनकर, किरण चौक, सूर्यकांत बुडकले, विलास राठोड, राजेंद्र निकुंभ, प्रमोद रत्नपारखी, ज्येष्ठ नागरिक संघाचे डॉ. सत्यनारायण बाहेती, भावसार समाजाचे पदाधिकारी अनिल मावळे यांच्यासह पत्रकार, प्राध्यापक, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**विद्यार्थ्यांनी जाणले मतदानाचे महत्त्व**

नवमतदार विद्यार्थ्यांनी निवडणुकीतील मतदानाचे महत्त्व प्रत्यक्ष जाणून घेतले. मतदार जनजागृती अभियानाचे नोडल अधिकारी हरिश्चंद्र इटकर व प्रा. डॉ. श्रीकांत उखळकर यांनी विद्यार्थ्यांना निवडणूक प्रक्रियेची माहिती देत मतदानासाठी प्रोत्साहित केले.

# अपक्षांची 'किंगमेकर' चाल; अकोला मनपा निवडणूक कुणाचे गणित बिघडवणार

## मतविभाजन अटळ, पक्षीय लढतींना अपक्षांचे आव्हान

***■ प्रतिनिधी | अकोला ■***

*सात वर्षांच्या दीर्घ प्रतीक्षेनंतर होत असलेली अकोला महानगरपालिकेची निवडणूक यंदा केवळ सत्तासंघर्षापुरती मर्यादित राहिलेली नाही, तर ती अपक्ष उमेदवारांच्या भूमिकेमुळे पूर्णतः अनिश्चिततेकडे झुकलेली दिसत आहे. प्रमुख राजकीय पक्षांमधील सरळ लढतीपेक्षा अनेक प्रभागांत 'अपक्ष कुणाचा घात करणार?' हा प्रश्नच निर्णायक ठरण्याची चिन्हे आहेत.*

*२० प्रभागांतील ८० जागांसाठी झालेल्या निवडणुकीत तब्बल ६३३ उमेदवारांनी अर्ज दाखल केले, त्यापैकी १६४ जणांनी माघार घेतली, तर ४६९ उमेदवार प्रत्यक्ष रिंगणात उतरले आहेत. यामध्ये ९० हून अधिक अपक्ष उमेदवारांची उपस्थिती ही यंदाच्या निवडणुकीची सर्वात ठळक बाब ठरत आहे.*

**असंतोषाची किनार, बंडखोरीचे राजकारण**

बहुसंख्य अपक्ष उमेदवार हे थेट किंवा अप्रत्यक्षपणे प्रमुख पक्षांतील तिकीटवंचित, नाराज आणि असंतुष्ट कार्यकर्ते असल्याचे स्पष्ट होत आहे. पक्षश्रेष्ठींच्या निर्णयांविरोधात उघड बंडखोरी करत अनेकांनी अपक्ष म्हणून निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला. परिणामी एकाच विचारसरणीतील दोन-तीन उमेदवार एकाच प्रभागात असल्याने मतविभाजन अटळ मानले जात आहे.

भाजप, काँग्रेस, शिवसेना (शिंदे व उद्धव गट), राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यातील थेट संघर्षात आता अपक्षांची भर पडल्याने अनेक प्रभागांत लढती त्रिकोणी नव्हे तर बहुकोनी होत आहेत. याचा थेट परिणाम म्हणजे विजयी होण्यासाठी लागणाऱ्या मतांचे प्रमाण घटण्याची शक्यता आहे.

**स्थानिक मुद्द्यांवर अपक्षांचा थेट हल्ला**

पक्षीय घोषणांपेक्षा पाणीपुरवठा, रस्त्यांची दुरवस्था, कचरा व्यवस्थापन, अतिक्रमण, विकासकामांचा अभाव यांसारख्या स्थानिक प्रश्नांवर अपक्ष उमेदवारांनी थेट मतदारांशी संवाद साधण्याची रणनीती अवलंबली आहे. वैयक्तिक जनसंपर्क, सामाजिक कामांची पार्श्वभूमी आणि स्थानिक ओळख या भांडवलावर काही अपक्ष उमेदवार कट्टर पक्षीय मतदारांनाही आकर्षित करताना दिसत आहेत.

**'किंगमेकर' ठरणार का अपक्ष?**

राजकीय जाणकारांच्या मते, यंदाच्या निवडणुकीत अपक्षांची भूमिका थेट किंगमेकर ठरू शकते. काही प्रभागांत भाजपची मते फुटण्याची शक्यता, तर काही ठिकाणी काँग्रेस किंवा शिवसेनेच्या पारंपरिक मतदारांवर अपक्षांचा परिणाम होऊ शकतो. त्यामुळे अपेक्षित दिग्गज उमेदवार पराभूत होण्याची आणि तुलनेने कमी ओळखीचा उमेदवार विजयी ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**निकाल अनिश्चित, मतदार ठरणार निर्णायक**

एकूणच, अपक्षांची वाढती संख्या, पक्षांतर्गत बंडखोरी आणि मतविभाजनाची शक्यता पाहता अकोला मनपा निवडणूक अत्यंत चुरशीची व अनिश्चित ठरणार हे स्पष्ट संकेत मिळत आहेत. कुणाच्या सत्तेचे स्वप्न साकार होणार आणि कुणाचे गणित बिघडणार, याचा अंतिम फैसला मतदारांच्या हाती असून संपूर्ण शहराचे लक्ष आता निकालाकडे लागले आहे.

# तब्बल ३० वर्षांनंतर वर्गमित्र आले एकत्र!



## टिळक राष्ट्रीय सरस्वती मंदिरात स्नेहसंमेलननिमित्त जुन्या आठवणींना उजाळा

**■ प्रतिनिधी | अकोला ■**

आयुष्यात कितीही मोठे झालो, उच्च पदावर पोहोचलो तरी शालेय जीवनातील आठवणी आणि वर्गमित्रांचे ऋण कधीच विसरता येत नाही. याच भावनेतून टिळक राष्ट्रीय सरस्वती मंदिरातील १९९५ सालच्या बॅचचे माजी विद्यार्थी तब्बल ३० वर्षांनंतर एकत्र आले. २८ डिसेंबर रोजी आयोजित स्नेहसंमेलनात जुन्या आठवणींना उजाळा मिळत भावनिक क्षण अनुभवायला मिळाले.

या स्नेहसंमेलनासाठी अनेक माजी विद्यार्थी बाहेरगावाहून आवर्जून उपस्थित राहिले. तीन दशकांनंतर पुन्हा भेटण्याची उत्सुकता सर्वांच्याच चेहऱ्यावर दिसत होती. प्रत्यक्ष भेटीत वयोमानानुसार झालेल्या बदलामुळे काही क्षण एकमेकांना ओळखणेही कठीण गेले. मात्र संवाद सुरू होताच शालेय जीवनातील गमतीजमती, शिक्षकांचे संस्कार, वर्गातील खोड्या आणि त्या काळातील आठवणी पुन्हा ताज्या झाल्या.

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे वर्गमित्र व आयोजक राजू दामोदर यांनी सर्व उपस्थितांना भारतीय संविधानाची प्रत भेट म्हणून दिली. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक झाले. कार्यक्रमाला शाळेच्या प्राचार्य संध्या भटकर यांच्यासह रूपाली तिडके, प्रतिभा वडदकार, विजू मेश्राम, दीपक पळसपगार, मधुकर दावेदार आदी शिक्षक व कर्मचारी वर्ग उपस्थित होता. यावेळी राजू दामोदर, आदींनी मनोगत व्यक्त केले.

## नावात बदल

माझे नाव शाळा सोडल्याच्या दाखला ( टी.सी.) वर सुमय्या बिन्त अबु ताहेर असे आहे परंतु लग्न झाल्यावर माझे नाव सुमय्या सलीम असे बदलले आहे.हे नाव आधार कार्ड , पॅन कार्ड, आणि मतदान कार्ड वर आहे.दोन्ही नावाची एकच व्यक्ती असल्यामुळे आता माझे सर्व व्यवहार सुमय्या सलीम या नावाने आहे.

**सुमय्या सलीम**
उमरी अरब ता. मूर्तिजापुर
जि. अकोला.

# मोहाळा येथील मस्जिदीत काँग्रेस नेते हिदायत पटेल यांच्यावर चाकूहल्ला

## अकोट तालुक्यात तणाव; आरोपी अटकेत

**■ प्रतिनिधी | अकोट ■**



अकोट तालुक्यातील मोहाळा येथे मस्जिदीत आपसी वादातून काँग्रेस नेते हिदायत पटेल यांच्यावर तरुणाने चाकूहल्ला केल्याची खळबळजनक घटना मंगळवारी (दि. ६) घडली. या हल्ल्यात पटेल गंभीर जखमी झाले असून त्यांच्या पोटावर व कानावर चाकूचे वार करण्यात आल्याची माहिती आहे.

जखमी अवस्थेत हिदायत पटेल यांना तातडीने अकोट येथील धांडे रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथून पुढील उपचारासाठी अकोला येथे हलविण्याची तयारी सुरू असतानाच रुग्णवाहिकेत त्यांना हृदयविकाराचा झटका आल्याने त्यांना पुन्हा धांडे रुग्णालयात दाखल करण्यात आले. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे वृत्त आहे. घटनेची माहिती वाऱ्यासारखी पसरताच धांडे रुग्णालय परिसरात हजारो नागरिकांनी गर्दी केली. त्यामुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून अकोट शहर पोलिसांनी रुग्णालयात तगडा बंदोबस्त तैनात केला आहे. तसेच अकोट ग्रामीण पोलिसांचा ताफा मोहाळा गावात दाखल झाला असून गावाला छावणीचे स्वरूप आले आहे. घटनास्थळी उपविभागीय पोलिस अधिकारी निखिल पाटील, अकोट ग्रामीण पोलिस ठाण्याचे ठाणेदार किशोर जुनघरे, शहर पोलिस ठाण्याचे ठाणेदार अमोल माळवे यांनी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. अकोला येथील वैद्यकीय पथकही अकोटमध्ये दाखल झाले आहे. अकोट शहरातील काही भागांसह मोहाळा, तेल्हारा, दहिहांडा, हिवरखेड आदी परिसरात पोलिस बंदोबस्त वाढविण्यात आला आहे. या प्रकरणी अकोट ग्रामीण पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू आहे. दरम्यान, सायंकाळी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने आरोपीला अकोट तालुक्यातील पणज येथून अटक केली आहे.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ४१**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## ज्युबिली इंग्लिश हायस्कूलच्या विज्ञान व कला महोत्सवास प्रतिसाद



**■ प्रतिनिधी | अकोला ■**

विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना उजाळा देण्यासाठी अनेक शैक्षणिक व क्रीडाविषयक उपक्रम राबविणाऱ्या अकोला एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित स्थानीय ज्युबिली इंग्लिश हायस्कूलच्या विज्ञान व कला महोत्सवास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून सौ. जेष्ठ समाजसेवी सौ वैजयंती पाठक उपस्थित होत्या. अकोला एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष आर.आर. देशपांडे यांच्या अध्यक्षतेत संपन्न या कार्यक्रमात मंचावर संस्थेचे उपाध्यक्ष जोशी, सचिव शार्दुल दिगंबर, सदस्य विनोद देव, हायस्कूलच्या प्राचार्या सौ. पूर्वा कूळकर्णी आदी उपस्थित होते. दिप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

## जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना तसेच वित्तीय संस्था व बँक यांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते कि, माझे पक्षकार फाजिल अली हैदर अली, रा. वाशिम बायपास, अकोला, ता. जि. अकोला यांनी खालील वर्णनाचा प्लॉट मिळकत विकत घेण्याचा सौदा फरहाना परवीन इन्साफ अहमद खान, रा. पारस, टिचर कॉलनी, ता. बाळापूर, जि. अकोला यांचे सोबत सदर मिळकतीचे खरेदीखत करण्याचा सौदा आमचे पक्षकार यांनी त्यांची पत्नी नामे नझीया तब्बसुम फाजिल अली यांच्या नावाने नोटरी व्दारे इसार पावती करून सौदा कायम होता. तसेच इसार पावतीचे संपुर्ण पैसे आमचे पक्षकार यांनीच दिले होते. परंतु काही कारणामुळे आमचे पक्षकाराची पत्नी त्यांना सोडून गेल्या. सदरहु मालमत्तेचे वर्णन मौजे कसबे अकोला प. ता. अकोला येथील शेत सर्वे नं. ३ / १ चे जमीनी लांडे गृह निर्माण संस्थेचे नकाशातील अ. न. २ ची उत्तर - दक्षिण वाटणी करून पश्चिम भागाची जागा माप पुर्व - पश्चिम : ५. ८७५ मिटर, उत्तर - दक्षिण : १५.०० मिटर ज्याचे क्षेत्रफळ ८८.१२५ चौ. मिटर असून त्याची चतु:सिमा :- पूर्वेस - यातिल बाकी जागा पश्चिमेस- अ. नं ३ ची जागा उत्तरेस - अ. नं. ३१ ची जागा दक्षिणेस - ९ मिटरचा रोड वरील मालमत्ता ही आमचे पक्षकार यांची पत्नी नामे नझीया तब्बसुम फाजिल अली आपसी मतभेद असल्यामुळे सदरची मालमत्ता आमचे पक्षकाराला न सांगता कोणी खरेदी, गहाण, कुठल्याही प्रकारचे हस्तांतरण, इत्यादी प्रकारचे हस्तांतरण केल्यास आपण सर्वस्वी जबाबदार राहाल. करीता जाहीर नोटीस.

पक्षकारातर्फे
**ॲड. बी. एस. किटे**
दिवाणी व फौजदारी तथा जिल्हा व सत्र न्यायालय,
अकोला.मो. ९२८४९७०५५७

## चौकशीची जाहिर नोटीस
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

जा.क्र. ३६६५/२०२५ दि. १८/१२/२०२५
अर्ज क्रमांक :- १६२/२०२५ कलम- १९
**सार्वजनिक न्यासाचे नाव -** श्री.प्रेमानंद महाराज गौरक्षण चॅरिटेबल ट्रस्ट, अकोट ता.अकोट जि. अकोला
**अर्जदार :** श्री.राम पांडुरंग अंभोरे मु.पो.राजेंद्र नगर, खानापूर वेस, अकोट जि.अकोला

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकोला हे वर नमुद केलेल्या अर्ज या संबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२/१९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१ )वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २ ) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**अ) जंगम मिळकत (वर्णन) :-** १००१/- रुपये आहे.
**आ) स्थावर मिळकत (वर्णन) :-** काही नाही.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकाला बाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त-१, अकोला यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक १८/१२/२०२५ रोजी दिली.

शिक्का
**प्र. अधिक्षक**
सार्वजनिक न्यास
नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला

## जाहीर नोटीस
**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २२९०/२०२५ प्रोसेस नं.२२१/२०२६
चौ.ता. १८/०२/२०२६ दिनांक : ०५/०१/२०२६
**अर्जदार :** १. श्याम उत्तम राउत रा. भक्तीधाम मंदिर जवळ, नगर परिषद कॉलनी, गौरक्षण रोड, अकोला, ता. जि. अकोला. २. लिलाबाई जनार्धन जाधव रा. सावडतकर गल्ली, वार्ड नं. २, जानेफळ, जि. बुलढाणा. ३. वंदना शंकर पवार रा. आसान गल्ली, रिसोड, ता. रिसोड, जि. वाशिम.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : लक्ष्मीबाई उत्तमराव राउत
**पत्ता :-** रा. नगर परिषद कॉलनी, गौरक्षण रोड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत लक्ष्मीबाई उत्तमराव राउत यांचे दि. २४/०८/२०२५ रोजी अकोला ता. जि. अकोला. निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १८/०२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०५/०१/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस
**वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २१९९/२०२५ प्रोसेस नं.१९८२६/२०२५
चौ.ता. ०७/०१/२०२६ दिनांक : ०४/१२/२०२५
**अर्जदार :** १. कल्पना सुभाष सुळे २. भुषण सुभाष सुळे दोन्ही रा. पेन्शन पुरा, गांधी नगर, सिंधी कॅम्प, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : सुभाष चत्रभुज सुळे
**पत्ता :-** रा. पेन्शन पुरा, सिंधी कॅम्प, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सुभाष चत्रभुज सुळे यांचे दि.२९/०३/२०२४ रोजी जगदंबा नगर, अकोली खुर्द, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०७/०१/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी.आज दिनांक ०४/१२/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

# भंगार वाहनांच्या अतिक्रमणाने प्रवासी निवाऱ्यावर 'हल्ला'

## चिमुकल्या विद्यार्थ्यांसह प्रवाशांच्या जीवाशी खेळ; ग्रामपंचायतचे दुर्लक्ष

**साहूर/जनमाध्यम**

सावंगा (पुनर्वसन) व साहूर ग्रामपंचायतच्या संयुक्त सीमेवर असलेल्या बसस्थानकातील प्रवासी निवाऱ्यावर भंगार साहित्य व वाहनांचे सर्रास अतिक्रमण झाले असून, त्यामुळे दररोज शाळेत जाणाऱ्या चिमुकल्या विद्यार्थ्यांसह सर्वसामान्य प्रवाशांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न उभा ठाकला आहे. प्रशासनाच्या उदासीनतेमुळे ही स्थिती दिवसेंदिवस अधिकच धोकादायक बनत असून, नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.



प्रवासी व विद्यार्थ्यांच्या संरक्षणासाठी उभारलेला प्रवासी निवारा आज स्वतःच अडचणीचा ठरला आहे. निवाऱ्याच्या चारही बाजूंनी लोखंडी भंगार साहित्याचे ढीग रचले गेले आहेत. काही दुकानदारांकडून वेल्डिंगसाठी आणलेली वाहने थेट निवाऱ्यासमोर उभी करून काम केले जाते. यासोबतच खाजगी चारचाकी वाहने व दुचाकीही मनमानीपणे निवाऱ्याच्या प्रवेशद्वारासमोर पार्क केल्या जात असल्याने निवारा अक्षरशः वाहनांच्या व भंगाराच्या विळख्यात सापडला आहे.या अतिक्रमणामुळे प्रवाशांना निवाऱ्यात ये-जा करणे कठीण झाले आहे. विशेषतः लहान शालेय मुले भंगाराच्या ढिगाऱ्याजवळ खेळताना दिसतात, तर वयोवृद्ध प्रवासी त्याच परिसरात बसलेले असतात. धारदार लोखंड, अवजड साहित्य व सततची वाहनांची वर्दळ यामुळे कोणत्याही क्षणी मोठा अपघात होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. परिसरातील कृषी केंद्र व हॉटेलमध्ये जाण्यासाठीही नागरिकांना अडथळे येत असून, हा त्रास नित्याचाच बनला आहे.या गंभीर परिस्थितीकडे साहूर व सावंगा (पुनर्वसन) ग्रामपंचायतींनी तातडीने लक्ष देऊन प्रवासी निवाऱ्याच्या समोर व आजूबाजूला साचलेले भंगार त्वरित हटवावे, तसेच बेकायदेशीररीत्या उभी असलेली वाहने काढून टाकावीत, अशी ठाम मागणी ग्रामस्थांनी केली आहे. नियम धाब्यावर बसवणाऱ्या वाहनधारकांवर व भंगार व्यावसायिकांवर कठोर कारवाई करावी, अन्यथा आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही नागरिकांनी दिला आहे. चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या व वयोवृद्ध प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी प्रशासनाने विलंब न करता ठोस पावले उचलावीत, अशी जोरदार अपेक्षा व्यक्त होत आहे.

# एटीएमकार्ड चोरीप्रकरणी विधीसंघर्षीत बालक ताब्यात

**वर्धा/जनमाध्यम**

शहरातील प्रबुद्ध नगर, म्हसाळा परिसरात ATM कार्ड चोरून त्यातील रक्कम काढून घेतल्याची घटना उघडकीस आली असून वर्धा शहर पोलिसांनी तातडीची कारवाई करत एका विधीसंघर्षीत बालकाला ताब्यात घेतले आहे. त्याच्याकडून चोरीचे ATM कार्ड तसेच ४० हजार रुपयांची रोकड जप्त करण्यात आली असून सदर गुन्हा उघडकीस आला आहे.

यप्रकरणी फिर्यादी पवन रामेश्वर पंचभाई (वय २६, रा. प्रबुद्ध नगर, म्हसाळा, वर्धा) यांनी वर्धा शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यांच्या तक्रारीनुसार, ४ जानेवारी रोजी सकाळी ११ ते ५ जानेवारी रोजी सकाळी ८ या कालावधीत अज्ञात व्यक्तीने त्यांचे भारतीय स्टेट

**४० हजारांची रोकड जप्त**

बँकेचे ऊश कार्ड चोरून त्यातून ४० हजार रुपये काढून घेतले. या प्रकरणी वर्धा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

गुन्ह्याचा तपास सुरू असताना पोलिसांना मुखबिराकडून खात्रीशीर माहिती मिळाली. त्या आधारे ५ जानेवारी रोजी एका विधीसंघर्षीत बालकास त्याच्या पालकांच्या समक्ष ताब्यात घेण्यात आले. त्याची सखोल चौकशी केली असता त्याने सदर गुन्ह्याची कबुली दिली. त्यानंतर दोन पंचांच्या उपस्थितीत चोरीचा ATM कार्ड तसेच त्यातून काढलेली ४० हजार रुपयांची रोकड जप्त करून पंचनामा करण्यात आला. त्यामुळे ATM कार्ड चोरीचा हा प्रकार पूर्णपणे उघडकीस आला आहे.ही संपूर्ण कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक सौरभ अग्रवाल, अप्पर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद मकेश्वर तसेच प्रभारी पोलीस निरीक्षक अजय भुसारी यांच्या मार्गदर्शनाखाली वर्धा शहर पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने केली. पथकातील पोलीस हवालदार व पोलीस अंमलदारांनी ही यशस्वी कामगिरी पार पाडली.या घटनेच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी ATM कार्ड, पिन नंबर व आर्थिक व्यवहारांबाबत अधिक सतर्कता बाळगावी, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# बोरधरण प्रकल्पग्रस्तांचा वनवास संपता संपेना!

## सूर्योदय संघटनेचा वाढीव मोबदला आणि नागरी सुविधांसाठी एल्गार

**सेलू/अभय बेदमोहता**

बोरधरण आणि बोर व्याघ्र प्रकल्पासाठी जमिनी आणि घरे देणाऱ्या प्रकल्पग्रस्तांचा संघर्ष अनेक दशकांनंतरही कायम आहे. हक्काचा वाढीव मोबदला आणि पुनर्वसन स्थळांवरील मूलभूत नागरी सुविधांपासून वंचित असलेल्या प्रकल्पग्रस्तांनी आता 'सूर्योदय संघटना'च्या नेतृत्वाखाली आपला लढा तीव्र केला आहे.

मागील १९५९ ते १९६५ दरम्यान वर्धा जिल्ह्यातील मानोली, पारडी, सुकळी, घोडेघाट, गोहदा व भोसा तसेच नागपूर जिल्ह्यातील हिंगणा तहसीलमधील खापरी, केरगोंदी, मालापूर, जोगा यांसारख्या गावांची जमीन प्रकल्पासाठी संपादित झाली होती. मात्र प्रकल्पग्रस्तांना मिळणारा वाढीव मोबदला तांत्रिक कारणांमुळे अद्याप राखडला गेला आहे. प्रकल्पग्रस्तांनी राष्ट्रपती, प्रधानमंत्री, राज्यपाल, केंद्र व राज्य सरकारच्या संबंधित मंत्रालयांकडे निवेदन दिले, प्रत्यक्ष भेटी घेतल्या, तरीही निष्फळ ठरले.सूर्योदय संघटनेने २०१८ मध्ये आमरण उपोषण करून आपली मागणी मांडली. तत्कालीन आमदार, खासदार व संघटनेच्या प्रयत्नांमुळे २०२२ मध्ये तामसवाडा गावातील नागरी सुविधेसाठी ३७ लाख ८९ हजार ४०० रुपये मंजूर झाले, तरी कुठे खर्च झाला याचा तपशील अद्याप स्पष्ट नाही, अशी नाराजी प्रकल्पग्रस्तांमध्ये आहे. २०२१ आणि २०२५ मध्ये प्रकल्पासाठी मोठा निधी मंजूर झाला, तरीही रस्ते, पाणी, वीज यासारख्या प्राथमिक सुविधा अजूनही अनुपस्थित आहेत.सूर्योदय संघटनेचे पदाधिकारी नागपूर आयुक्तांशी चर्चा करून प्रकल्पग्रस्तांच्या व्यथा मांडत आहेत. संघटनेने प्रकल्प कार्यालयातील अनियमितता आणि प्रलंबित फाइल्सवर गंभीर आरोप केले आहेत. महाराष्ट्र राज्य माहिती आयोगासमोर ८ जानेवारी रोजी सुनावणी होणार आहे, ज्यात संघटनेचे अध्यक्ष ज्ञानेश्वर मेश्राम, सल्लागार शंकर पानबुडे आणि सर्व सदस्य उपस्थित राहणार आहेत.प्रलंबित वाढीव मोबदला तातडीने व्याजासह द्यावा; पुनर्वसन क्षेत्रात दर्जेदार रस्ते, पथदिवे आणि पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे; प्रकल्पग्रस्त कुटुंबातील वारसांना नोकरीत सामावून घ्यावे; प्रकल्प कार्यालयातील अनियमिततेची चौकशी व्हावी.प्रशासनाने उपाययोजना न केल्यास आंदोलन तीव्र होईल, आणि प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळेपर्यंत संघर्ष सुरू राहणार आहे.

## सेवेची भावना आणि सुरक्षेचा संकल्प

# संत भोजाजींच्या दर्शनातून नवी प्रेरणा : सौरभ अग्रवाल

**आजनसरा (वर्धा)/जनमाध्यम**

वर्धा जिल्ह्याचे नवनियुक्त पोलीस अधीक्षक सौरभ अग्रवाल आजनसरा येथील श्री संत भोजाजी महाराजांच्या दर्शनासाठी भेट दिली. यावेळी देवस्थान विश्वस्त मंडळाच्या वतीने त्यांचा सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला.



देवस्थान विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय पर्बत यांच्या मार्गदर्शनाखाली सचिव शिवदासजी पर्बत, विश्वस्त श्रावण काचोळे तसेच सेवार्थ दवाखान्याचे व्यवस्थापक डॉ. संदीप लोंढे यांच्या हस्ते पोलीस अधीक्षक सौरभ अग्रवाल यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी एस.पी. अग्रवाल यांनी देवस्थानमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती जाणून घेतली. निर्माल्यापासून धूपबत्ती निर्मिती प्रकल्प, सेवार्थ दवाखाना, प्रसादालय, वृद्धाश्रम आदी सामाजिक उपक्रमांची त्यांनी पाहणी केली. तसेच पुरणपोळी प्रसाद निर्मिती प्रक्रिया व स्वयंपाक शेडची प्रत्यक्ष भेट देत माहिती घेतली. एकाच वेळी इतक्या मोठ्या प्रमाणात पुरणपोळी प्रसाद तयार होताना आपण पहिल्यांदाच पाहत असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.पोलीस अधीक्षक सौरभ अग्रवाल हे कर्तव्यदक्ष, शिस्तप्रिय व थेट जनतेशी संवाद साधणारे अधिकारी म्हणून परिचित आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली वर्धा जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अधिक भक्कम राहून गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण मिळेल, तसेच नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना अधिक दृढ होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.देवस्थान व संस्थेमार्फत सुरू असलेल्या सामाजिक प्रकल्पांना व भावी वाटचालीस पोलीस अधीक्षक सौरभ अग्रवाल यांनी शुभेच्छा दिल्या.

# त्रिमूर्ती नगरात भव्य शिवमहापुराण कथा महोत्सव

## ८ ते १४ जानेवारीदरम्यान धार्मिक कार्यक्रमांची पर्वणी

**वर्धा/जनमाध्यम**

शहरातील त्रिमूर्ती नगर, वार्ड क्रमांक ३ येथे येत्या ८ ते १४ जानेवारी या कालावधीत भव्य शिवमहापुराण कथा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या पावन कथांचे वाचन पंडित विवेक व्यास महाराज आळंदीकर (संगीत अलंकार) यांच्या सुश्राव्य व मधुर वाणीतून दररोज सायंकाळी ६ ते ९.४५ या वेळेत होणार आहे.

कथाकथनाला सुरेल साथ लाभणार असून गायक विश्वनाथ पांडुरंग, तबलावादक प्रवीण गावंडे, ऑर्गन वादक सचिन आकोटकर, पखवाज वादक ईश्वर इंगोले, तसेच हरिपाठ व काकडा गायक म्हणून संभोष राऊत सहभागी होणार आहेत.महोत्सवाच्या कालावधीत हरिपाठ, भजन, ग्रामस्वच्छता, कीर्तन, नामसंकीर्तन, काकडा आरती आदी विविध धार्मिक व सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. ८ जानेवारी रोजी ग्रंथदिंडी सोहळ्याने महोत्सवाची सुरुवात होणार असून १५ जानेवारी रोजी भव्य पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. याच दिवशी महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता होणार आहे. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी आयोजन समितीचे अध्यक्ष हरीश काखे, उपाध्यक्ष राजेश तिवस्कर, कोषाध्यक्ष वसंत चिखले, सचिव महेंद्र जळगावकर यांच्यासह माजी सरपंच व सामाजिक कार्यकर्ते सचिन खोसे, प्रसिद्ध शल्यचिकित्सक डॉ. पवन



भांदककर तसेच शरद देशकर, विजय राखुंडे, अरुण निकेसर, रमेश बोंदरकर, रामदास ढोबळे, प्रतीक सोनटक्के, मारोती काटकर, चंद्रशेखर खंडाळकर, मोहन खानजोडे, मोहन पाटणकर, अमोल वाढूनकर आदी पदाधिकारी अथक परिश्रम घेत आहेत.महोत्सवाचे हे पाचवे वर्ष असून तयारी अंतिम टप्प्यात आहे. कथेसाठी भव्य शामियाना उभारण्यात आला असून पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहतील, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे. या धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्रिमूर्ती नगरवासीयांच्या वतीने करण्यात आले आहे.

# पत्रकार दिनानिमित्त मनोहर मुडके यांचा सन्मान

**वर्धा/जनमाध्यम**

आज पत्रकार दिनानिमित्त वर्धा श्रमिक पत्रकार संघाच्या वतीने स्थानिक धुनीवाले येथे चौथा स्तंभ पुरस्कार वितरण समारंभ पार पडला. या वेळी ज्येष्ठ वृत्तपत्र विक्रेते मनोहर मुडके यांचा सन्मान करण्यात आला. समारंभाला रामदास तडस, जेष्ठ शेतकरी नेते विजय जावंधिया, जिल्हा माहिती अधिकारी मंगेश वडकर, ज्येष्ठ साहित्यिक राजेंद्र मुंढे, वृत्तपत्र विक्रेता संघाचे अध्यक्ष सुनील पाटणकर, श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रविण धोपटे, तसेच ज्येष्ठ पत्रकार इकराम



हुसेन, सुनील बुरांडे यांसारखे मान्यवर उपस्थित होते.मनोहर मुडके हे ७४ वर्षांचे असूनही ५० वर्षांहून अधिक काळ वृत्तपत्र वितरणाच्या कार्यात आहेत. उष्णतेत, थंडीत, पावसातही सकाळी वृत्तपत्र घराघरांत पोहोचवतात. त्यांच्या सातत्यपूर्ण सेवेमुळेच त्यांना गौरवले गेले.श्रृंखलाबद्ध श्रम आणि समर्पण पाहता, श्रमिक पत्रकार संघाने वृत्तपत्र विक्रेत्यांच्या योगदानाला उजाळा देण्यासाठी हा सन्मान सोहळा आयोजित केला. उपस्थितांनी मनोहर मुडके यांचे कौतुक केले आणि पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले. पत्रकार दिनाच्या निमित्ताने असा सन्मान वृत्तपत्र विक्रेत्यांच्या महत्त्वपूर्ण सेवेला सामाजिक मान्यता देतो.

# देवळीत श्याम बाबा संकीर्तनाचा भक्तिरसात न्हालेला उत्सव

## रामदास तडस, नगराध्यक्ष किरण ठाकरे यांची उपस्थिती



**देवळी/जनमाध्यम**

देवळी शहरात श्याम बाबांच्या नामस्मरणाने संपूर्ण परिसर भक्तिभावाने दुमदुमून गेला. देवळी येथे आयोजित श्याम बाबा संकीर्तन कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि भक्तिरसात साजरा करण्यात आला. श्री सुदामा कीर्तन ताली, नागपूर या पथकाच्या सुमधुर सादरीकरणाने भाविक मंत्रमुग्ध झाले.

गांधी चौक, येथे झालेल्या या कार्यक्रमाला देवळी शहरासह परिसरातील श्याम प्रेमींची मोठी उपस्थिती लाभली. संकीर्तनादरम्यान सादर करण्यात आलेल्या भक्तिगीतांनी आणि ताल-नादाने वातावरण पूर्णतः आध्यात्मिक झाले. श्याम बाबांच्या जयघोषात भाविकांनी तल्लीन होऊन कार्यक्रमाचा मनमुराद आनंद घेतला.या भक्तिमय सोहळ्यास खा. रामदाजी तडस, नगर परिषद देवळीचे नगराध्यक्ष किरण ठाकरे तसेच नगरसेवक राहुल चोपडा यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांनी आयोजकांचे कौतुक करत अशा धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे समाजात एकोपा, शांतता व सकारात्मक ऊर्जा निर्माण होत असल्याचे मत व्यक्त केले.श्याम बाबा संकीर्तन कार्यक्रमाचे आयोजन श्री श्याम प्रेमींच्या वतीने करण्यात आले होते. या यशस्वी आयोजनासाठी गजानन कामडी, सुरेशराव कामडी, रविंद्र कामडी, राजेश कामडी, भारत चौधरी, संतोष तुरणकर, तुषार कामडी, सौरभ कामडी, शशीकांत सिंह, विक्की तुरणकर, हार्दिक कामडी, शुभम कामडी, अमित चौधरी, पांडूरंग चौधरी, देवांश्यू चौधरी, देवांश्यू देशमुख व प्रज्वल सराटे यांनी विशेष परिश्रम घेतले.कार्यक्रमाच्या शेवटी भाविकांनी श्याम बाबांप्रती कृतज्ञता व्यक्त करत भविष्यातही अशा धार्मिक उपक्रमांचे आयोजन व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. श्याम बाबा संकीर्तनामुळे देवळी शहरात भक्ती, आनंद आणि समाधानाचे वातावरण पसरल्याचे चित्र पाहायला मिळाले.

## शेळयांच्या गोठ्याला आग लागल्याने हजारोंचे नुकसान

**हिंगणघाट** - तालुक्यातील किनगाव येथील महादेव शंकरराव ठाकरे यांच्या गावठाण येथे बांधलेल्या गोठ्याला अज्ञात इसमाने आग लावली. यात गोठ्यामध्ये ठेवलेले कुटार तसेच इतर साहित्य आदी तीस हजार रुपयांचे नुकसान झाले.या आगीमध्ये तीन बकऱ्यांना आगीची झळ पोहोचली. २२ शेळ्या होत्या. शेळ्या बांधून नसल्याने मोठे नुकसान टळले. याप्रकरणी तक्रारीवरुन पोलिसांनी गुन्हा दाखल केला. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक संगीता हेलोंडे हे करीत आहे.

## सावंगी परिसरात दुचाकी चोरी

**वर्धा** - सावंगी (मेघे) येथील चहावाला दुकानासमोरून अज्ञाताने दुचाकी चोरी केली. याप्रकरणी सावंगी मेघे पोलिसांनी गुन्हा दाखल केला. करमवीर शर्मा यांची दुचाकी चहावाला दुकानापुढे उभी होती. अज्ञात चोरट्याने पीबी २३ वाय ४४३४ क्रमांकाची दुचाकी चोरून नेली. याप्रकरणी तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# अतिक्रमण काढल्याच्या कारणावरून शिवीगाळ

**अल्लीपूर** - पोलीस ठाण्याच्या हद्दीतील धोत्रा (कासार) येथे ग्रामपंचायतीने अतिक्रमण काढल्याच्या कारणावरून श्रीकृष्ण माणिक पोहाणे (५२) यांना भास्कर शेंडे यांनी शिवीगाळ करीत मारण्याची धमकी दिली. पोहाणे हे गावातील आरोग्य उपकेंद्राजवळ उभे असताना तेथे भास्कर शेंडे यांनी दारूच्या नशेत येत शिवीगाळ केली. त्यांना हटकले असता मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी अल्लीपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### शेळ्या चोरी

**वर्धा** - अज्ञात चोरट्यानी २७ हजार रुपये किमतीच्या शेळ्या चोरून नेल्या. ही घटना टाकळी किटे शिवारात घडली. याप्रकरणी सेलू पोलिसांनी गुन्हा दाखल केला. टाकळी किटे येथील विनोद किन्नाके यांच्या मालकीच्या शेळ्या बांधून होत्या. अज्ञात चोरट्यानी २७ हजार रुपये किमतीच्या चार शेळ्या चोरून नेल्या. याप्रकरणी तक्रारीवरून सेलू पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलिस करीत आहेत.

### दुचाकी चोरी

सेलू - येथे अज्ञात चोरट्याने दुचाकी चोरी केली. ही घटना उघडकीस आली. नागपूर येथील रियाज अहमद शेख हे कार्यक्रमानिमित्त सेलू येथे आले. त्यांनी एमएच ३१ इएच ४६८० क्रमांकाची दुचाकी घरापुढे उभी ठेवली होती. सकाळी त्यांना दुचाकी दिसली नाही.

# संस्कारांची शिदोरी उघडणारा संत परंपरेचा जागर

## पिढीला दिशा देणारी अध्यात्माची वाट : मोहन अग्रवाल

**वर्धा/जनमाध्यम**

आधुनिकतेच्या वेगवान प्रवाहात आजची पिढी ज्ञानाने प्रगल्भ होत असली, तरी माणुसकी, संस्कार आणि आपुलकीची ऊब कुठेतरी हरवत चालल्याची खंत समाजमनात दिसून येते. अशा काळात संतांची शिकवण आणि संत साहित्यच समाजाला सावरण्याचे कार्य करू शकते. संत साहित्य ही नैतिक संस्कारांची अमूल्य शिदोरी असून ती नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे ही काळाची गरज आहे, असे भावस्पर्शी प्रतिपादन ज्येष्ठ समाजसेवी व उद्योजक मोहन अग्रवाल यांनी केले.

ते मगनवाडी चौक येथील श्री संत गजानन महाराज मंदिरात आयोजित संत गजानन महाराज विजय ग्रंथाच्या चार दिवसीय सामूहिक पारायण कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी अध्यक्षस्थानावरून बोलत होते.मोहन अग्रवाल म्हणाले की, आज माणूस आर्थिकदृष्ट्या सक्षम होत असला तरी मानसिक शांतता हरवत चालली आहे. खरे सुख हे संपत्तीत नसून मनाच्या समाधानात दडलेले आहे. हे समाधान मिळवण्यासाठी बालपणापासूनच योग्य संस्कारांची



पेरणी होणे आवश्यक आहे. ही जबाबदारी केवळ पालक व शिक्षकांची नसून संपूर्ण समाजाची आहे. समाज संस्कारक्षम झाला, तर राष्ट्राची प्रगती आपोआप साध्य होईल. यासाठी संत साहित्याचा आधार घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.या कार्यक्रमास नवनिर्वाचित नगरसेवक प्रदीप तलमले, दीपिका आडेपवार, संजय बमनोटे, देवस्थानचे सचिव ज्ञानेश्वर पहाडे, कोषाध्यक्ष सुशील व्यास, ट्रस्टी मधुसूदन अग्रवाल आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून संत परंपरेचे महत्त्व विशद केले.चार दिवस चाललेल्या या सामूहिक पारायणात १५५ महिला व पुरुष भक्तांनी श्रद्धेने सहभाग घेतला. श्री हनुमान चालीसा पठणाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. नगरसेवक प्रदीप तलमले व दीपिका आडेपवार यांनी उपस्थितांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन ज्ञानेश्वर पहाडे यांनी केले, तर सामूहिक पारायणाचे सुयोग्य संचालन सविताताई वैद्य व श्वेताताई पाचखेडे यांनी केले.कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अजय लांबट, बाबाराव फाले, किशोर दौड, विनोद पथ्थे महाराज, अनिल बाभुळकर, प्रकाश रायटर, तळवेकर गुरुजी, संजय कावले, सुरेश लांजेवार आदींनी परिश्रम घेतले. या भक्तीमय उपक्रमामुळे परिसरात अध्यात्मिक वातावरण निर्माण झाले असून नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष - १४ अंक ४३**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# महसूल कर्मचाऱ्याला मारहाण करून रेतीचा ट्रक पळविला

## -तिवसा ते कुऱ्हा मार्गावर घडला प्रकार -ट्रक चालक, मालका विरुद्ध गुन्हा दाखल



**तिवसा/प्रतिनिधीः-** कारवाईत जप्त करण्यात आलेला वाळूचा ट्रक तहसील कार्यालयात घेऊन जातं असताना तिवसा येथील महसूल कर्मचाऱ्याला मारहाण करून ट्रक पळवून नेण्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी कुऱ्हा पोलीसांनीं महसूल सहाय्यक राहुल शंकरराव निस्वादे यांच्या तक्रारीवरून ट्रकचालक, मालकासह दोन अज्ञात विरुद्ध विविध कलमांतर्गत गुन्हा नोंदविला आहे.

ता.४ जानेवारी रोजी रात्री ९वाजता दरम्यान तिवसा महसूल विभागातील अधिकारी,कर्मचारी गस्तीवर असताना अवैध वाळूने भरलेला एमएच ४९सीडी ८७३७क्रमांकाचा दहा चक्का ट्रक हा अंजनसिंगी मार्गे कुऱ्हाकडे येत होता,या दरम्यान तहसीलदार डॉ. मयूर कळसे,नायब तहसीलदार आशीष नागरे,महसूल सहाय्यक राहुल निस्वादे,ग्राम महसूल अधिकारी चरणसिंग दुलत, महसूल सेवक सुरज माथुलकर यांनी ट्रकची तपासणी केली असता ट्रकमध्ये अवैध वाळू मिळून आली.

यावेळी ट्रकवर जप्तीचीं कारवाई करून तिवसा तहसील कार्यालयात घेऊन जातं असताना अचानक भरधाव स्विफ्ट डिजायर कार ट्रकच्या आडवी झाली आणि कारमधील ट्रक चालक, मालक व दोन अज्ञात व्यक्तींनी निस्वादे यांची कॉलर पकडून बाहेर काढले व लाथा, भुक्क्याने मारहाण करून वाळू रस्त्यावर टाकून ट्रक पळवून नेला हा संपूर्ण घटनाक्रम महसूल सहाय्यक निस्वादे यांनी तहसीलदार यांना कळवून कुऱ्हा पोलीस ठण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीवरून ट्रकमालक लक्ष्मण चौधरी रा. चांदुर रेल्वे, ट्रकचालक व दोन अज्ञात विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास कुऱ्हा पोलीस करीत आहे.

तिवसा महसूल विभागाकडून अवैध मुरूमचीं वाहतूक करत असताना मारडा मौजात विना क्रमांकाच्या ट्रॅक्टरवर जप्तीचीं कारवाई करण्यात आली तसेच अवैध वाळूनी भरलेला एमएच ४८ एजी ९२२९ या क्रमांकाच्या ट्रकवर देखील कारवाई करण्यात आली.तिवसा महसूल विभागाच्या या धडाकेबाज कारवाईमुळे गौण खनिज माफियांचे धाबे दणाणले असले तरी महसूल कर्मचाऱ्याला मारहाणीच्या प्रकरणामुळे वाळू माफियांचा मोठा उद्रेक वाढल्याचे दिसून येत आहे.

आम्ही एकाच रात्री दोन ट्रकवर जप्तीचीं कारवाई केली परंतु यातील एक ट्रक हा कर्मचाऱ्याला मारहाण करून पळवून नेण्यात आला. आम्ही ट्रकचालक व मालका विरुद्ध कुऱ्हा पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केली आहे, तसेच आरटीओ आणि ईटीपीकडून हा ट्रक ब्लॅक लिस्टमध्ये टाकण्यासंदर्भात पत्र पाठविण्यात आले आहे.
**-डॉ. मयूर कळसे,** तहसीलदार तिवसा.

# आदिवासी विकास विभागाच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन





**अमरावती/प्रतिनिधीः-** आदिवासी विकास विभागामार्फत आयोजित राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा सन २०२५-२६ चा उद्घाटन सोहळा आज संपन्न झाला. या स्पर्धेचे उद्घाटन राज्य माहिती आयोग आयुक्त रवींद्र ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी क्रीडाध्वजाचे ध्वजारोहण करुन क्रीडाज्योत प्रज्ज्वलित करण्यात आली.

आदिवासी विकास अपर आयुक्त आयुषी सिंह, नाशिकचे अपर आयुक्त दिनकर पावरा, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, सहायक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी अमित रंजन, झेनिच चंद्र दोनथुला, सिद्धार्थ शुकना तसेच विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, खेळाडू व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेच्या निमित्ताने आदिवासी कला व संस्कृतीचे दर्शन घडविणारी भव्य हस्तकला प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या दालनांमध्ये अमरावती विभागातील धारणी, अकोला, पुसद, कळमनुरी, किनवट तसेच शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ, धारणी यांनी सहभाग नोंदविला. याशिवाय नागपूर विभागातील देवरी प्रकल्पातील चिमुकल्यांनी तयार केलेल्या विविध कलात्मक वस्तूंचे प्रदर्शन विशेष आकर्षण ठरले. या हस्तकला दालनांचे मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

उद्घाटन समारोपाच्या कार्यक्रमात अमरावती विभाग विरुद्ध नाशिक विभाग यांच्यातील हॉलीबॉल सामना अत्यंत चुरशीचा झाला. पहिल्या सेटमध्ये अमरावती संघाने २५ गुण, तर प्रतिस्पर्धी संघाने २० गुण मिळविले. दुसऱ्या सेटमध्ये अमरावती संघाने २५ गुण, तर प्रतिस्पर्धी संघाने १८ गुण प्राप्त केले. उत्कृष्ट सांघिक खेळ व दमदार कामगिरीच्या जोरावर अमरावती विभागाचा संघ विजयी ठरला. संपूर्ण कार्यक्रमातून आदिवासी विद्यार्थ्यांमधील क्रीडा कौशल्य, सांघिक भावना, शिस्त तसेच आदिवासी हस्तकलेचा समृद्ध वारसा अधोरेखित झाला.

# तपोवनला मनशक्ती 'सन्मान सत्कृत्याचा पुरस्कार' जाहीर

**अमरावती/प्रतिनिधीः-** पद्मश्री डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांच्या विदर्भ महारोगी सेवा मंडळ तपोवन या संस्थेतर्फे कुष्ठरुग, परितत्त्या महिला, आदिवासी मुलांच्या पुनर्वसन विकासासाठी सुरू असलेल्या कार्यासाठी लोणावळा येथील स्वामी विज्ञानानंद यांच्या मनशक्ती प्रयोग केंद्रातर्फे दिल्या जाणारा 'मनशक्ती सन्मान सत्कृत्याचा' हा ५० हजार रुपयांचा पुरस्कार जाहीर झाला आहे.

मनशक्ती प्रयोग केंद्र लोणावळा ही स्वामी विज्ञानानंद यांनी स्थापन केलेली संस्था असून हे वर्ष संस्थेचे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. संस्थेमध्ये मानवी जीवनातील सुख, शांतीसाठी पूरक अनेक विषयांवर कार्य केले जाते. आरोग्य, ताण, ध्यान पालकत्व कौटुंबिक सौख्य बालविकास या कार्यासाठी संस्था महाराष्ट्रभर कार्य करते.

मनशक्ती सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्याने यश शांतीसाठी हा सेवाभावी कार्यक्रम अमरावतीमध्ये दि. ६, ७ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये मनशक्ती सन्मान सत्कृत्याचा हा पुरस्कार व पन्नास हजार रुपये विदर्भ महारोगी सेवा मंडळ तपोवन व धारणी मेळघाटातील महान ट्रस्ट यांना जाहीर झाला आहे.

हा पुरस्कार ब्रजलाल बियाणी महाविद्यालयाच्या सभागृहांमध्ये दि.७ जानेवारी रोजी सायंकाळी ५ वाजता विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंगल यांच्या हस्ते देण्यात येईल असे मनशक्ती विदर्भ कार्य समन्वयक सुहास बाळासाहेब गुधाटे यांनी कळविले आहे.

**REQUIRED**
**Sales Executive**
For **Bhende Business Park,** Khaparde Garden, Amravati.
**Eligibility :** Any Graduate, Good Communication skills
**Salary :** 12000 to 14000 Basic + Incentives
**How to Apply**
Interested candidates can send their resume to the Whatsapp number below
**Contact :**
**7020805299/ 9890428596**

# अज्ञात वाहनाच्या धडकेत तरुणाचा मृत्यू
## -थुगांव फाट्याजवळ अपघात

**अमरावती/प्रतिनिधीः-** अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकी स्वाराचा मृत्यू झाल्याची घटना वलगाव पोलीस ठाणे हद्दीत येणाऱ्या थुगांव फाटया नजीकच्या पुलाजवळ घडली आहे. संजय श्रीराम मानकर (वय ५०, शिवनेरी नगर) असे मृतकाचे नाव आहे. माहितीनुसार संजय मानकर शुक्रवारी सायंकाळी आपल्या दुचाकी एम एच २७ डीके ९२९८ ने काम ऑटोपून चांदूरबाजार वरून अमरावतीला येत होते. मार्गात थुगाव फाट्या नजीकच्या पुलाजवळ अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला समोरासमोर जोरदार धडक दिली. या अपघातात संजय मानकर हे गंभीर जखमी झाले. त्याच मार्गाने जाणारे प्रवीण ठाकरे (शिराळा) यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी जखमी संजय मानकर यांना आपल्या चार चाकी वाहनाने राठी नगर येथील एका खाजगी रुग्णालयात दाखल केले.

## सायटेशन/जाहीरनामा

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी**

आर.एम.जे.सी.क्र.७९९/२५ ने.ता.३०.०१.२०२६

**अर्जदार -** **१.सलामखॉं मियॉखा,** वय ५२ वर्षे, धंदा - मजुरी
**२.सलीमखॉं मियॉखा,** वय ५० वर्षे, धंदा - मजुरी
**३.रेशमाबी शेख शरीफ,** वय ३८ वर्षे, धंदा - घरकाम
तिघेही रा. हिवरखेड, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- विरुध्द --

**निल**

वरील अर्जदाराने वि.दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत U/s २, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (८) १८२७ प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार क्र. १,२ व ३ यांचे वडिल नामे **मियॉखान सरवरखान यांचा दिनांक ३०/०९/२०१९ रोजी हिवरखेड, ता.मोर्शी,जि.अमरावती येथे मृत्यू झाला.** अर्जदार हे मयतांचे कायदेशिर वारस आहे. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय तथा निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरिल अर्जदाराशिवाय इतर कोणतेही वारस नाहीत. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एक महिन्याचे आत वि.न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कुणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कारवाई करण्यात येईल.

**दिनांक- २९/१२/२०२५**

आदेशानुसार,
**(सहाय्यक अधीक्षक)**
शिक्का
दिवाणी न्यायालय क.स्तर, मोर्शी

## जाहीर सुचना

सर्वत्र लोकांचा सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार **निलीमा सुभाषराव गुल्हाने, रा. विष्णु नगर, नवसारी, अमरावती,ता.जि.अमरावती** यांनी **सुरेश भगवंतराव रामेकर,** राहणार- वलगांव, ता.व जि. अमरावती यांच्याकडून मौजे-नवसारी, ता व जि.अमरावती येथील सर्वे क्र.४२/७ मधील **प्लॉट क्र.४ अ** एकूण क्षेत्रफळ २१०३.५८ चौ.फुट दिनांक १६/०४/२००७ रोजीच्या अनु.दस्त क्र.१११२/२००७ नोंदणीकृत खरेदीखतानुसार खरेदीहक्काने खरेदी केलेला आहे. सदर दिनांक १६/०४/२००७ रोजीच्या अनु.दस्त क्र.१११२/२००७ खरेदीखताची मूळ प्रत माझ्या पक्षकाराकडून दिनांक १५/११/२०२५ रोजी नवसारी ते शेगांव रहाटगाव रोड येथे जात असतांना गहाळ झाली आहे व त्याबाबत त्यांनी पोलीस स्टेशन गाडगे नगर अमरावती येथे दिनांक १५/११/२०२५ रोजी तक्रार नोंदवली असून, सदर गहाळ झालेल्या खरेदीखता संदर्भात व प्लॉट संदर्भात कोणाची हरकत, दावा, तक्रार, तारण,गहाण,दान,बोजा व अन्य कोणत्याही बोझाचा दावा असल्यास त्या व्यक्तींनी त्यांच्याकडे असलेल्या कागदोपत्रासह लेखी हरकत ही नोटिस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसाच्या आत खालील पत्यावर सादर करावी. अन्यथा कोणालाही कुठल्याही प्रकारची हरकत/तक्रार नाही असे समजल्या जाईल.

वर उल्लेख केलेल्या खरेदीखताच्या व प्लॉटच्या अनुषंगाने काही संपर्क साधावयाचा असल्यास पुढील पत्त्यावर साधावा. ही जाहीर नोटिस जनहितार्थ प्रसिध्द केली.

करिता ही नोटीस जाहीर करत आहे.

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक :-०६/०१/२०२६**

**सही/-**
**ॲड.निलेश ज.पुंड**
**१०२ गजानन अपार्टमेंट, मोहन कॉलनी, अर्जुन नगर, अमरावती.**
**मो.-८६००४९२८९४**

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.८२५/२०२५ ने.ता.१८.०२.२०२६

**अर्जदार -** १. श्रीमती चंदा ज्ञानेश्वरराव ठाकरे, वय ६३ वर्षे, धंदा - घरकाम
२. श्री.राहुल ज्ञानेश्वरराव ठाकरे, वय ४१ वर्षे, धंदा - व्यवसाय
३. श्री.उमेश ज्ञानेश्वरराव ठाकरे, वय ३८ वर्षे, धंदा - व्यवसाय
सर्व रा.शिवाजी नगर, मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती

--- विरध्द ---

**गैरअर्जदार- निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती तर अर्जदार नं.२ व ३ चे वडील **ज्ञानेश्वर रोडबाजी ठाकरे** हे दि.**२२.११.२०२५** रोजी मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक ०५.०१.२०२६

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
शिक्का
दिवाणी न्यायालय, मोर्शी

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ११५**
**आर.एन.आय.रजी.नं.** 49763/89 **पोस्टल लायसन क्र.** ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग
## तहसिलदार, चांदुर बाजार यांचे कार्यालय

Email- tah chandorks@gmail.com

कप्रस्तु-१/अ. कार जाहीर नोटीस प्रसिदध/कावि- १५८/२०२५
दि. २९/१२/२०२५

## जाहीर नोटीस

ज्याठाथी, या महसूल न्यायालयात रा.मा.क्र /५९(१३) कुळ कायदा/ मक्रमपूर / २०२४-२५ प्रकरणात अर्जदार नितीन भावचंद्र ठाकरे व इतर ०९ रा. करजगाव ता. चांदुर बाजार जि. अमरावती यांचे शेत मौजा मक्रमपूर सर्वे नं. गट न.१ क्षेत्र ३.९७ हे. आर आकार रू.२२.६५ भोगवटदार वर्ग -१ या शेतीचे कुळ वहीवाद अधिनियम (विदर्भ प्रदेश १९५८ चे कलम ४१,४३,४६,४०,४८) अंतर्गत या शेतीचे सेल सटीफीकेट (खरेदी प्रमाणपत्र मिळणेबाबतचे प्रकरण या महसुल न्यायालयात दाखल केले आहे.

त्या अधी प्रकरणात ज्या कोणास आक्षेप वा हरकती घ्यावयाच्या असेल त्यांनी जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत आक्षेप वा हरकती दाखल कराव्या दिलेल्या मुदती नंतर आलेल्या आक्षेपांचा वा हरकतीचा विचार करण्यात येणार नाही यांची नोंद घ्यावी.

दिनांकः- २९/०१२/२०२५

**(सोनल सुर्यवंशी)**
**तहसिलदार, चांदुर बाजार**

वि.मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, मंगरुळपीर तथा जिल्हा व सत्र न्यायाधीश-१, अति.सत्र न्यायाधीश, मंगरुळपीर यांचे न्यायालयात

## जाहीर नोटीस

प्रोसेस क्र.२३२/२०२५ दिनांक ०४.११.२०२५
मोटार अपघात प्रकरण क्र.३९/२०२३ चौ.ता.०७.०२.२०२६

**अर्जदार :** १. संगीता सुनील अडोळे, वय ४६ वर्षे, धंदा - घरकाम
रा.धोत्रा, पो.पोटी, ता.मंगरुळपीर, जि.वाशिम

--- विरुध्द ---

**गैरअर्जदार :** १. शेख नाजीर शेख हाफिज
रा.बुऱ्हानपूर, पो.तळवेल, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती

ज्याअर्थी उपरिनामित अर्जदार यांनी आपणाविरुध्द मोटार वाहन कायदा १९८८ चे कलम १६६ नुसार रक्कम रु.१,००,०००/- (एक लाख रुपये फक्त) नुकसान भरपाई मिळण्याकरीता या न्यायालयाकडे अर्ज केला आहे, यापुर्वी या न्यायालयाद्वारे नोटीस पाठवून सुध्दा ती नोटीस तामील होऊ शकलेली नही. त्याअर्थी याद्वारे आपणास जाहीर नोटीसद्वारे फर्माविण्यात येत आहे की, तुम्ही सदर अर्जाविरुध्द कारण दाखविण्याकरीता दिनांक ०७.०२.२०२६ रोजी सकाळी ११ वाजता या न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे, तसे न केल्यास उक्त अर्जाची एकतर्फी सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

त्याअर्थी अर्जदारांनी केलेल्या अर्जास इतर कोणाचेही काहीही म्हणणे अगर तकारी असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत वि.न्यायालयासमक्ष लेखी स्वरुपात सादर कराव्यात. सदर मुदतीनंतर कोणाचेही काहीही म्हणणे/आक्षेप अगर तकार नाही असे गृहित धरुन सदरहू अर्ज हा कायद्याप्रमाणे निकाली काढण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

आज दि.०४ माहे नोव्हेंबर २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिले आहे.

आदेशानुसार
प्र.अधीक्षक,
शिक्का
जिल्हा न्यायाधीश-१ तथा अति.सत्र न्यायाधीश, मंगरुळपीर

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.३०३१/२०२५
**मंगेश व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.१२.०२.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** १. मंगेश माधवराव देशमुख, वय ४८ वर्षे, कामधंदा - नोकरी
२. अमित माधवराव देशमुख, वय ४४ वर्षे, कामधंदा - नोकरी
दोघेही रा.बी/२०१, मल्हार, काव्यधरा सीएचएस, कोलशेत रोड, ढोकली नाका, ठाणे पश्चिम सॅनडोजबाग ठाणे

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत माधव बळीराम देशमुख व माधुरी माधव देशमुख** हे अनुक्रमे दिनांक **०२.०६.२०१८** व **२१.०८.२०२५** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार मंगेश माधवराव देशमुख व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **मंगेश माधवराव देशमुख व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**३१.१२.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
शिक्का
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## जाहीर नोटीस

विद्यमान प्रथमश्रेणी न्यायदंडाधिकारी साहेब चांदूर बाजार यांचे न्यायालय

मि.अ.क्र./ ने.ता. / /२०२२

**१. शे. अमीन शे. इस्माईल**
**वय ४८वर्षे, धंदा – मजुरी**
**रा. देऊरवाडा, ता. चांदूर बाजार , जि. अमरावती**

**-- विरुद्ध --**

गैरअर्जदार-निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी

ग्राम पंचायत कार्यालय, देऊरवाडा, ता. चांदूर बाजार , जि. अमरावती वरील अर्जदाराने विद्यमान न्यायालयात जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) अंतर्गत जन्माची नोंद घेण्याचे निर्देश गैरअर्जदाराला देण्याकरीता प्रकरण दाखल केलेले आहे.

अर्जदार नामे शे. अमीन शे. इस्माईल ह्याचा दिनांक १९ .०५.१९७८ रोजी राहत्या घरी देऊरवाडा येथे जन्म झालेला आहे. करीता या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एका महिन्याचे आत वि. न्यायालयात आपला लेखी आक्षेप, प्रकरणात आक्षेप असल्यास नोंदवावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दि.

**आदेशानुसार,**
**सहाय्यक अधीक्षक,**
**प्रथम श्रेणी न्यायाधीश, चांदूर बाजार**

## जाहीर नोटीस

विद्यमान प्रथमश्रेणी न्यायदंडाधिकारी साहेब चांदूर बाजार यांचे न्यायालय

मि.अ.क्र./ ने.ता. / /२०२२

**१. सुलताना परवीन अजगर हुसेन**
**वय ४० वर्षे, धंदा – मजुरी**
**रा. देऊरवाडा, ता. चांदूर बाजार , जि. अमरावती**

**-- विरुद्ध --**

गैरअर्जदार-निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी

ग्राम पंचायत कार्यालय, देऊरवाडा, ता. चांदूर बाजार , जि. अमरावती वरील अर्जदाराने विद्यमान न्यायालयात जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) अंतर्गत जन्माची नोंद घेण्याचे निर्देश गैरअर्जदाराला देण्याकरीता प्रकरण दाखल केलेले आहे.

अर्जदार नामे सुलताना परवीन अजगर हुसेन ह्याचा दिनांक २१.०१.१९८५ रोजी राहत्या घरी देऊरवाडा येथे जन्म झालेला आहे. करीता या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एका महिन्याचे आत वि. न्यायालयात आपला लेखी आक्षेप, प्रकरणात आक्षेप असल्यास नोंदवावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दि.

**आदेशानुसार,**
**सहाय्यक अधीक्षक,**
**प्रथम श्रेणी न्यायाधीश, चांदूर बाजार**

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.३०२२/२०२५
**माला व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.१२.०२.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** १. माला हरिभाऊ मुळे, वय ५७ वर्षे, धंदा - घरकाम
२. सौ.शोभा रमेश उघडे, वय ५३ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.नागोबा मंदिर गल्ली, जीवनपुरा, अचलपूर, ता.अचलपूर, जि.अमरावती
३. गजानन हरिभाऊ मुळे, वय ४६ वर्षे, व्यवसाय - मजुरी
४. मोहन हरिभाऊ मुळे, वय ४३ वर्षे, व्यवसाय - मजुरी
५. गणेश हरिभाऊ मुळे, वय ४१ वर्षे, व्यवसाय - मजुरी
६. सौ.वैशाली हेमराज रहाटे, वय ३९ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.वार्ड नं.२, मु.पो.तिवसा घाट, ता.वरुड, जि.अमरावती
७. सौ.तारा भानुदास यावले, वय ३६ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.ब्राम्हणवाडा कसबा, पो.पोरगव्हाण, जि.अमरावती
८. रोशन हरिभाऊ मुळे, वय ३१ वर्षे, व्यवसाय - मजुरी
९. आकाश हरिभाऊ मुळे, वय २९ वर्षे, व्यवसाय - मजुरी
रा.अर्जदार नं.१,३,४,५,८ व ९ रा.गजानन नगर मरिमाता मंदिराजवळ, नांदगांव पेठ, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **हरिभाऊ गुलाबराव मुळे** हे दिनांक 26.05.2014 रोजी Amravati येथे मयत झाले. अर्जदार **माला हरिभाऊ मुळे व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **माला हरिभाऊ मुळे व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ३१.१२.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
शिक्का
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,
अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.३००१/२०२५
**निर्मला -वि- निरंक**
पुढील ता.०९.०२.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Nirmala Arjunrao Matkar, Age 77 Yrs. Occu.: Retired
2. Nilesh Arjunrao Matkar, Age 54 Yrs. Occu.: Service
3. Niraj Arjunrao Matkar, Age 45 Yrs. Occu.: Service
Appli.No.1 to 3 R/o Near Sheev Gajanan Mandir, 20, Javahar Nagar, V.M.V.Amravati.
4. Sanjyot Sunil Lawhale, Age 52 Yrs. Occu.: Household
R/o Samarth Sahnivas, Shanti Niketan Colony, Sai Nagar, Amravati.
5. Vaishali Rajeshrao Bambal, Age 50 Yrs. Occu.: Household
R/o Dhangarpura Shirala, Tq. Dist. Amravati.
6. Vrushali Gajendra Padekar, Age 47 Yrs. Occu.: Household
R/o Rlat No.101, Arpit Residency, Arjun Nagar, Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **अर्जुनराव पांडुरंगजी मातकर** हे दिनांक 27.08.2024 रोजी Amravati येथे मयत झाले. अर्जदार **निर्मला व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **निर्मला व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ३१.१२.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
शिक्का
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,
अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एन.सी.सोरटे, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२९६६/२०२५
**श्रीमती जयश्री अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.२७.०१.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Jayshree Balu Range, Age 47 Yrs. Occu.: Housewife
2. Prajwal Balu Range, Age 26 Yrs. Occu.: Student
3. Varad Balu Range, Age 16 Yrs. Occu.: Student
All Applicant R/o Near Water Tank, Rathi Nagar, Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **बाळू नामदेवराव रंगे** हे दिनांक 10.11.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **जयश्री अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **जयश्री अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०३.०१.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
शिक्का
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.२९७६/२०२५
**विवेक व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.०६.०२.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** १. विवेक अरविंद पांडे,
वय ६० वर्षे, कामधंदा - सेवानिवृत्त
रा.एबीसी हाऊसिंग सोसायटी, ३/२ किर्ती बंगलो, पवना नगर, चिंचवड, चिंचवड गांव, पुणे महाराष्ट्र

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत अरविंद माधवराव पांडे** यांचे दिनांक **२०.१२.२०१८** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार विवेक अरविंद पांडे** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **विवेक अरविंद पांडे** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१६.१२.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
शिक्का
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती


जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### श्रीकृष्ण ढाकरे, किशोर नाठे यांची निवड

**अंजनगाव सुर्जी**-तालुक्यातील चिंचोली बुद्रुक येथील राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या शाखा अध्यक्षपदी श्रीकृष्ण ढाकरे तर सचिवपदी किशोर नाठे तर शाखा उपाध्यक्षपदी अनिल नाठे तसेच युवा आघाडी शाखा अध्यक्ष म्हणून यश ढाकरे यांची चिंचोली येथे जाऊन जिल्हाध्यक्ष निलेश जामठे आणि अंजनगाव सुर्जी तालुका अध्यक्ष डॉ.प्रमोद रेवसे यांनी नियुक्तिपत्र देऊन निवड केली.राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक अध्यक्ष बबनरावजी घोलप साहेब यांच्या आदेशानुसार गाव तिथे शाखा हा उद्देश ठेवून प्रदेशाध्यक्ष माधवराव गायकवाड, प्रदेश कार्याध्यक्ष गजानन भटकर, विदर्भाचे नेते माधवराव गायकवाड यांच्या मार्गदर्शनात ही शाखा कार्यकारणी तयार करण्यात आली.यावेळी ज्येष्ठ समाजसेवक पी. बी.वनस्कर साहेब, सामाजिक कार्यकर्ते पांडुरंग गोंडेकर साहेब, दर्यापूर तालुका अध्यक्ष वसंत रेवस्कर आदि सह परिसरातील समाज बांधव उपस्थित होते.



### श्री राजर्षी शाहू महाराज वाचनालयाला कपाट व खुर्च्या भेट

**तिवसा**-श्री राजर्षी शाहु महाराज सार्वजनिक वाचनालय तिवसा येथे यांना बालिका दिनानिमित्त रामदासपंत देशमुख व पांडुरंग खेडकर यांनी पुस्तकाची कपाट तसेच चंदु धुरजड व अनिल देशमुख, बेलोरा यांनी खुर्च्या भेट स्वरूपात दिल्यात. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेल्या सौ. आरतीताई राजेश वानखडे, छायाताई दंडाळे, अनिल थुल, सचिन राऊत,सुधीर गोडसे यांच्या हस्ते राजर्षी शाहु महाराज व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तसेच वाचनालयातर्फे रामदासपंत देशमुख व पांडुरंग खेडकर यांचा शाल व श्रीफळ देऊन आरती वानखडे व छायाताई दंडाळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाला सुनिल बहादूरपुरे, राजाभाऊ टेकाडे,अजय गुल्हाने, ज्ञानेश्वर कुऱ्हाडे, अवि शिंदे, सतीश नंदनवार, जानराव मनोहर, हेमंत निखाडे,प्रशिक मकेश्वर, प्रशिक शापामोहन, सुनिल घोरमाडे,संदीप दहाट,मधुकरराव पिंगळे, सुरज तंवर, भूषण मुंदाणे, दिपक धानोरकर, प्रफुल बनसोड, अजय केणे, गोपाल फरकाडे,मंगेश जगताप, अनिस शेख,प्रथमेश गोरखडे, अनिकेत वानखडे राजाभाऊ देशमुख, सुमित अनासाने, राहुल धडांगे, विजय बोन्द्रे,गणेश तरंगे व इतर वाचक वर्ग उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोहन भुसारी यांनी केले.



### दुर्गा प्रायमरी इंग्लिश स्कूलमध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती

**शिराळा**- येथील दुर्गा प्रायमरी इंग्लिश स्कूल मध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती विविध कार्यक्रमांनी साजरी करण्यात आली. सर्व प्रथम क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण प्रविण मोहरे यांनी केले. यावेळी संस्थेचे राजेश भोवाळ मनोहरराव बुरंगे डॉ मुकुंदराव ढोणे प्रतिभाताई भोवाळ सतिश भोवाळ गोपाळराव काळमेघ प्रमुख उपस्थिती होती तद्नंतर विद्यार्थ्यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाईच्या भुमिकेत यांची वेशभूषा धारण केलेल्या विद्यार्थीनीनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी मुख्याध्यापक प्रविण मोहरे शिक्षिका अर्चना नागे दिक्षा मनवर प्रगती तायडे अंकिता घोंगडे वर्षा तायडे कडुबाई आदींनी उपस्थित राहुन मोलाचे सहकार्य केले.

### गजानन जगताप यांचे निधन



**अमरावती**-शहरातील छत्री तलाव परिसरातील सुप्रसिध्द मीरा दातार दरगाहचे मुख्य पुजारी गजाननराव यशवंतराव जगताप यांचे आजाराने दुःखद निधन झाले. मृत्युसमयी ते ६५ वर्षाचे होते. गेल्या वीस वर्षापासून ते छत्री तलाव येथील दरगाहची निरंतर सेवा करीत होते. त्यामध्ये सर्व अमरावतीकर त्यांच्या दुःखात सहभागी आहेत. मृतक गजाननराव जगताप यांच्या पश्चात दरगाहची सेवा आता त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव भूषण जगताप देणार आहेत. सर्वधर्मसमभाव हाच त्यांचा सदैव गुण राहिला आहे. स्व.गजाननराव जगताप यांच्या निधनाने सर्व भाविकभक्त पोरके झाले आहेत.

## विदर्भातील अलौकिक संताचा शासनाकडून राज्यस्तरीय गौरव

# श्री संत गुलाबराव महाराज जयंती शासनातर्फे साजरी

**अमरावती/का.प्र.**

विदर्भाच्या अध्यात्मिक, सामाजिक व वैचारिक परंपरेतील एक अत्युच्च शिखर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रज्ञाचक्षु धर्मसमन्वयमहर्षी, ज्ञानेशकन्या श्री संत गुलाबराव महाराज यांची जयंती यावर्षीपासून महाराष्ट्र शासनातर्फे अधिकृतरित्या साजरी करण्यात येणार आहे. यासंदर्भातील अधिकृत शासन निर्णय निर्गमित झाला असून, हा निर्णय केवळ एका जयंती उत्सवापुरता मर्यादित नसून राज्याच्या सांस्कृतिक, आध्यात्मिक आणि वैचारिक वारशाला सशक्त अधोरेखित करणारा महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे. विदर्भाच्या भूमीत जन्मलेल्या या अलौकिक संताच्या विचारसरणीला आणि सामाजिक प्रबोधनात्मक कार्याला शासनस्तरावर मान्यता मिळाल्याने संतपरंपरेच्या गौरवात भर पडली असून, महाराष्ट्राच्या आध्यात्मिक इतिहासात हा निर्णय एक महत्त्वाचा अध्याय ठरणार आहे. श्री संत गुलाबराव महाराज साहित्य प्रचार मोहिमेचे प्रमुख तसेच वारकरी शिक्षण संस्था, तीर्थक्षेत्र बेलोरा (ता. चांदुरबाजार, जि. अमरावती) यांचे प्रसिद्धी



प्रमुख माधुर्य ठाकरे यांनी या ऐतिहासिक निर्णयाबद्दल महाराष्ट्राचे विकासपुरुष मा. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत. त्यांनी नमूद केले की, शासनाने घेतलेला हा निर्णय विदर्भाच्या संतपरंपरेला न्याय देणारा असून, समाजातील विविध घटकांपर्यंत संतांच्या विचारांचा प्रभावी प्रसार घडवून आणणारा आहे. या प्रक्रियेमध्ये महसूलमंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे, आ. श्रीकांत भारतीय, आ. प्रविणभाऊ पोटे तसेच माजी राज्यमंत्री बच्चुभाऊ कडू यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले असल्याचेही त्यांनी आवर्जून सांगितले. वारकरी शिक्षण संस्था, तीर्थक्षेत्र बेलोरा यांच्या वतीने २६ जून २०२३ रोजी शासनाकडे अधिकृत प्रस्ताव सादर करण्यात आला होता, ज्यावर सातत्यपूर्ण पाठपुरावा व सकारात्मक प्रशासनात्मक प्रतिसाद मिळाल्याचे स्पष्ट होते.संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विस्मय ठाकरे यांनी या शासकीय निर्णयाचे स्वागत करताना मा. मुख्यमंत्री तसेच दोन्ही उपमुख्यमंत्र्यांचे कृतज्ञतापूर्वक आभार व्यक्त केले आहेत. त्यांनी सांगितले की, या निर्णयामुळे श्री संत गुलाबराव महाराज यांची समृद्ध ग्रंथसंपदा, तात्त्विक चिंतन व समाजोद्धारक विचार शाळा, महाविद्यालये व शैक्षणिक उपक्रमांच्या माध्यमातून समाजाच्या प्रत्येक स्तरापर्यंत पोहोचण्याचा मार्ग खुला झाला आहे. यापुढे श्री संत गुलाबराव महाराज यांची जयंती राज्यातील सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयांमध्ये साजरी करण्यात येणार असल्याने, महाराजांचे विचार केवळ भक्तांपुरते न राहता सामान्य जनतेपर्यंत, विशेषतः शाळकरी विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचतील. परिणामी विदर्भातील हा अलौकिक संत संपूर्ण महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचून सामाजिक समरसता, वैचारिक प्रगल्भता व अध्यात्मिक जागृतीस चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत असून, या निर्णयामुळे भक्तपरिवारात समाधान व आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे आणि शासनाच्या या निर्णयाचे सर्व स्तरांतून उत्स्फूर्त स्वागत होत आहे.

# वाळूमाफियांची दादागिरी; महसूल कर्मचाऱ्याला मारहाण

## कुऱ्हा हद्दीतील घटना : निस्वादे यांना ट्रकमधून खाली फेकले

**कुऱ्हा/वार्ताहर**

येथील विद्या निकेतन विद्यालयाजवळ अंजनसिंगीहून येत असलेल्या अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या ट्रकला जप्तीसाठी तिवसा तहसील येथे नेत असलेल्या राहुल निस्वादे या महसूल सहायकाला ट्रक चालक व ट्रकमधील दोन अज्ञातांनी अश्लील शिवीगाळ करत बेदम मारहाण केली. व ट्रक तिवस्याकडे न वळविता चांदूररेल्वे रस्त्याने नेऊन अज्ञातस्थळी ट्रकमधील वाळू खाली केली तसेच निस्वादे यांना ट्रकमधून खाली फेकून ट्रकचालकाने धूम ठोकली.ही घटना रविवारी रात्री ९.०० ते १०.०० वाजेदरम्यान कुऱ्हा पोलिस स्टेशनच्या हद्दीत घडली. गोपनीय माहितीनुसार तहसिलदार डॉ. मयूर कळसे व नायब तहसीलदार आशिष नागरे हे महसूल अधिकारी चरणसिंह दुलत, महसूल सेवक सुरज माथुलकर यांच्यासह कुऱ्हा येथे अवैध वाळू वाहतुकीच्या मागावर होते. तेवढ्यात कुऱ्हा येथील विद्यानिकेतन विद्या अंजनसिंगीवरून येत असलेल्या ४९-सिडी-८७३७ क्रमांकाच्या कागदपत्रांची तपासणी केल त्यामध्ये अवैध वाळू आढव अन्य वाहनांची राबविण्यासाठी तहसीलदार पथकासह पुढे रवाना होताच, आलेल्या स्विफ्ट डिझायर का विरुद्ध दिशेने ट्रकचालकाला फोन आला. यांनी ट्रकचालकाला ट्रक घेण्यास सांगितले असता मा केली. तेवढ्यात कार ट्रकजवळ कारमधील दोघांनीही राहुल नि मारहाण केली. शासकीय कामात अडथळा निग शासकीय कर्मचारी यांना मारहाण करणे जीवे मारण्याची धमकी देणे व जप्त केलेले वाहन पळवून नेणे यावरून कलमान्वये गुन्हे दाखल केले.

## मतदान जनजागृतीसाठी आज सामाजिक संस्थांची बैठक

**अमरावती/का.प्र.**

महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदारांमध्ये मतदानाबाबत जनजागृती वाढविण्याच्या उद्देशाने ७ जानेवारी रोजी दुपारी १२ वाजता सर्व सामाजिक संस्थांची महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली आहे. सदर बैठक अमरावती महानगरपालिकेच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये पार पडणार असून मनपा आयुक्तांच्या निर्देशानुसार तिचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीत मतदानाचे महत्त्व, मतदार सहभाग वाढविण्यासाठी राबवावयाच्या उपक्रमांची रूपरेषा तसेच संस्थांच्या सामाजिक सहभागातून जनजागृती कशी अधिक प्रभावी करता येईल, यावर सविस्तर चर्चा होणार आहे. शहरातील विविध सामाजिक, स्वयंसेवी संस्था, संघटना व प्रतिनिधींनी या बैठकीस वेळेत उपस्थित राहून सहकार्य करावे, असे आवाहन मनपातर्फे करण्यात आले आहे.

## कला व विज्ञान महाविद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती

**कुऱ्हा**- येथील कला व विज्ञान महाविद्यालयामध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. अजय अभ्यंकर यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे विधीवत पूजन करून पुष्पमाला अर्पण केली.यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रा. मेश्राम यांनी 'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या विचारांची प्रासंगिकता' या विषयावर सविस्तर व प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

आजच्या बदलत्या सामाजिक परिस्थितीत सावित्रीबाई फुले यांचे विचार अधिकच महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केलेया कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इतिहास विभागाच्या विभाग प्रमुख प्रा. डॉ. स्मिता जाधव यांनी केले. तर गृह अर्थशास्त्र विभागाच्या विभाग प्रमुख प्रा. डॉ. कीर्ती गांधी यांनी प्रभावी शब्दांत आभार प्रदर्शन केले.

या कार्यक्रमाला भूगोल विभागाचे विभाग प्रमुख प्रा. डॉ. किशोर टाकसांडे, प्रा. डॉ. हर्षा कांबे, प्रा. डॉ. निशा जोशी, प्रा. दिलीप पाटील, प्रा. गजानन बेहरे तसेच महाविद्यालयातील प्राध्यापकवर्ग व कर्मचारी उपस्थित होते. सदर कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना व उपस्थितांना सामाजिक जाणीव, स्त्री सक्षमीकरण आणि समतेच्या मूल्यांची प्रेरणा मिळाली.

# जि.प.कन्या शाळेतर्फे बालविवाह जनजागृती रॅली

**अंजनगाव बारी/वार्ताहर**

जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळा, अंजनगाव बारी येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्त गावातून बालविवाह प्रतिबंधक रॅली काढून समाजात जनजागृती करण्यात आली तसेच बालविवाह रोखण्याची शपथ घेण्यात आली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी शाळेच्या मुख्याध्यापिका विजया झाडे यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करण्यात आले. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक, अंगणवाडी सेविका व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. काही विद्यार्थिनींनी महात्मा



ज्योतिबा फुले तर काही विद्यार्थिनींनी सावित्रीबाई फुले यांच्या वेशात सहभागी होत बालिका दिन आनंदात साजरा केला. इयत्ता १ ते ४ च्या विद्यार्थिनींनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनचरित्रावर आधारित अतिशय प्रभावी व मार्मिक भाषणे सादर केली. तसेच शाळेतील शिक्षक व मुख्याध्यापिका यांनीही मार्गदर्शक भाषणे केली.यानंतर गावातून रॅली काढून बालविवाहाच्या दुष्परिणामांबाबत जनजागृती करण्यात आली. यावेळी मुख्याध्यापिका सौ. विजया झाडे तसेच सर्व शिक्षकांनी विद्यार्थिनींना चांगले शिक्षण घेऊन आत्मनिर्भर बनण्याचा संदेश दिला. कार्यक्रमाच्या निमित्ताने त्या दिवशी वाढदिवस असलेल्या विद्यार्थिनी तसेच शालेय पोषण आहार मदतनीस यांचा पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन वाढदिवस साजरा करण्यात आला. विद्यार्थिनींना चॉकलेट वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सहाय्यक शिक्षक रामेश्वर स्वर्गीय, संगीता मंडे, किशोर मालोकार, रेश्मा वांगे तसेच शाळेतील सर्व शिक्षक व विद्यार्थिनींनी विशेष मेहनत घेतली. कार्यक्रमाचे सूत्र संचालन आभार प्रदर्शन किशोर मालोकार सर यांनी केले. यावेळी अंगणवाडी सेविका बेबी तलवारे, पुष्पा भागवत, वर्षा खोडे, बेबी निचत यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# आहार प्रदर्शनीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## विद्यापीठातील गृह विज्ञान विभाग व झेनिथ हॉस्पिटलचे संयुक्त आयोजन

**अमरावती/क्रा.प्र.**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील गृहविज्ञान विभाग व अमरावती शहरातील प्रसिध्द झेनिथ हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृह, डॉ. पंजाबराव देशमुख मेडिकल कॉलेज येथे हृदयरोगांसाठी आरोग्य कार्यक्रमांतर्गत आहार प्रदर्शनीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. प्रदर्शनीमध्ये गृहविज्ञान विभागाच्या विद्यार्थ्यांनी आहारविषयी विविध मॉडेल व पोस्टरव्दारे आहारविषयी नागरिकांना जागरुक केले.

हृदय रुग्णांनी कोणते पदार्थ सेवन करावेत, कोणते टाळावेत,



प्रक्रिया केलेले अन्न, मैद्याचे पदार्थ, बिस्किटे, शीतपेयांचे दुष्परिणाम, मीठ, साखरेचे अति सेवन टाळण्याचे महत्त्व विद्यार्थिनींनी प्रभावीपणे सांगितले. त्याचबरोबर प्रथिने, फायबरयुक्त अन्नपदार्थ, कडधान्ये, फळे, पालेभाज्या व धान्यांचा समावेश केल्यास आरोग्य व हृदयावर होणारे सकारात्मक परिणाम प्रत्यक्ष मॉडेल्सद्वारे नागरिकांना पटवून देण्यात आले. तळलेले पदार्थ, फास्टफुड, मैदा, बिस्किटे, साखरयुक्त शीतपेये, प्रक्रिया केलेले मांस व जंकफुड यांचे अतिसेवन हृदय व आरोग्यास कसे हानिकारक ठरते, याची माहिती नागरिकांना देतांना अन्नगटांची ओळख, फुड पिरॅमिडचे महत्त्व, दैनंदिन आहारात भाज्या, फळे, धान्ये व प्रथिनयुक्त पदार्थांचा समावेश कसा करावा, तेल, साखर, जंकफुडचे मर्यादित सेवन का आवश्यक आहे याविषयी सुध्दा मार्गदर्शन करण्यात केले.आहार प्रदर्शनीला किशोरवयीन मुलांपासून तर ज्येष्ठ नागरिकांनी भेट दिली. कार्यक्रमासाठी गृहविज्ञान विभागप्रमुख डॉ. वैशाली धनविजय यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वीतेकरिता विभागातील शिक्षक आयतल कामदार, भक्ती सोदिया, सुमेध वडूरकर तसेच झेनिथ हॉस्पिटलचे आहारतज्ज्ञ काजल केशवानी, किरण ठाकरे, समृध्दी वानखडे यांचे सहकार्य लाभले.

## क्रीडा महोत्सवात जि.प.शाळा विचोरी अव्वल



**लेहेगाव**-जिल्हा परिषद अंतर्गत मोर्शी येथे तीन दिवशीय क्रीडा महोत्सव तसेच सांस्कृतिक व निदर्शन स्पर्धा उत्साहात पार पडल्या. या महोत्सवामध्ये जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा विचोरी केंद्र आडगाव तालुका मोर्शी यांनी निदर्शन स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले. विजेत्या संघाला मान्यवरांच्या हस्ते प्रथम क्रमांकाने सीड प्रदान करण्यात आले या विजयामुळे शाळेत जिल्हास्तरीय क्रीडा महोत्सवात तालुक्याचे नेतृत्व करण्याची संधी प्राप्त झाली आहे. शाळेच्या यशाबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे. यशासाठी गटविकास अधिकारी मोर्शी मगदूम. गटशिक्षणाधिकारी उंडे साहेब, शिक्षण विस्तार अधिकारी गायकवाड, केंद्रप्रमुख गजानन चौधरी,मनोज वांगे, जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा विचोरीचे मुख्याध्यापक नितीन काळे तसेच सहाय्यक शिक्षिका योगिता भुसारी .यांचे विशेष मार्गदर्शन व सहकार्य लाभले. शाळेच्या या यशामुळे विद्यार्थ्यांमध्ये सांस्कृतिक उपक्रमांबाबत नवचैतन्य निर्माण झाले असून पुढील जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा चा वर्षाव होत आहे.

# आचार्य बाळशास्त्री जांभेकर जयंतीनिमित्त पत्रकार दिन

**कुऱ्हा/वार्ताहर**

भारतीय पत्रकारितेचे जनक, दर्पणकार तथा समाजप्रबोधनाचे अग्रदूत आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त पत्रकार दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यासाठी अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघ, महाराष्ट्र प्रदेश (नोंदणी क्र. ५५९५) अंतर्गत तिवसा तालुका शाखेच्या वतीने भव्य पत्रकार दिन विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख उद्घाटक म्हणून आ. राजेश वानखडे (तिवसा विधानसभा मतदारसंघ) कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मा. डॉ. हेमंत देशमुख (प्राचार्य, यादव



देशमुख कला व वाणिज्य महाविद्यालय, तिवसा) भूषविले तसेच या प्रसंगी प्रमुख उपस्थिती म्हणून डॉ. मयूर कळसे (तहसीलदार, तिवसा), मा. अभिषेक कासोदे (गटविकास अधिकारी, तिवसा), मा. गोपाल उपाध्याय (पोलीस निरीक्षक, तिवसा) व मा. शिवदास मुसळे (मुख्याधिकारी, नगरपंचायत तिवसा) ,राष्ट्रीय सरचिटणीस राजेन्द्र भुरे, राष्ट्रीय सचिव अशोक पवार, जिल्हाध्यक्ष पूर्व भाई भूषण यावले हे मान्यवर उपस्थित होते.या कार्यक्रमात सत्कारमूर्ती म्हणून राजाभाऊ बायस्कर (सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक, तिवसा) यांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे. त्यांच्या सामाजिक व प्रशासकीय क्षेत्रातील उल्लेखनीय सेवेला यावेळी गौरविण्यात येणार आहे.हा कार्यक्रम ६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता यादव देशमुख कला व वाणिज्य महाविद्यालय, तिवसा येथे झाला.अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघ, तिवसा तालुका शाखेच्या वतीने सर्व पत्रकार बांधव, सामाजिक व नागरिकांनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तक्षशिला अभियांत्रिकी महाविद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती

**अमरावती** - श्री. दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट अमरावती द्वारा संचालित तक्षशिला अभियांत्रिकी महाविद्यालय दारापूर येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती प्राचार्य डॉ. डि. टी इंगोले व संस्थेचे लेखापाल प्रशांत मारोटकर यांच्या मार्गदर्शनात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर,सावित्रीबाई फुले व श्री. दादासाहेब गवई यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. महाविद्यालयाने सावित्रीबाई फुले



यांच्या जयंती निमित्त विविध उपक्रम राबविले निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, पथनाट्य, रांगोळी स्पर्धा मध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.कार्यक्रमाचे प्रास्तविक राष्ट्रीय सेवा योजना प्रा.डॉ.संतोष यावले यांनी मांडले, सूत्रसंचालन प्रा. निखिल बोडखे यांनी तर आभार अपेक्षा इंगळे यांनी व्यक्त केले,वृत्तांकन सहाय्यक ग्रंथपाल देवेंद्र चोरे यांनी केले.यावेळी डॉ. एस. टि. वरघट, कार्यालय अधीक्षक अर्पित काळमेघ, विभाग प्रमुख प्रा. डॉ. एन. एस. घोटकर, पूजा देशपांडे,पी. एस.दंडे,अतुल कौशल, अतुल चिंचमलातपुरे, प्रा.ए. एस. बोबटकर, लेखापाल प्रकाश मोहोड, इस्टेट मॅनेजर मुकेश बनसोड उपस्थित होते. कार्यक्रमाला डॉ. एस. एस. दाभणे, पी. जे. भडांगे, प्रा. डि. जे. मनोवार, प्रा. मनिष बिजवे,प्रा. आर. आर. देवतारे, सौरभ तळोकार, एम. जे. वाटाणे, एच. के. लोणपांडे, व्ही. आर. काळे, श्रीकांत भुंते, व्ही. एस. उके, एस. पि. झाडे, पि. ए. वैद्य, प्रा. पि. एन. घरडे, पि. आर. ठाकरे, वाय. एन. गोंडाणे,वाय. एल. सवई, पि. पि. बांगरे, ए. बी. बुरघाटे, योगेश अवाऊ, मनोरंजन गवई, राजेश कमलापुरे,सचिन ढोले, अमोल पेठेकर तसेच सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता सावित्रीबाई फुले यांच्या मूल्यांचे पालन करण्याची प्रतिज्ञा घेऊन व राष्ट्रगीताने झाली. संपूर्ण कार्यक्रम शांत आणि आदरपूर्ण वातावरणात पार पडला. शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# काँग्रेस प्रदेश उपाध्यक्ष हिदायत पटेल यांच्यावर प्राणघातक हल्ला

## प्रकृती गंभीर, मोहाळ येथील घटना- पोलिसांचा तगडा बंदोबस्त




**अकोला/प्रतिनिधीः-** काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा प्रदेश उपाध्यक्ष हिदायत पटेल यांच्यावर प्राणघातक हल्ला करण्यात आला आहे. ही धक्कादायक घटना त्यांचे मूळ गाव अकोट तालुक्यातील मोहाळ येथे आज मंगळवार ६ जानेवारीला दुपारच्या सुमारास घडली. या प्राणघातक हल्ल्यामध्ये काँग्रेस नेते हिदायत पटेल गंभीर जखमी झाले असून त्यांना उपचारार्थ रुग्णालयात हलविण्यात आले आहे. राज्यात सध्या महापालिका निवडणुकीची धामधूम सुरू आहे. निवडणुकीच्या या गदारोळातच अकोट तालुक्यातून एक धक्कादायक घटना समोर आली. माहितीनुसार काँग्रेस प्रदेश उपाध्यक्ष हिदायत पटेल मंगळवारी दुपारी १.३० वाजता सुमारास मोहाळ येथील जामा मस्जिद मध्ये नमाज पठनासाठी गेले होते. नमाज झाल्यावर समाज बांधव चालले गेले आणि हिदायत पटेल तेथेच बसले होते. थोड्याच वेळात ते मज्जिदच्या बाहेर निघाले तेव्हा त्यांच्यावर एका आरोपीने चाकूने हल्ला केला. त्यांच्या मानेवर आणि पोटावर वार करण्यात आले. हल्ला करून आरोपी तेथून फरार झाला. आपसी वादातून हा हल्ला करण्यात आल्याची प्राथमिक माहिती आहे. या घटनेची माहिती ☞(पान २ वर)

# ८०५ कंट्रोल युनिट तर ३३२० बॅलेट युनिट सज्ज

**ईव्हीएम संदर्भात प्रशासनाची व्यापक तयारी** | **१६ बटनची बॅलेट युनिट वापरण्यात येणार** | **प्रत्येक मतदान केंद्रावर १ कंट्रोल युनिट** | **कंट्रोल युनिट ८०५ तर बॅलेट युनिट ३३२० सज्ज**



**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ पारदर्शक, निर्भय व शांततेत पार पाडण्यासाठी निवडणूक प्रशासनाकडून व्यापक तयारी करण्यात आली आहे. या तयारीत इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रणा (ई.व्ही.एम.) बाबत सर्व नियोजन पूर्ण करण्यात आले असून, ही प्रक्रिया निवडणूक अधिकारी तसेच अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली राबवली जात आहे. निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार मतदान प्रक्रिया सुरक्षित, विश्वासार्ह व सुलभ व्हावी यासाठी आधुनिक ई.व्ही.एम. प्रणालीचा वापर करण्यात येणार आहे. यामध्ये १६-बटनची बॅलेट युनिट (बी.यू.) वापरण्यात येणार असून, प्रत्येक मतदान केंद्रावर १ कंट्रोल युनिट (सी.यू.) उपलब्ध राहणार आहे.

मतपत्रिकेवरील उमेदवारांची ओळख अधिक सोपी व्हावी यासाठी बॅलेट पेपरचे रंग गटनिहाय निश्चित करण्यात आले आहेत. त्यानुसार, अ गटासाठी : पांढरा रंग, ब गटासाठी : फिक्कट गुलाबी रंग, क गटासाठी : फिक्कट पिवळा रंग, ड गटासाठी : फिक्कट निळा रंग राहणार आहे.

अमरावती महानगरपालिका क्षेत्रात एकूण ☞(पान २ वर)

# चंद्रशेखर बावनकुळे यांच्या आज पाच जाहीर सभा

## भाजपा उमेदवारांचा करणार प्रचार



**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्याचे महसूल मंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री आणि भाजपाचे राज्य निवडणूक प्रमुख चंद्रशेखर बावनकुळे बुधवारी (दि.७) अमरावती दौऱ्यावर येणार आहे. ते शहरात महापालिका निवडणुकीतील भाजपा उमेदवारांच्या प्रचारार्थ विविध ठिकाणी पाच जाहीर सभा घेणार आहे. तत्पूर्वी ते नागरिकांशी संवाद साधतील. हॉटेल मैफिल येथे दुपारी ४.३० वाजता ते नागरिकांशी संवाद साधतील. दुपारी ५ वाजता त्यांची भाजपा उमेदवारांच्या प्रचारार्थ अशियाड चौकात जाहीर सभा होईल. सायंकाळी ६ वाजता ते विलास नगरातील नवयुवक मंडळाच्या मैदानावर ☞(पान २ वर)

# महापालिका निवडणुकीसाठी मतदान केंद्रांची पाहणी

## पोलीस आयुक्त व मनपा आयुक्तांनी घेतला आढावा



**अमरावती/प्रतिनिधीः-** आगामी अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या पारदर्शक आणि सुरळीत आयोजनासाठी आज महत्त्वपूर्ण मतदान केंद्रांची पाहणी करण्यात आली. यावेळी अमरावती पोलीस आयुक्त राकेश ओला आणि निवडणूक अधिकारी तथा अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी प्रत्यक्ष पाहणी करून मतदारांसाठी सुरक्षित आणि सुलभ मतदान सुविधा सुनिश्चित करण्यावर भर दिला.

सदर पाहणी जमील कॉलनी परिसरातील शाळा क्र. ८, ज्यामध्ये मतदान केंद्र क्रमांक १९ आहे, तसेच ॲकॅडमी स्कूल, असोसिएशन स्कूल आणि विद्या निकेतन स्कूल येथे करण्यात आली. या मतदान केंद्रांची पाहणी करताना पोलीस आयुक्त व आयुक्तांनी सुरक्षेची, प्रशासनिक व्यवस्था, प्रवेशद्वारांची सुविधा, मतदारांच्या गर्दीचे नियोजन आणि मतदान प्रक्रिया पारदर्शकतेने पार पडण्यासाठी आवश्यक उपाययोजना यांचा सखोल आढावा घेतला.

शहरातील नागरिकांना सुरक्षित आणि सुलभ मतदानाची सुविधा मिळावी यासाठी पोलीस आयुक्तांनी पोलिस दलाचे योग्य नियोजन केले असून, मतदान केंद्रांवर सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक पथके तैनात करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी मतदान केंद्रांवरील प्रशासकीय व्यवस्था, शाळा प्रशासनासह संबंधित कर्मचारी यांच्यासोबत बैठक घेऊन मतदान दिनी कोणत्याही प्रकारच्या अडचणी उद्भवू नयेत याची दक्षता घेतली.

अमरावती महानगरपालिकेच्या निवडणूक तयारीत प्रशासनाने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा ☞(पान २ वर)

# मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे तिवसा तहसीलदारांना निवेदन



**तिवसा/प्रतिनिधीः-** विविध मागण्यांना घेऊन मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे वतीने तिवसा तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.मागण्या पूर्ण न झाल्यास आंदोलनाचा देखील इशारा देण्यात आला.

मनरेगाचे नाव बदलवून जि रामजी केल्याचे निषेधार्थ तसेच अतीवृष्टीची नुकसान भरपाईचे पैसे राहलेल्या किसानांना त्वरीत मिळावे , घरासाठी जागा मिळावी, गावठानाचा विस्तार करावा, तिवसा तालुक्यातील सर्व अतीक्रमीत घरे नमुना ८ अ ला नोंद करा, सर्वांना राशन गरजुंना राशन कार्डचे वाटप करा , श्रावण बाळ संजय गांधी निराधार लोकांचे मानधन ३ हजार रुपये करा , घरकुल योजनेचे अनुदान ५ लाख रुपये द्या अशा अनेक मागण्यांचे निवेदन मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचो तर्फे ना.तहसिलदार आशिष नागरे यांना देण्यात आले. या प्रश्नाला घेवून दि.१९ ☞(पान २ वर)

# संयुक्त रिपब्लिकन आघाडीचे ११ उमेदवार रिंगणात




**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगरपालिका निवडणुकीसाठी येत्या १५ जानेवारी रोजी मतदान होणार आहे. निवडणुकीमध्ये संयुक्त रिपब्लिकन आघाडीच्या वतीने अकरा उमेदवार उभे केले आहे. अशी माहिती आज मंगळवार ६ जानेवारी रोजी झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये देण्यात आली. संयुक्त रिपब्लिकन आघाडीच्या वतीने प्रभाग क्रमांक १ ड मध्ये रामेश्वर रामटेके, प्रभाग १० ड मध्ये श्रीधर खडसे, प्रभाग १२ साहेबराव मेश्राम, प्रभाग ७ करूणा तेलमोरे, प्रभाग २० प्रवीण आकोडे, प्रभाग ५ प्रदीप दंदे, प्रभाग ८ विजय वानखडे, प्रभाग १ चंदन वानखडे, प्रभाग २२ प्रकाश बनसोड, प्रभाग ६ संजय भोवते, प्रभाग १ किरण यावले यांना उमेदवारी देण्यात आली आहे. स्वच्छ अमरावती सुंदर अमरावती हे रिपब्लिकन आघाडीचे स्वप्न आहे. अमरावतीचे रस्त्याचे रुंदीकरण व चौकाचे सौंदर्यकरण तसेच वेगवेगळ्या उद्योगाच्या योजना तयार करून शहरांमध्ये गरीब मजुरांच्या रोजगाराचे भविष्यासाठी उपक्रम व विमा आदी प्रश्न सोडायचे आहे. ☞(पान २ वर)

# आज उपमुख्यमंत्री शिंदे यांची नेहरू मैदानावर जाहीर सभा

## केंद्रीय मंत्री जाधव ,मंत्री राठोड राहणार उपस्थित




**अमरावती/प्रतिनिधीः-** महानगरपालिका निवडणुकीमध्ये शिवसेना शिंदे सेनेकडून उभे असलेल्या उमेदवारांच्या प्रचारासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या जाहीर सभा आज बुधवार ७ जानेवारीला होणार आहे. दुपारी १२ वाजता राजकमल चौकातील नेहरू मैदान येथे हे आयोजन करण्यात आले आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही सभा महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

यावेळी केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव, यवतमाळ चे पालकमंत्री संजय राठोड, माजी खासदार आनंदराव अडसूळ उपस्थित राहणार आहे. शिवसेनेच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ ही सभा आयोजित करण्यात आलेली आहे. बुधवारी ☞(पान २ वर)

# जिल्ह्याच्या विकासासाठी एकत्रितरित्या योगदान द्या

## -जिल्हाधिकारी आशिष येरेकर



**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यातील समस्या जाणून त्यावर विविध विभागातर्फे उपाययोजना करण्यात येत आहे. जिल्हा वॉर रूमच्या माध्यमातून प्राधान्याचे क्षेत्र निवडून त्यात विकास घडवून आणल्या जात आहे. त्यामुळे जिल्ह्यातील पर्यटन आणि इतर क्षेत्राचा विकास करण्यासाठी सर्व विभागांनी एकत्रितरित्या योगदान द्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले. जिल्हा वॉर रूमची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात आज (दि.६) घेण्यात आली.

बैठकीत चिखलदरा पसिरातील पर्यटकांना देण्यात येणाऱ्या सोयीसुविधांचा आढावा घेण्यात आला. वनविभागातर्फे करण्यात आलेल्या विविध कामांमुळे पर्यटक आकर्षित होण्यास मदत झाली आहे. ॲडव्हेंचर पार्कमुळे पर्यटकांना साहसी खेळांची सुविधा निर्माण झाली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील पर्यटनाचा विकास करताना चिखलदरा केंद्रबिंदू ठेवण्यात यावा. यासाठी प्रत्येक विभागाने कार्य करावे. चिखलदराच्या विकासासाठी आयसीआयसीआय फाऊंडेशनने पुढाकार घेतला आहे. त्यांनी या क्षेत्रात कोणती कामे करावीत, याचा आराखडा तयार करावा. पर्यटन विभागातर्फे 'आई' योजना राबविण्यात येत आहे. याचा लाभ चिखलदरा परिसरात देण्यात यावा.

गाविलगड किल्ल्याचा परिसर पुरातत्व विभागाकडे आहे. त्यामुळे या ठिकाणी पर्यटकांसाठी रस्ते आणि दिशादर्शक फलक लावण्याचे काम पुरातत्व विभागाने करावे. आमझरी गाव मधाचे गाव म्हणून विकसित करण्यात येत आहे. त्यासोबतच गावातील युवकांना मधपालनाचे प्रशिक्षण देण्यात यावे. यासाठी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाची मदत घ्यावी. गावाचे मध संकल्पना ठेऊन सुशोभिकरण करण्यात यावे. पर्यटकांसाठी होम स्टेसाठी एकत्रितरित्या राहण्याची सोय केल्यास त्याचा लाभ होणार आहे. मेळघाटातील २२ गावांतील विजेच्या ☞(पान २ वर)

# रतन इंडिया कंपनीच्या कामगारांनी रोखली रेल्वे

## प्रकल्पाला घेराव, उपोषणकर्ते गुल्हानेंची प्रकृती बिघडली



**अमरावती/प्रतिनिधीः-** रतन इंडिया ऊर्जा प्रकल्पातील कामगारांना न्याय मिळावा या मागणीसाठी सुरू असलेले आंदोलन मंगळवारी तीव्र झाले. संतापलेल्या कार्यकर्त्यांनी रेल्वे रोखून प्रकल्पाचे चारही प्रवेशद्वार बंद केले. पोलिसांचा चारही प्रवेशद्वारावर तगडा बंदोबस्त असल्यामुळे संपूर्ण परिसरात तणाव निर्माण झाला होता. आंदोलनाच्या ☞(पान २ वर)

